म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.

REFBK-0000478
REFBK-0000478

॥ श्री ॥

# श्रीक्षेत्र त्र्यंबक.

गांस येत
नाहीं.

सं. अ. १९–७५

संपादक व प्रकाशक

हरी अंताजी मराठे त्र्यंबककर,

संस्थान जव्हार.

४७८

REFBK-0000478

REFBK-0000478

शक १८३०—सन १९०८.

---

किंमत ४ आणे.

[ हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें राजिस्टर
केलें आहे. ]

# प्रस्तावना.

ज्या पवित्र क्षेत्राच्या वर्णनासंबंधानें हा ग्रंथ लिहिण्यांत येत आहे, त्याच्या योगानें क्षेत्राचें पावित्र्य वाढवावें, हा मुळींच हेतु नाहीं. कारण क्षेत्राचा पवित्रपणा फार पुरातन काळापासून सारखा अव्याहत चालत आलेला आहे. संस्कृत ग्रंथकार व महाराष्ट्रकवि यांनीं छंदोबद्ध या क्षेत्राची महती चांगलीच गायिली आहे. केवळ प्राकृत जनांसाठीं ह्मणून नासिक येथील राहणार रा. रा. गोपाळरावजी वैद्य, यांनीं एक लहानसा "त्र्यंबकमहात्म्य" ह्या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. या स्थानाची ऐतिहासिक माहिती गॅझिटीयर या नांवाचा स्थलवर्णनात्मक जो महान् ग्रंथ सरकारच्या आश्रयानें प्रसिद्ध करण्यांत आलेला आहे त्यांत कांहीं नमूद केलेली असून कांहीं सांगोपांगीनें कळलेली आहे. एकंदरींत या सर्व पूर्वकालिन सामुग्रीची प्रस्तुतच्या ग्रंथरचनेंत थोडीफार मदत झालेली असल्यानें त्या त्या मदतीबद्दल ग्रंथकर्त्ता त्या त्या व्यक्तींचा आभारी आहे.

प्रस्तुतच्या ग्रंथाचे, पौराणिक माहिती, ऐतिहासिक माहिती व सांप्रतचें स्वरूप, असे स्थूलमानानें तीन मुख्य विभाग पडत असून वर्णनाच्या सोईसाठीं आणखीहि कांहीं पोटविभाग काढिलेले आहेत. ग्रंथकार हा क्षेत्रवासी असल्यानें यथातथ्य स्वरूप वठविण्यास त्यास साहाजिकच सोय मिळालेली आहे; परंतु सूज्ञ जनांच्या पसंतीस हा यत्न कितपत येतो हें पाहणें आहे.

ग्रंथरचनेचा हा पहिलाच प्रयत्न असल्यानें दोषस्थळें पुष्कळ असतीलच. तरी तीं कृपा करून सूज्ञ वाचकांनीं कळविलीं असतां पुढील खेपेत तदनुरोधानें सुधारणा करण्यांत येईल. अखेरीस ज्या प्रभूच्या सत्तेनें ही ग्रंथ प्रकाशनासंबंधींची मनीषा फलद्रूप होत आहे त्या प्रभूचरणारविंदीं नमन करून हा अल्प प्रास्ताविक लेख संपवितों.

हा ग्रंथ पुढें आणण्याचे संबंधांत रा. रा. रामचंद्र त्र्यंबक चिपळूणकर कारभारी, संस्थान जव्हार, आणि आमच्या मित्रमंडळींपैकीं ज्यांनीं ज्यांनीं मदत केली त्यांचा व रा. रा. दत्तात्रय गणेश खांडेकर, लॉ प्रिंटिंग प्रेसचे मालक यांनीं अल्पावधींत मुद्रणाचें काम उत्तम तऱ्हेनें व समाधानकारक तयार करून दिलें, ह्याबद्दल त्यांचा ग्रंथकर्ता फार आभारी आहे.

ग्रंथकर्ता.

श्री.

# अर्पणपत्रिका.

## श्रीमंत महाराज कृष्णशाह

राजेसाहेब संस्थान जव्हार,

यांचे चरणसेवेशीं

हें पुस्तक

त्यांच्या ठिकाणीं प्रजावात्सल्य, गुणग्राहकत्वादि
सद्गुण अवलोकन करून

परमादरानें सविनय

कर्त्यानें

अर्पण केलें आहे.

# श्रीक्षेत्र त्र्यंबक.

## भाग १ ला.

### पौराणिक माहिती.

एकतः सर्व तीर्थानि त्र्यंबकं क्षेत्रमेकतः ।
तुलया तोलयद्धाता त्र्यंबकं तु विशिष्यते ॥

—क्षेत्रमहात्म्ये—

पद्मपुराणांतर्गत श्वेतराजा व नंदी यांच्या संवादरूपानें या परम पवित्र क्षेत्राचें महात्म्य वर्णित आहे. एके काळीं परम कारुणिक भगवान् मृडानिपति जगदुपकाराविषयीं उत्सुक होऊन जगतितलावर येण्यासाठीं निमित्त शोधण्यांत चिंतातूर असते झाले. तेव्हां भवानी पार्वती हिनें मी निमित्त तयार करून देतें असें आश्वासन देऊन ती ब्रह्मलोकीं गेली. त्या ठिकाणीं तिनें ब्रम्हदेवाच्या शरीरांत संचार केला. नंतर ब्रम्हदेवास असें वाटूं लागलें कीं, मी सर्वश्रेष्ठ आहें, मी सर्वजाणता आहें, महादेवाचा महिमाही मला ज्ञात आहे. ही त्याची दर्पोक्ति विष्णूस सहन झाली नाहीं. त्यांनीं स्वानुभवें सांगितलें कीं, मी महत्तपश्चर्या करूनही मला शिवमहिमा ज्ञात झाला नाहीं. त्यावर उभयतांमध्यें असें ठरलें कीं, विराटस्वरूपी शिव यांच्या

शीर्षदर्शनार्थ ब्रह्मदेवानें ऊर्ध्वभागीं शोधीत जावें व विष्णूनीं पादवंदनार्थ अधोभागीं शोधावें. याप्रमाणें बहुतकाल शोध चालवूनही जेव्हां शोध लागेना, तेव्हां ब्रह्मदेव थकून जाऊन त्यानें केतकीपुष्प व धेनु निर्माण करून त्यांस खोटी साक्ष देण्याविषयीं मधवून ठेविलें व आपण सुरलोकीं येऊन बोलतां झाला कीं, कास्यपात्रांत धेनूचें दूध काढून त्यानें शिवमस्तकावर अभिषेक करून केतकीपुष्पेंकरून पूजन करून आलों. श्रीविष्णूनीं येऊन स्पष्ट सांगितलें कीं, मला गुडघ्याचाही भाग आढळत नाहीं, मग पायाची गोष्ट कोठें ? याप्रमाणें उभयतांचें भाषण ऐकून इंद्रादि देव साशंक होऊन खऱ्याखोट्याचा निर्णय करून घेण्याकारितां शिवलोकीं गेले. तेथें शंकरांनीं अंतर्दृष्टीनें ब्रह्मदेवाचें कपट ओळखून त्यास शाप दिला कीं, तूं भूलोकीं अपूज्य होशील व साक्षीभूत असलेल्या केतकीपुष्पास शाप दिला कीं, शंकरपूजेंत तुला कोणी शिवणार नाहीं; व धेनूस शापिलें कीं, तूं मुखीं अपवित्र होशील. हा शंकरशाप श्रवण करून तत्समयीं मोहित झालेल्या ब्रह्मदेवानेंही शंकरास शाप दिला कीं तूं भूलोकीं पर्वत होऊन राहशील.

याप्रमाणें शापोक्ति झाल्याबरोबर शंकर पर्वत होऊन धरणीतलीं आले व येतांना मिळालेल्या पतनवेगानें वस्तुजातींचा संहार होऊं लागला. ही स्थिति पाहून मायाविनिर्मुक्त ब्रह्मदेवासह सर्व सुरवर भयभित होऊन गेले. इतक्यांत आकाशवाणी झाली कीं, ब्रह्मदेव, विष्णु व इंद्र या तिघांनीं पर्वतरूपानें सह्य पर्वताच्या शिखरापासून पश्चिम समुद्रापर्यंत आडवें व्हावें व त्या ठिकाणीं शंभूची प्रार्थना

करावी. याप्रमाणें तिघांनीं केल्यावर त्या तिघां मार्गरोध-कांस त्रिनेत्रांनीं शंकर पाहते झाले. यावरून त्या शंकर-रूपी पर्वतास ' त्र्यंबकाख्यगिरी ' असें नांव मिळालें. तदुत्तर त्र्यंबकेश्वराची स्तुति त्रिवर्गांनीं केल्यावर श्रीशंक-रांनीं त्यांचें समाधान केलें कीं, हें जें घडून आलेलें आहे तें माझ्या इच्छेनुरूपच घडून आलेलें आहे, आपण स्व-स्थानीं जावें. त्यावर विष्णूनीं उत्तर केलें कीं, जावत्काल-पर्यंत आपण येथें पर्वतरूपानें रहाल, तावत्कालपर्यंत आह्मीही त्रिवर्ग आपल्या असमन्तात्भागीं राहूं. याप्रमाणें नवक्रोशात्मक श्रीत्र्यंबकक्षेत्र असून असमन्तात्भागीं हरी, विधि व शचिपति हे पर्वतरूपानें आहेत.

कालांतरेंकरून ब्रह्मदेवानें त्र्यंबकगिरीवर येऊन शंकराचें आराधन केलें. त्या योगानें शंकर प्रसन्न होऊन त्यांनीं वर दिला कीं, मी तुझें नांव धारण करून या ठिकाणीं प्रसिद्ध राहीन व अभेदभावानें तूं या लोकीं पूज्य राहशील. या कारणानें यापुढें त्या गिरीस त्र्यंबकगिरी असें न ह्मणतां 'ब्रह्मगिरी' असें नांव मिळालें. या ब्रह्मगिरीस पांच शिखरें आहेत. त्यांचीं नांवें सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरूष आणि ईशान अशीं आहेत. या पांच लिंगांचें सकृद्दर्शनही महापुण्यप्रद आहे.

या वर निर्दिष्ट केलेल्या ब्रह्मगिरीनजीकच पर्वतरूपानें असणारा इंद्र ' अंजनाचल ' नांवानें विख्यात आहे. ह्मा पर्वतास अंजनाचल नांव पडण्याचें कारण त्या ठिकाणीं कोणी 'अंजना ' नांवाची एक अप्सरा राहत असे. त्याच-प्रमाणें हरीशागिरी अथवा प्राकृत लोक ज्यास ' हर्षाचा

डोंगर ' ह्मणतात तो ब्रह्मगिरीनजीकच आहे. ह्या पर्वताचें हरिश नांवच त्या उभय देवतांसंबंधानें भेदबुद्धि धरणाऱ्या अज्ञान जनांचा भ्रम निरास करणारें आहे. ब्रह्मगिरीच्या सान्निधानानें आलेली ह्या क्षेत्राची पवित्रता गोदोत्पत्ति, आद्य त्र्यंबकाख्य ज्योतिर्लिंगस्थान, इतर पवित्र तीर्थें व स्थलें यांचें साहचर्य यांच्या योगानें अनंतगुणित झालेली आहे.

एके वेळीं शिवपार्वती यांच्यामध्यें सुरतप्रसंगांत परस्परांच्या सामर्थ्याविषयीं आशंका उत्पन्न होऊन चढाओढ सुरू झाली. ज्या मानानें शंकर आपलें रूप विस्तीर्ण करूं लागले त्या मानानें भवानीनेंही वाढ चालविली. अखेरीस श्रांत होऊन तिनें विष्णुस्मरण केलें. त्याकाळीं श्रीविष्णूनीं पार्वतीच्या शरीरांत संचार करून चढाओढ कायम राखिली. पुढेंपुढें चराचर जीवास पीडा करणारी ही चढाओढ पाहून व सर्व सुरगण भयभित झालेला ओळखून श्रीविष्णूनीं शंकरास हाक मारिली. त्यासरसें शंकर भानावर येऊन ते किंचित् लज्जायमान झाले. त्या ठिकाणीं ब्रम्हदेवानें शंकराची पुष्कळ स्तुति केली. त्यानें संतोषित होऊन महादेव बोलले कीं, हें आमचें चरित्र परोपकारक व्हावयासाठीं विष्णूनीं योनियुक्त लिंगाचे बारा विभाग करावे. याप्रमाणें विभाग करीत असतां त्यापासून ज्योति उत्पन्न झाल्या. त्यावरून त्या द्वादश भागास ज्योतिर्लिंगें ह्मणूं लागले. तीं ज्योतिर्लिंगें येणेंप्रमाणें:—

त्र्यंबकः शंकरश्चैव घृसृणेशस्तथैव च ॥
विश्वेश्वरो महाकालो नागेशो मल्लिकार्जुनः ॥

**रामेशो सोमनाथश्च केदारश्च तथैव च ॥**
**वैजनाथश्च यो देवो ओंकार ममलेश्वरः ॥**

या द्वादश ज्योतिर्लिंगांपैकीं ' त्र्यंबकाख्य ज्योतिर्लिंग ' ह्या क्षेत्रीं आहे. यांपैकीं एका ज्योतिर्लिंगाचें दर्शन घडलें असतां सर्व पापक्षय होऊन पुनर्जननभीति नाहींशी होते; मग ज्या सत्पुरुषास सर्वांचें दर्शन घडेल त्याच्या पुण्याचा महिमा काय वर्णावा ?

आंतां गंगावतारासंबंधीं रम्य कथा सांगणें आहे. बलीपातालगमनकालीं विष्णूपूजेसाठीं अर्घ्यार्थ पितामह ब्रह्मदेव यांनीं शंकरदत्त कमंडलूंतील उदकाचें आवाहन केलें. तो ओघ मेरुपर्वतावर पडून चतुर्धाभिन्न झाला. दक्षिण दिग्भागीं जाणारा ओघ शंकरांनीं जटाजूटीं ठेविला व पश्चिमभाग श्रीविष्णु ग्रहण करिते झाले. त्याचप्रमाणें पूर्वबाजूकडील ऋषी आणि देव व पश्चिमेकडील पितर व लोकपाल घेते झाले. याप्रमाणें जटाजूटीं ठेविलेली गंगा महादेवास अत्यंत प्रियकर झाली. इच्छामात्रेंकरून ती रूपशालिनी होऊन शंकरास आनंदवित असतां भवानीच्या दृष्टीस पडली. तेव्हां ती जलरूप धारण करून मस्तकीं राहती झाली. याप्रमाणें शंकरमस्तकीं राहणारी गंगा पाहून गौरीला परम विषाद वाटला व इचा संबंध कसा सोडवावा या विचारांत ती मग्न झाली. शंकराशीं विवादानें तें कार्य साधण्यासारखें नाहीं, असा मनाशीं निश्चय करून अन्य उपाय न आढळल्यामुळें तिनें ही गोष्ट आपल्या मुलापाशीं काढिली. त्यावर विनायक यांनीं सांगितलें कीं, आई, तूं कांहीं काळजी करूं नकोस, मी थोडक्यांत ह्या गोष्टीचा

निकाल करितों. शंकर निद्रिस्थ झाले असतां मी त्यांचा जटाजूटच कांपून टाकितों ह्मणजे अनायासें गंगेचें उच्चाटन होईल. ही बालबुद्धि ऐकून पार्वतीस फार वाईट वाटलें व तिनें असें न करण्याविषयीं गजाननास निक्षून सांगून आपल्या मुलापाशीं गुप्त गोष्ट उघड केल्याचा तिला पश्चात्ताप झाला व तिनें अशी शापोक्ति काढिली कीं, जी स्त्री आजपासून आपल्या मुलाजवळ गुप्त कथन करील तिची जगांत छीःथूः होईल व ती अतिशय दुःख पावेल. याप्रमाणें विषण्ण झालेल्या मातुश्रीस पाहून गजाननास परम दुःख झालें. त्यांनीं भवानीची प्रार्थना करून तिला सांगितलें कीं, यांत मीं जें कांहीं भाषण केलें तें विनोदानें. यथार्थता त्यांत बिलकुल नव्हती, क्षमा असावी. याबद्दल काय करावें याचा निर्णय मी, स्कंद व जया असे त्रिवर्ग मिळून यथायोग्य करूं, मनांत काळजी धरूं नये.

याप्रमाणें तिघांनीं मिळून विचार करितां हें कार्य भगवान् गौतुममुनी यांच्याशिवाय इतरांच्यानें व्हावयाजोगें नाहीं असें ठरलें. जपतपादि साधनांनीं चंद्रचूडास प्रसन्न करून घेण्यास तेच समर्थ आहेत, तेव्हां ते कोणत्या मार्गानें या कार्यास प्रवृत्त होतील हें पाहावें, असा हेतु मनांत धरून जयेसहवर्तमान गणेश गौतमाश्रमीं ब्राह्मणरूपानें आले. अनायासें त्यासमयीं पृथ्वीतलावर अवर्षण पडल्यामुळें निराधार होऊन पुष्कळ ऋषिगण त्या ठिकाणीं मिळाला होता. कारण, इतरत्र जरी संकटकाल आलेला होता, तरी हें क्षेत्र सस्यसंपन्न असे व आलेल्या मंडळीची

शुश्रुषा करण्यांत गौतममुनी सदैव तत्पर असत. कालांतरानें जिकडे तिकडे सुबत्ता झाल्यावर त्या ठिकाणीं आतां काय ह्मणून रहावें असें सर्वांस वाटूं लागलें; परंतु गौतममुनीनीं हा आश्रम आपलाच आहे वगैरे उक्त शब्दांनीं आग्रह केल्यानें ते निरुत्तर झाले. तेव्हां साहजिकपणें आज्ञा होत नाहीं असें पाहून गणेशरूपी मुनीनें सर्वांचीं अशी समजूत केली कीं, मी जें काय ह्मणेन त्याला तुह्मीं सर्वांनीं पाठबळ दिल्यास मी योजना करितों. व मी जी योजना करणार आहें, तीपासून सर्व जगाला उपकार असाच परिणाम व्हावा अशी करणार आहें. असें ह्मणून गजाननांनीं जयेस ' गाय हो ' अशी सूचना केली व तिनें अगदीं मरतुकड्या गाईचें रूप धारण करून ज्या ठिकाणीं गौतमऋषी साळी उत्पन्न करीत होते तेथें जाऊन ऋषीवर्यांनीं निवारण करितांच मोठा हंबरडा फोडून जमिनीवर मृतप्राय पडून रहावें असें सुचविलें. या प्रमाणें तजवीज करून गणेशमुनी इतर मंडळीसह निरोप मागण्याकरितां गौतमऋषीकडे गेले. इतक्यांत् गाय शेत खात आहे असें पाहून दर्भाचे काडीनें तिला गौतमऋषींनीं निवारलें. त्यायोगें ती गाय उच्चस्वरानें हंबरून जमिनीवर धाडदिशी पडली. हें कृत्य पाहतांच ब्राह्मणमंडळींत मोठा हाहा:कार उडाला. गौतममुनींनीं गोहत्या केली असें जो तो बोलूं लागला. वास्तविक रीतीनें ती गाय मरण पावली नव्हती, परंतु अगदीं आसन्नमरण अशी दिसली. त्या प्रसंगीं गणेशमुनी पुढें होऊन त्यांनीं आह्मी आतां येथें राहत नाहीं, आह्मी तुमचें प्रायश्चित झाल्यानंतर पुनः येऊं

असें सांगितलें. लीनतापूर्वक या अपराधाबद्दल प्रायश्चित कोणतें केलें ह्मणजे मी पूनित होऊन मृतप्राय झालेली गाय उठेल, असें गौतममुनींनीं विचारल्यावर गणेशमुनींनीं सांगितलें कीं, श्रीशंकरास प्रसन्न करून घेऊन त्यांच्या जटाजूटीं जी गंगा आहे ती मागून घेऊन तिच्यांत स्नान केल्यावर तुह्मी पवित्र व्हाल, करितां त्या उद्योगाला लागा. याप्रमाणें सांगून सर्व मंडळी निघून गेल्यावर गौतमऋषींनीं अंतर्दृष्टीनें हें काय कृत्य असावें असें पाहिलें असतां त्यांस सर्व, खरा प्रकार समजून आला व हें कृत्य जगदुपकारक होणार असें मनांत आणून त्यांनीं कष्टतर तपश्चर्या आरंभिली. गंगेसाठीं गौतममुनी तपश्चर्या करीत आहेत हें वर्तमान नारदमुनीस ज्ञात झाल्यावर ते गंगेकडे गेले व त्यांनीं तिला हें वर्तमान कळविलें. ही गोष्ट ऐकून गंगेस फार काळजी उत्पन्न झाली. तिच्या सख्यांना हें वर्तमान कळल्यानंतर त्यांनीं रंभादिअप्सरांस तपश्चर्येस विघ्न करण्यास पाठविलें. अप्सरोगणांनीं गौतमाश्रमीं जाऊन नानाविध उपायांनीं तपोभंग करण्याची खटपट केली, परंतु ती सर्व व्यर्थ झाली. पुढें जटिला नांवाची एक राक्षसीण गंगेची मैत्रिण होती, ती आपण होऊन तपोभंग करण्यास गेली. तिनें अहिल्येचें रूप धारण करून ऋतुमती असल्याचें सांगून समागमसुखाविषयीं प्रार्थना केली. हें करणें खऱ्या अहिल्येचें नसावें असा संशय येऊन गौतमांनीं समाधि लावून ताडिलें कीं, ही जटिला आहे. तेव्हां त्यांनीं तिला तूं ब्रह्मगिरीवर नदी होऊन पडशील असा शाप दिला. तदुत्तर शापमोचनाबद्दल प्रार्थना केल्यावर तिला

उश्शाप मिळाला कीं, गोदावरीशीं तुझा संगम झाल्यावर तूं मुक्त होशील. याप्रमाणें विघ्नांची अडचण संपल्यावर पुनः गौतममुनींनीं तपश्चर्या आरंभिली. निर्विघ्न तपश्चर्या झाल्यावर शंकर प्रसन्न होऊन ‘ वर माग ’ असें ह्मणाले. तेव्हां जटाजूटीं असलेली गंगा मला स्नानार्थ पाहिजे असें गौतमांनीं सांगितलें. त्यावर ‘ तथास्तु ’ असें शंकर बोलले व त्यांनीं गंगेस बोलाविलें, परंतु ती येत नाहीं असें पाहून त्यांनीं तांडवास सुरुवात केली. त्याचे योगें त्रिलोक अगदीं घाबरून गेले. तथापिहि गंगा बाहेर येईना, तेव्हां जटा हातांत धरून त्या ब्रह्मगिरीवर त्यांनीं आपटल्या, तेव्हां गंगा बाहेर पडली. ती बाहेर निघालेली पाहतांच गौतम-मुनींनीं तिला नमस्कार केला व बहुत स्तुति केली व देवांनीं पुष्पवृष्टि केली. परंतु तिच्या मनांत रोष अस-ल्यानें ती गुप्त झाली. त्यावर गौतमांनीं तिची नानाप्रकारें स्तुति केल्यावर ती उंबराचे झाडाच्या मुळाशीं उत्पन्न झाली. त्या ठिकाणीं गौतमांनीं प्रथमारंभीं स्नान गंगेंत केलें व तें ‘ गंगाद्वार तीर्थ ’ या नांवानें प्रसिद्ध आहे. पर्वतावरून खालीं आल्यावर तो ओघ आपणांस दिसेल असें वाटलें होतें, परंतु इकडे तिकडे पाहतां तो कोठेंच दिसेना. तेव्हां कनखल नांवाच्या धान्याच्या खळ्याच्या ठिकाणीं येऊन पाहतात तों त्यांस त्याच्या पश्चिमभागीं तो गंगौघ दृष्टीस पडला. नंतर गौतमांनीं त्या ठिकाणीं कुशांनीं तिला परिवेष्टिलें, यावरून त्या तीर्थास ‘ कुशावर्त ’ असें नांव पडलें. हें तीर्थ फारच पवित्र आहे. ह्याबद्दल ग्रंथांतरीं असें वर्णन आहे:—

कुशेनावर्तिता गंगा गौतमेन महात्मना ।
कुशावर्तमिति ख्यातं तीर्थं ह्यनुपमं भुवि ॥
दशपंचधनुःप्रमाणमुर्ध्वमवनौ षष्टि धनुं विविस्तृतं ।
परिवृत्य कुशेन निर्मितं मुनिना गौतमशर्मणा हि तत् ॥

याप्रमाणें ह्या क्षेत्राचा पौराणिक इतिहास आहे. याशिवाय या ठिकाणीं असलेल्या तीर्थादिकांचें वृत्त संक्षेपानें अन्यत्र दिलेलें आहे.

---

## भाग २ रा,

### ऐतिहासिक माहिती.

पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरिता ।
विपर्यासं यातो घनविरलभावः क्षितिरुहाम् ॥
बहोर्दृष्टं कालादपरमिव मन्ये वनमिदं ।
निवेशः शैलानां तदिदमिति बुद्धिं द्रढयति ॥

उत्तररामचरिते भवभूतिः—

श्रीक्षेत्र त्र्यंबक हा गांव मुंबई इलाख्यांत नासिक जिल्ह्यामध्यें आहे. नासिक शहरापासून हा गांव पश्चिमेस १८ मैलांवर आहे. पूर्वकाळीं ज्यावेळीं आगगाडीची सोय झालेली नव्हती, तेव्हां पायगाडीनें येणारे यात्रेकरू लोक यथाशास्त्र यात्राविधि करणारे असल्यानें बहुतेक प्रथमतः त्र्यंबकेक्षत्रीं येऊन नंतर नाशकास जात असत असें दिसतें. परंतु सांप्रतकाळीं सोईकडेच लोकांचा कल झाला असल्यानें उलट यात्राविधि करतांना दिसतात. याबद्दलचा

उहापोह कुशावर्तयात्राविधिवर्णनांत करूं. नासिक शहरापासून क्षेत्र त्र्यंबकपावेतों चांगली पक्की सडक झाली असल्यानें टांग्यानें दोन अडीच तासांचा रस्ता झालेला आहे. या प्रकारची सडक होण्यापूर्वींचा रस्ता फारच कठिण होता. ठिकठिकाणीं भयंकर उतार, रस्त्यांत मोठमोठाले धोंडे, नद्यानाल्यांस पूल नाहींत, असा प्रकार असल्यानें बराच मार्ग पायीं चालणें सुखावह वाटत असे. सांप्रत ती गैरसोय अगदीं नाहींशी झालेली आहे. मार्गावर ठिकठिकाणीं पाण्याची सोय आहे. प्रदेश रुक्ष नाहीं व पर्वतसन्निधानानें दिसून येणारी भूदेवीची विषमता इहींकरून पांथस्थाचें चित्त विषण्ण होत नाहीं. त्याचप्रमाणें मध्यंतरीं गांवेंही लागतात. नासिक सोडल्यावर तीन मैल मार्गक्रमण झाला कीं, डावे बाजूस सातपूर नांवाचा गांव लागतो. हा गांव देशवळ असून येथें भुईमूग व ऊंस पुष्कळ पिकतो. त्यापुढें पिंपळगांव सहाव्या मैलानजिक आहे. हा गांव इनाम आहे व येथील जहागिरदार ओक ह्या उपनांवाचे असून ते शहर नासिक येथें राहतात. नासिक शहरीं तेथील अबालवृद्धांस माहित असलेली ओकांची कचेरी या जाहागिरदार ओकांचीच आहे असें समजतें. पिंपळगांवीं पुरातनकाळीं शेंकडों रुपये खर्च करून इरसाल आंब्यांच्या लागवडीनें बनविलेल्या आंबराया आहेत. हंगामांत या गांवाहून आंबे शहर नासिक येथें व इतरत्र विक्रीसाठीं जातात. यापुढें नवव्या मैलाशीं महिरावणी नांवाचा गांव आहे. या गांवापावेतोंच प्रदेश देशवळ घाटाचा आहे. यापुढें डांगी मुलूख लागतो. हवा-

पाणी व बरसात या बाबतींत ह्या दोन्ही प्रदेशांत बरीच भिन्नता असते. महिरावणीच्या पुढचा गांव खांबाळें हा आहे. हा गांव सडकेपासून अंमळ अंतरावर आहे. या पुढच्या तीन कोसांत अंजननेरी व पेगलवाडी असे दोन गांव आहेत. परंतु ते दोन्हीहि सडक सोडून अंमळ दूर आहेत; परंतु प्रसंगविशेषीं या जवळपासच्या गांवाचा उपयोग प्रवासीजनांस पुष्कळ होतो. चौदाव्या मैलाशीं आल्यावर त्या ठिकाणीं गणेशखिंड लागते. तेथून अंजनाचलाचा रम्य देखावा दिसतो. त्या पर्वतावर झाडी पुष्कळ असून तेथें एक तलाव आहे व तेथील हवा सुखावह व थंड अशी असल्यानें उन्हाळ्यांत साहेबलोक त्या ठिकाणीं येऊन राहतात. हें ठिकाण दोन कोसांवर असून उंचवट्यावर असल्यानें येथून आपणास क्षेत्र दिसेल असें पांथस्थास वाटणें साहजिक आहे; परंतु यांसबंधांत त्याची फसगत होते. त्र्यंबकचे डोंगरहि या ठिकाणाहून पुरतेपणीं दिसत नाहींत, मग गांव दिसण्याचें नांव कशाला ? ही खिंड सोडून पिशाच्य ओहोळाच्या माथ्यावर आल्याविना त्र्यंबकचे डोंगर दिसत नाहींत. तेथून ते स्पष्टपणें दृग्गोचर होतात. ब्रम्हागिरीचीं ५ लिंगें व गंगाद्वाराची खिंड वगैरे स्पष्ट दिसूं लागतात. परंतु गांवाचा पत्ताहि लागत नाहीं तो नाहींच. तदनंतर पुनः मार्ग बदखलीचा येऊन तीं स्थानें आपल्या दृष्टीआड झालीं आहेत असें वाटतें. एक मैलावर ह्मणजे १६ वे मैलानजीक बाणगंगा नदी लागते. ती त्र्यंबक गांवाची पूर्वसीमा आहे. दरसाल विजयादशमीच्या दिवशीं या बाणगंगेला उल्लंघून श्रीत्र्यंबक-

राजाची स्वारी समारंभानें येत असते व सीमान्तपूजनविधीचा थाट होतो. ही नदी पर्जन्यकाळांतच कायती चांगली वाहणारी असते; उष्णकाळांत बहुतेक भागांत कोरडी असते. या नदीची उतरण चढून गेल्यावर माथ्यावर उजवे बाजूस प्रयागतीर्थ नांवाचें प्रसिद्ध तीर्थ असून डावे अंगास निर्वाणी गोसावी यांचा आखाडा लागतो. गांवाच्या हद्दींत आपण आलों असावें असें वाटसरास वाटतें, परंतु तशी स्थिति नसते. गांव या ठिकाणाहून बरोबर दोन मैलावर लागणारा आहे. या तीर्थाची बांधणी फार सुबक आहे. हें तीर्थ भरतखंडास ललामभूत असलेल्या व औदार्यादि गुणांबद्दल विख्यात असलेल्या अहिल्याबाई होळकरणीनें बांधून काढिलें आहे. प्रांतभागीं आम्रादिवृक्षांची घनदाट छाया असून उत्तरतीरावर थोडासा उदीमही त्या त्या नजीकच्या शेत मालकांनीं केलेला असल्यामुळें हा वेळपावेतों प्रवासश्रमानें थकून गेलेल्या पांथस्थास हें स्थान परम आल्हादजनक वाटतें. व ज्या क्षेत्राच्या प्रांतभागावर याप्रमाणें रमणीय ठिकाणें आहेत त्यास मूळ क्षेत्रीं कितीतरी वर्णनीय स्थळें असावींत याबद्दल कल्पनातरंग उठूं लागतात. व सावकाशपणें यथाविधि यात्रा करणारास या क्षेत्राबद्दल धर्मबुद्धीनें धन्यताच वाटूं लागते.

हें ठिकाण सोडून पुढें मार्गक्रमण करतांना एक साधारण उतार लागून थोडीशी चढण लागते. या चढणीच्या डावे बाजूपुढील टेंकडीस दावल मुलखांची टेंकडी असें ह्मणतात. त्या टेंकडीवर एक पिराचें स्थान असून

तें महमदीय धर्माचे उपासकांनीं पवित्र मानिलेलें आहे. या ठिकाणाहून मूळ क्षेत्र सुमारें एक मैल अंतरावर आहे. येथून पुढें सडकेच्या डावे बाजूस लहान लहान कौलारू घरें दिसूं लागतात. हीं घरें क्षेत्रींच्या वृत्तिवंत भिक्षुकमंडळींनीं यात्रा पाहण्याकरितां बांधलेलीं आहेत. यात्रा पाहण्याकरितां ह्मणून जें विधान केलें आहे तें एक विशिष्टार्थ द्योतक आहे ह्मणून त्याचा खुलासा करणें इष्ट आहे. येथें येणाऱ्या यात्रस्थांचे लेख लिहून घेण्याची वहिवाट फार पुरातनकाळापासून भिक्षुकमंडळींनीं ठेविली आहे, त्यामुळें ज्याजवळ ज्याच्या पूर्वजांचीं नांवें निघतील तो त्या यात्रस्थाचा उपाध्याय मानिला जातो. याकारणानें कोणाचा कोण उपाध्याय आहे हें नामावळीवरून ठरविणें, ह्याचें नांव यात्रा पाहणें आहे. यासंबंधाचा जास्त उहापोह ग्रामवर्णनभागांत लोकवस्तीविषयीं ज्या ठिकाणीं वर्णन करूं तेथें करणार आहों. प्रस्तुत प्रसंगीं यात्रस्थास ग्रामसीमेवर आणून पोहोंचविणार आहों. अस्तु. यात्रेचा जसा थेवा असेल त्याप्रमाणें लांबवर अगर नजीकच भिक्षुकमंडळी भेटूं लागते. आलेला यात्रेकरी इतस्ततः दृष्टिनिपात करून आपणास काय काय अभिनव आढळतें याबद्दल तर्क करण्यांत ज्यावेळीं गुंग असतो व विशाल पर्वत, रम्य झाडी वगैरे उदात्त सृष्टिचमत्कार पाहून त्याचें मन भांबावून गेलेलें असतें अशावेळीं भेटणारी भिक्षुक मंडळी "आपलें नांव काय? आपलें उपनांव काय? आपलें मूळ गांव कोणतें? आपण हल्लीं कोठें राहतां" वगैरे प्रश्न करूं लागतात. या प्रसंगीं शांतवृत्तीचा यात्रेकरू

असल्यास मनाचें तावत्कालपावेतों आकलन करून भिक्षुकमंडळींच्या प्रश्नांची यथायोग्य उत्तरें देतो, परंतु ते जर तितका गंभीर नसला, तर मग त्यास ह्या केलेल्या प्रश्नांचा त्रास वाटून त्रासिकपणानें योग्य अशीं उत्तरें देत नाहीं; व योग्य उत्तरें मिळाल्याशिवाय भिक्षुकमंडळीचें समाधान होत नसल्यानें ते पुनः पुनः तेच ते प्रश्न करावयाला लागतात. यामुळें प्रसंगविशेषीं तामस स्वभावाचाच विचारणारा व विचारलेला असल्यास शिव्यांगाळीवर प्रसंग येतो. असे प्रकार घडणें उभयपक्षींहि श्रेयस्कर नाहीं. यालेकऱ्यास भिक्षुक उर्मट वाटतात व भिक्षुकांस यात्रेकरू माथेफिरूं दिसतो. या प्रसंगीं उभयतांकडून होणारा उतावीळपणा थोडासा जर कमी होईल, तर असे विपरीत प्रसंग घडणार नाहींत. ही प्रश्नोत्तररूपक्रिया कायमचा निर्णय होईपर्यंत चालते, व निर्णय झाला असला तरीहि ज्यांस तो कळला नसतो ते भिक्षुक साहाजिकपणें प्रश्न विचारतातच. यासंबंधांत विचारणारे अनेक तऱ्हेचे व प्रकृतीचे असून उत्तर देणारा एकटा पडतो. यामुळें तितका नेटदार नसल्यास बिचारा त्रासून जातो. असो; हीं सर्व प्रश्नोत्तरें चालू असतांहि प्रवाशी मार्गक्रमण करीतच असतो. मार्गक्रमण चालू असतांना हें काय आहे? असे प्रश्न तो गाडीवानास अगर तज्ज्ञास विचारीत असतो. ही उजवे बाजूस दिसणारी टेकडी, तिचेवर घनदाट वृक्षराई दिसत आहे, तो नील पर्वत आहे, हा समोरचा पर्वताचा भाग जो आहे त्यास गंगाद्वार ह्मणतात, तें पहा त्र्यंबकराजाच्या देवाळयाचें सुवर्णमय शिखर, करा शिखरदर्शन,

ही पहा गंगानदी. याप्रमाणें दूरचीं ठिकाणें पाहून त्या त्या स्थलांच्या दर्शनानें पूनितचित्त झालेला यात्रेकरू जेव्हां नजीक दिसणारी गंगानदी पाहतो त्यावेळीं त्याचें चित्त अंमळ खिन्न झालेलें असें दिसतें. पवित्र गोदावरीचा खळखळ वाहणारा अमृतप्राय उदकमय प्रवाह आपणास दिसून येईल असें ज्याच्या मनांत आलेलें असतें व जो कर्मठ यात्रेकरी आपल्या चित्तांत योजीत असतो कीं, मीं गंगाबाई पाहिली कीं वंदनमार्जनादि करीन, त्याची अगदीं निराशा होते; कारण त्या ठिकाणचें गोदावरीचें पात्र फारच संकोचित असून प्रवाह मुळींच दिसत नाहीं. पावसाळ्यांत मात्र तेथें धार असते. गंगानदी उतरून वर आल्यावर गांव चांगलें स्पष्ट दिसूं लागतें. याप्रमाणें चाललेलें मार्गक्रमण गांवच्या म्युनिसिपालिटीचें नाकें येतांच बंद होतें. त्या ठिकाणीं गाडीवाल्यास दस्तुरी दर गाडीस दोन आणेप्रमाणें द्यावी लागते, व यात्रेकरूस दर माणसीं दोन आणेप्रमाणें कर भरून पावती घ्यावी लागते. हा सर्व विधि होईपर्यंत मार्गक्रमण बंद राहतें. या ठिकाणीं बहुधा आलेला यात्रेकरू कोणाचा यजमान आहे याचा निर्णय लागतो; नच लागल्यास जो भिक्षुक प्रथम भेटला असेल तो त्या यात्रस्थास आपल्या घरीं घेऊन जातो, व त्या ठिकाणीं दुसरे कोणी त्याच्या पूर्वजाचे लेख काढिल्यास लेख काढणारा, व लेख न निघाल्यास प्रथम भेटणाराच त्या यात्रेकऱ्याचा उपाध्याय बनतो. १८ मैलांचा प्रवास करून थकून गेलेल्या व प्रश्नांचीं उत्तरें देऊन त्रास पावलेल्या यात्रेकऱ्यास त्याच्या

उपाध्यायाच्या घरीं विश्रांति घेण्यास सवड देऊन आपण ह्या मध्य अवकाशांत या स्थलाबद्दलची कांहीं ऐतिहासिक माहिती हुडकून काढूं.

हें स्थळ क्षेत्र या दृष्टीनें फार पुरातन काळापासून सुप्रसिद्ध असल्याबद्दलची माहिती अन्यत्र आहेच. त्याच-प्रमाणें अलीकडच्या कालांत या ठिकाणास थोडेसें ऐति-हासिक महत्वहि आलेलें होतें. सुमारें दोन हजार वर्षां-पूर्वी ज्यानें कोणीं हें स्थळ पाहिलें असेल व तोच जर आज तें पाहूं लागला, तर त्यास आरंभींच आपण पहिलेंच क्षेत्र पाहत आहों अगर हें अन्य स्थल आहे अशी आशंका आल्यावांचून राहणार नाहीं. परंतु पर्वतसन्निधानच त्याचे शंकेचें निरसन करणारें कायमचें साधन असल्यावरून भागाच्या आरंभीं जें अवतरण दिलें आहे, तें यथार्थ आहे असें वाचकांस समजून येईल. ऐतिहासिक माहिती लिहून ठेवण्याची पद्धति आपल्या लोकांत फारशी प्रचलित नस-ल्यानें क्रमवार इतिहास लागणें फारच दुर्घट झालेलें आहे. तथापि मिळालेल्या माहितीची यथानुक्रमसंगति लावणें प्रत्येक समंजस इतिहासज्ञ पुरुषाचें कर्तव्य आहे. स्थल-विशेषाची माहिती मिळाल्याशिवाय प्रांताची माहिती सम-जणार नाहीं, व प्रांताप्रांतांची माहिती मिळवूनच देशाच्या माहितीचा इतिहास होणार. अस्तु.

आज ४०० वर्षांवर काल लोटला. त्यावेळीं सांप्रतचें सुरम्य क्षेत्र अगदीं निर्जन असावें असें वाटतें. भयानक ओसाड अरण्यांत वस्ती करणारे ह्या ठिकाणचे लोक कोळी, ठाकूर, वारली अशाच प्रकारचे असावेत. कारण, अरण्य-

संचार करून उपजीविका चालविणें, अवघड ठिकाणीं प्राथमिक गरजांचा पुरवठा करून देहयात्रा ढकलणें, जवळपास जें कांहीं उत्पन्न करतां येईल तें करून घेऊन अथवा वन्यफळें व मुळें मिळवून धैर्य करून राहणें, असेच लोक करूं शकतात. याबद्दल सांप्रतच जर कोणास प्रत्यक्ष उदाहरण पाहण्याची जिज्ञासा असल्यास तसे भूभागही याकाळीं उपलब्ध आहेत. नासिक जिल्ह्यापैकीं पेंट या नांवाचा जो तालुका आहे, त्यांतील कांहीं अरण्यपरिपूरित भागांत, की ज्या स्थलीं जाणें साधारणपणें सुधारलेल्या मनुष्यासही दिवसास भयप्रद वाटणार, त्या ठिकाणांत वारली लोक महान् महान् दरकटांतून गवती झोंपड्या शीततापनिवारणार्थ बांधून स्वच्छंद एकटे दुकटे विहार करीत आहेत. त्या काळीं त्र्यंबकवाडी ह्मणून या स्थळाला ह्मणत असत. या ठिकाणापासून दोन अडीच कोसांवर अंजनाचल पर्वताच्या पायथ्याशीं अंजननेरी नांवाचें जें गांव आहे तें ह्या वेळीं मोठें असावें असें मानण्यास बराच पुरावा मिळतो. तेथील जुनीं देवळें, इतस्ततः पडक्या इमारती व लेख ह्या वरील विधानाची सत्यता निर्णित करितात. मुसलमानांची सत्ता या प्रदेशावर होण्यापूर्वीं गौळीराजांचा अंमल त्र्यंबक व त्या भोंवतालचा प्रदेश यांवर चालू होता. राजसत्ता अबाधित एकाच घराण्याकडे अगर लोकांकडे चालत आलेली नाहीं. कारण राज्यलक्ष्मी स्थिर असूं शकत नाहीं. ह्या नियमास अनुसरूनच गवळीराजांची या प्रदेशावरील सत्ता नाहींशी होऊन ती मुसलमानांच्या हातीं गेली.

राज्यरक्षणासाठीं व स्वपक्षाचे संरक्षणाकरितां दुर्ग बांधावयाची चाल बहुतकाळपासून सुरू असलेली याही काळीं चालू होतीच. अशा प्रकारच्या जागा दोन प्रकारच्या असतात. एक भुईकोट व दुसरे डोंगरी. पहिल्या प्रकारापेक्षां दुसरा प्रकार जास्त मजबूत असतो. मोंगली अंमल सुरू होण्यापूर्वीं त्रिंबकच्या डोंगराचा डोंगरी किल्ला बनविलेला होता किंवा नाहीं याबद्दलचा खात्री पटविणारा पुरावा उपलब्ध झाला नाहीं; परंतु हें निश्चयात्मक सांगतां येतें कीं, मोंगली अंमलांत या ठिकाणीं किल्ल्याची व्यवस्था असून त्या प्रकारास योग्य त्या तजविजी करून ठेविल्या होत्या. कारण, त्याचे अवशेष भाग अद्याप साक्ष पटवीत आहेत. ह्यासंबंधीं कांहीं ऐतिहासिक माहिती उपलब्ध झालेली खालीं दिली आहे. इकडच्या प्रदेशावर जें मुसलमानी राज्य स्थापित झालें तें ब्राह्मणी नांवानें प्रसिद्ध आहे. या मुसलमानी अम्मलास ब्राह्मणी नांव पडण्याचें कारण या राज्याचा संस्थापक एक मुसलमान प्रथमतः गंगो नांवाच्या ब्राह्मणाच्या घरीं चाकर होता. त्याच्या धन्यानें त्यास उत्तम प्रकारें वागवून त्याला आपलें नशीब काढण्यास उत्तेजन दिल्यावर धन्याचा कृतोपकार स्मरून हसन गंगो बहामनी असें त्यांनीं आपणांस ह्मणविलें. ह्या घराण्याकडे राज्यसत्ता अबाधित अशी दीडशें वर्षेंपावेतों होती. त्या राज्याचे तुकडे तुकडे होऊन मूळ घराणें नाहींसें झालें. यापैकींच एक तुकडा अहमदनगरचें राज्य असा पडला. त्यास निजामशाही असें इतिहासांत नांव आहे. राज्यव्यवस्थेकरितां राज्याचे भाग पाडीत असत.

त्यास सांप्रत जसें इलाखे ह्मणतात, तसें पूर्वकाळांत सुभे म्हणत असत. संगमनेर ह्मणून सांप्रत नगर जिल्ह्यामध्यें जें एक तालुक्याचें ठिकाण आहे तें त्या वेळीं सुभेदाराचें ठिकाण होतें. व त्या सुभ्यांतच त्र्यंबकवाडी मोडत होती. परगणा कोणता होता हें कळत नाहीं. त्रिंबक येथें किल्ला असल्याकारणानें या ठिकाणीं किल्लेदार ह्मणून एक अधिकारी राहत असे. हल्लीं किल्ला या दृष्टीनें पाहणारास तो अगदीं मोडकळीस आलेला दिसून येईल. ठिकठिकाणच्या तटबंद्या, माऱ्याचीं ठिकाणें, कोठीगृहें, राहण्याच्या जागा, पाण्याच्या सोई वगैरे सर्व नादुरुस्त होऊन मोडून गेलेलें आढळेल. किल्ल्याच्या बंदोबस्ताकरितां मेटा असाव्या लागतात. त्या अद्याप ठिकठिकाणीं आढळण्यांत येतात. परंतु जे मेटकरी पूर्वीं संरक्षक असे असत, ते हल्लीं शेतीवर मोलमजूरी करून निर्वाह करीत असून आपले बापदादे राहत असलेल्या ठिकाणीं कष्टतर आयुःक्रमण करणारे आढळण्यांत येतात. या ठिकाणास ऐतिहासिकदृष्ट्या महत्व आल्याकारणानें त्र्यंबकक्षेत्र जें निर्जन अरण्यांतील भयाण ठिकाण होतें व ज्या ठिकाणीं यात्रेकरू अंजनेरीस उतरून यात्रेकरितां व देवदर्शनाकरितां सवानें व वाटाड्या घेऊन येत असत व पुनः रात्रौ परत जात असत तें लोकवस्तीनें गजबजायला लागलें; पांढरपेशी मंडळी हळूं हळूं येऊन कायमची राहूं लागली व थोडथोडा व्यापारधंदाही या ठिकाणीं चालूं झाला.

इ. स. १६३२ च्या सुमारास निजामशाहीच्या अखेरीचा काळ जवळजवळ येत चालला होता. त्यावेळीं हिंदुपद-

पादशाहीचा संस्थापक जो शिव छत्रपति याचा बाप शहाजी राजे भोसले यानें नासिक व त्या भोंवतालचा प्रदेश बळ-काविला. त्यांतच त्रिंबकचा किल्लाही शहाजी राजे यांज-कडे आला होता. ही या प्रांतावरील सत्ता मराठ्यांकडे या समयास फार वेळ टिकली नाहीं. सात आठ वर्षें पुरीं झालीं असतील नसतील इतक्यांत दिल्लीपति शहाजहान यानें हा प्रांत जिंकून घेतला. त्यांतच त्यास चांदवड व त्रिंबक किल्ले मिळाले. ह्या ठिकाणीं मोंगलाचा अंमल इ. स. १७५० च्या सुमारापावेतों होता. मोंगलांच्या अमदानींत कट्टा हिंदुधर्मद्वेष्टा जो औरंगजेब बादशहा यानें विकारवश होऊन हिंदूंचीं देवालयें व धर्म यांचा नायनाट आरंभिला होता. त्या धामधुमींतच त्र्यंबकेश्वराचें जें जीर्ण झालेलें पुरातनचें देवालय होतें त्याचा त्यानें उच्छेद करून त्याच्या नेहमींच्या क्रमाप्रमाणें नजीकच एक मशीद बांधून ठेविली होती. परंतु हिंदुधर्मानुयायांचें सुदैव म्हणूनच हें पवित्र क्षेत्र मोंगल अंमलांतून सुटून मराठ्यांच्या अंमला-खालीं पुढें आलें.

“ विनाशकाले विपरीत बुद्धिः ” ही जी एक संस्कृत म्हण आहे ती अगदीं यथार्थ आहे. पौराणिक कथांतून याबद्दलचे दाखले असून ऐतिहासिक पुरावेही पुष्कळ देतां येतील. लंकाधिपति दशकंठ याचा विनाशकाल जसा जवळ येत चालला तशी त्याची बुद्धि भ्रष्ट होऊन तो देव-ब्राह्मणांस पीडा देऊं लागला व अनन्वित कृत्यें करूं लागला. त्या वेळींच जे दूरवर पाहणारे होते त्यांनीं खूणगांठ बांधिली होती कीं, याचा अंत जवळ आला आहे.

त्याचप्रमाणे औरंगजेब बादशहासंबंधानेंहि आहे. तो जीवमान असतांच त्याच्या अनन्वित कृत्यांनीं त्याच्या उत्तर आयुर्भागीं दिल्लीपदपादशाहीची इमारत कमकुवत होऊन गेली होती. तिचा जोम नाहींसा होऊन सामान्य धक्क्यानें ती हळूं हळूं कोसळायला लागली होती. याच सुमारास दक्षिणेंत पेशवे उदयास आले. दुसरा पेशवा पहिला बाजीराव ज्याचें ठिकाणीं राजनीतिपटुत्व व शौर्यादिगुण विलसत होते, त्यानें मोठ्या हिंमतीनें दिल्लीवर स्वारी करून त्या मोडकळीस येत चाललेल्या बादशाही इमारतीस जबरदस्त धक्का दिला. या प्रतापसूर्यापुढें बादशहा अगदीं दिपून गेला व त्यानें छत्रपति शाहुमहाराज यांचेसाठीं सहा सुभ्यांची चौथाई व सरदेशमुखी ह्या दोन हक्कांची सनद करून दिली. या सनदेप्रमाणें प्रांतभर वसूल करण्यासाठीं जागोजाग पेशव्यांनीं अधिकारी नेमिले होते. यांपैकीं त्र्यंबक व आसपासचा भाग या ठिकाणचा वसूल करण्यासाठीं नारो दामोदर जोगळेकर यांना अधिकारी नेमिलें होतें. आसपासच्या प्रदेशांत स्वराज्यसत्ता ह्मणजे पेशव्यांचा अंमल व आपल्या ह्या क्षेत्राचे ठिकाणींच मोंगलाई ही स्थिति पाहून ज्यांच्या मनांत विकार होत नसतील असे थोडेच लोक त्या वेळीं क्षेत्रीं असतील. अशी विषमता असतां विकारवश न होणारा जर कोणी असेल तर तो " स वै मुक्तोऽथवा पशुः ". या दोन कोटींपैकीं एक तर तो मुक्त असावा अथवा पशु असावा. कालदेशवर्तमान पाहून वागायला पाहिजे हें योग्य; परंतु मनेच्छा धरण्यास अडचण नाहीं. नारो दामोदर हे याप्रमाणें अधि-

 ४८०८

कारी असतां हें क्षेत्राचें ठिकाण मुसलमानी सत्तेतून सुटून स्वराज्यांत कसें येईल याबद्दल विचार करीत होते. दहा बारा वर्षांच्या तेथील अनुभवानें किल्ल्यावरील सर्व कच्ची माहिती त्यास लागलेली होती. मुसलमान किल्लेदार हे स्वस्थतेच्या काळांत फारसे फिकीरीनें वागत नसत व किल्ल्यावर बंदोबस्तही चांगलासा ठेवीत नसत; अशा वेळीं एके दिवशीं संधि साधून किल्ल्यावर बंदोबस्त ढिला आहे अशी बातमी ठेवून नारो दामोदर यांनीं त्र्यंबक सूर्याजी परभू याच्या सहाय्यानें त्र्यंबकचा किल्ला पेशव्यां-करितां सर केला. या मर्दमुकीबद्दल पेशवे सरकारनें मरहूम जोगळेकर यांस तळेगांवत्र्यंबक व त्र्यंबक सूर्या-जीस परळी हा गांव असे दोघांस दोन गांव जहागीर करून दिले. त्या पराक्रमी पुरुषांचे वंशज अद्याप त्या गांवाचा उपभोग घेत आहेत.

याप्रमाणें पेशव्यांची सत्ता या ठिकाणीं स्थापन झाल्या वेळेपासून या क्षेत्राचें स्वरूप अगदींच बदललें. पूर्वींच्या काळची निकृष्ट दशा संपून भरभराट झाली. त्र्यंबकराजाचें देवालय भव्य व उत्तम कारागिरीचें प्रदर्शन होऊन बसलें. तसेंच कुशावर्तादि तीर्थें बांधलीं गेलीं. देवस्थान सुरू झाल्यापासून त्यासंबंधांतील मंडळींनीं येथें कायम वस्ती केली; त्याचप्रमाणें इतर सुखवस्तु गृहस्थहि क्षेत्र वासा-निमित्त येथें कांहीं कांहीं येऊन राहिले. तसेच वृत्तिवंत भिक्षुक यांचीहि घरांगीं वाढ पावली. वस्तीच्या मानानें व्यापारी, उदमी, मजूरदार यांचाहि गांवांत भरणा होऊन सर्व तऱ्हेनें या क्षेत्राची शोभा वाढली. याप्रमाणें ही वाढ

अशीच उत्तरोत्तर चालून हें क्षेत्र परम रमणीयतेला पावावें, परंतु पेशवाईची इमारत कोसळून पडल्यामुळें अंशतः निस्तेजता साहजिक त्यास आली. रावबाजीनीं राज्याचें उदक मालकम साहेबांचे हातावर घातल्याबरोबर जो देशभाग पेशवेसरकारच्या अंमलांत होता, तो इंग्रज सरकाराकडे गेला. त्याबरोबरच त्र्यंबकक्षेत्र व किल्ला इंग्रजांकडे आला. परंतु त्या वेळेस किल्ल्यावर बंदोबस्तासाठीं जे लोक होते त्यांना अशा प्रकारें किल्ला हवालीं करणें इष्ट न वाटून त्यांनीं थोडा वेळपावेतों दम धरून अखेरीस फितुरी झाल्याचें कळल्यावरून तो किल्ला इंग्रजसरकारच्या अधिकाऱ्याचे स्वाधीन करून दिला. या वेळीं रूपराम चौधरी हा मुख्य असून बापू गोखले सरदार यांचे हाताखालीं कसलेले असे कांहीं लोक किल्ल्यावर होते. यासंबंधांत या लोकांनीं जें धैर्य दाखविलें तें त्यांच्या धन्याच्या अनुरूपच होतें. बापू गोखले यांनीं शूरवीराप्रमाणें लढून समरांगणीं देह ठेविला होता. मी हयात असेपर्यंत आपण पळूं नका असें आश्वासन बापू गोखल्यासारख्या वीरानें दिलें असतां भित्र्या रावबाजीनें पोबारा केला व पुढचा मागचा विचार न करितां राज्यदान करण्यांत मात्र अतुल धैर्य दाखविलें. “गतंनशोचामि” ही म्हण सर्वांनीं ध्यानांत ठेविली पाहिजे. याप्रमाणें या प्रांताची व्यवस्था दयाळू इंग्रज सरकारकडे आली असतां त्यांनीं मोठ्या उदार अंतःकरणानें पेशव्यांनीं देवस्थानास करून दिलेली नक्त नेमणूक चालू ठेविली आहे. कांहीं काळपावेतों येथें महालकचेरी असे. हल्लीं ती मोडली आहे. या प्रकारची या क्षेत्रा-

बद्दलची व तदनुषंगानें व इतर गोष्टींनीं आलेल्या महत्वा-बद्दलची ही संक्षेपतः हकीकत स्थलावकाशानुरूप दाखल केलेली आहे.

---

## भाग ३ रा.

### यात्राविधि.

मूलमध्याऽवसानेषु गोदा लभ्या कलौ युगे ॥
मुंडनं तत्र कुर्याद्वै तीर्थश्राद्धं विशेषतः ॥
प्रमादाद्यो नरो मूलं हित्वान्यत्र विशेषभाक् ॥
करोति मुंडनं श्राद्धं रौरवं चाधिगच्छति ॥

इति स्कांदे.

ऐतिहासिक स्थळें, पाहण्यासारखींच क्षेत्रें व तीर्थें पहावयास जावयाचें, तेथील सृष्टिसौंदर्य पाहूनच मनरंजन करून घ्यावयाचें, केवळ सोईकडेच लक्ष देऊन आचरण करावयाचें, असा विचार मनांत धारण करणारांचा सांप्रतकाळीं लोकसमुहांत एक वर्ग उत्पन्न झाला आहे. अशा वर्गासाठीं हा भाग मुळींच नाहीं. कारण श्रद्धा ज्यास नसणार तो श्राद्ध कोठून करणार ? व भाव ज्याजवळ नसणार तो देव तरी कशाला ओळखतो? तसेंच तीर्थ बिचारें गरीब सामान्य सृष्टीस साधारण जलसंचयापेक्षांहि विमल न दिसणारें तें परम पावनीय आहे असें त्यास कसचें वाटतें? सद्हेतूनें तीर्थयात्रेस जाण्याची बुद्धि होणेंच दुर्घट आहे, कारण त्यास पूर्वार्जित लागतें. पद्मपुराणांत एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं,—

**यस्य जन्मसहस्राणां पुण्यं भवति संचितं ॥**
**तस्यैव त्र्यंबके गंतुं बुद्धिर्भवतु नान्यथा ॥**

सहस्र जन्मांत केलेला पुण्यसंचय एकीभूत जेव्हां होतो तेव्हांच त्या पुरुषास त्र्यक्षक्षेत्रास जावें अशी बुद्धि होते. अशा भाविक जनांनीं काय काय अवश्य केलें पाहिजे, ह्मणजे सामान्य यात्राविधि कोणकोणता असतो याचें संक्षेपतः या भागांत विवेचन करण्याचा विचार आहे. कारण आपलीं जीं धर्मपुस्तकें आहेत व ज्यांच्या अनुरोधानें यात्राविधि केले जातात ते ग्रंथ कांहीं संस्कृत असून कांहीं छंदोबद्ध मराठी आहेत, त्यामुळें सर्वांस ते सुलभ नसतात. अस्तु.

प्रथमतः तीर्थयात्रा करण्यास निर्णयसिंधुकारांचे मतें अधिकारी कोण आहेत तें पाहूं.

**"साग्नेः सपत्निकस्यैव यात्राधिकारः । निरग्नेस्तु अपत्निकस्यापि । स्त्रियास्तु पुत्रादिसंमत्यैव । सधवायास्तु भर्त्रा सहैव ।"**

या उक्तींचा अर्थ असा आहे कीं, गृहस्थाश्रमी असल्यास स्त्रीसहवर्तमान, बायको नसल्यास एकटेपणें पुरुषास, विधवा स्त्रियांनीं आपल्या मुलांच्या संमतीनें व सुवासिनी स्त्रीयांस फक्त आपल्या पतिसमवेतच जाण्यास अधिकार आहे. या प्रकारचा अधिकारी जो कोणी असेल त्यानें उपोषणपूर्वक पिंडविवर्जित सर्व पितरांचा उच्चार करून श्राद्ध करावें व नियमस्थ होऊन सर्व आप्तेष्टांचा निरोप घेऊन देवदर्शन करून ज्या तीर्थास अगर देवतेस जाव-

याचें असेल त्याचें स्मरण करून निघावें. पादचारी असून मार्गांत व्रतस्थ राहून एकभुक्त करून व कोणाचाहि असन्नप्रतिग्रहादि न करितां जो यात्राविधि करितो त्यास पूर्ण यात्रेचें फळ मिळतें. यानादिकांचे साहाय्यानें या यात्रा करणारास तितक्या तितक्या अंशानें कमी फल प्राप्त होतें.

गोदायात्रोद्देशानें निघणाऱ्या यात्रिकानें मूळ गोदेच्याच ठिकाणीं येऊन यात्राविधि करणें श्रेयस्कर आहे. कारण या भागाच्या आरंभीं स्कंदपुराणांतील जें अवतरण दिलें आहे तें ही गोष्ट जोरानें प्रतिपादित असल्यानें असेंच करायला पाहिजे आहे हें कबूल करावें लागेल. या ठिकाणीं सोईचा प्रश्न नसून कर्तव्याचा प्रश्न आहे. हल्लीं पुष्कळ यात्रेकरू अज्ञानतः केवळ सोईकडेसच पाहून महत्पुण्यास मुकतात व अविधि यात्रा करितात, हें पाहून फार वाईट वाटतें. थोडी गैरसोय करून पुष्कळ पुण्य मिळवून देणारी युक्ति जर त्यांच्या नजरेस येईल तर अशा प्रकारें आपली हानि करून घेण्यास कोणीहि समंजस माणुस तयार होणार नाहीं. यासाठीं यात्रेस निघतानांच मूळ गोदेच्या ठिकाणीं जाण्याचा हेतू मनांत धरून निघावें ह्मणजे मार्गांत गोदादर्शन झालें असतां तिला उल्लंघून आपण जात आहों असें घडत नाहीं. कारण या ठिकाणीं आपला मूळचा उद्देश मूळ गोदेस जाण्याचा असतोच, यासाठीं मूळ गोदास्थानाच्या जवळपास पांच पंचवीस कोसांवर येणारानें प्रथमतः मूळ ठिकाणीं येण्याची खबरदारी घ्यावी.

मागील भागांत आलेला यात्रेकरू प्रवासानें थकून जाऊन वृत्तिवंतांच्या प्रश्नांनीं त्रासून गेलेला असल्यानें त्यास आपण उपाध्यायाचे घरीं रवाना करून दिलें होतें. या अवकाशांत तो अंमळ शांत होऊन हुषार झाला असेलच; तरी त्यास पुनः परत आणून आरंभापासूनच त्यानें यात्रेचा कोणता क्रम स्वीकारायला पाहिजे आहे तो त्याचे-कडून करवूं. ह्मणजे इतर येणारे यात्रेकरूंस तो मार्ग-दर्शक होईल.

यानस्थ यात्रेकरू असल्यास त्यानें दुरून तीर्थ दिसूं लागलें कीं, जें कांहीं वाहन असेल त्याचा त्याग करून पाद-चारी व्हावें असें प्रभासखंडांत वचन आहे. " यानानि तु परित्यज्य भाव्यं पादचरैर्नरैः । " त्याप्रमाणें वाहनांतून उत-रून दुरून दिसणारी ब्रम्हागिरीपर्वताचीं जीं पांच लिंगें, त्यांस दंडवत्प्रणाम करावा व खालीं दिलेलें स्तोत्र ह्मणावें.

लिंगानि पंच तव शंकर दुर्लभानि ।
ब्रह्मेंद्रविष्णुवरुणार्कनिशेश्वराणाम् ॥
विस्फार्य लोचनयुगं पुरतः समंतात् ।
पश्याम्यहं तदखिलं तव यत्प्रसादात् ॥ १ ॥

किं किं कृतं सुकृतिभिर्मम पूर्वजैर्वा ।
पुण्यं भविष्यति न शंकर वै त्रिलोके ॥
येनातुरोभवभुजंगमवेष्टितोहं ।
त्वत्पंचलिंगनिचयं हि विलोकयामि ॥२॥
धन्यो मदीय जनको जननी च धन्या ॥
धन्यं कुलं च सकलं मम जन्म धन्यं ॥

**यन्मातृगर्भनरकार्णवंजायमानो ॥**
**ह्या लोकयामि भवतः शिखराणि पंच ॥३॥**

याप्रमाणें स्तोत्र पाठ केल्यावरहि पुनः नमस्कार करून पादचारीच गांवापर्यंत जावें व बाह्य भागींच असलेल्या हनुमंताचें दर्शन घेऊन पूर्वद्वारानें आंत जाऊन त्र्यंबक-राजाच्या देवालयाच्या शिखराचें दर्शन करावें. व देह-लीच्या ठिकाणीं नमस्कार करून तिला पादस्पर्श न करितां देवालयांत प्रवेश करावा. व आंत जाऊन देवाचें दर्शन घेतल्यानंतर कुशावर्ततीर्थावर जाऊन या तीर्थराजास नमस्कार करावा व तदनंतर उपाध्यायाचें घरीं जावें.

घरीं जाऊन थोडा वेळ पाहिजे असल्यास वाटेच्या झालेल्या श्रमाच्या दूरीकरणासाठीं किंचित् काळपावेतों विश्रांति घ्यावी. क्षेत्रीं येऊन पोहोंचणें सकाळच्या वेळीं झालें असल्यास तीर्थावर जाण्याची तयारी करून त्या-प्रमाणें तीर्थी जावें. सायंकाळ असल्यास सायंकाळीं देव-दर्शन करून दुसरे दिवशीं उपोषणपूर्वक तीर्थयात्राविधि करावा. त्यासंबंधाची सूचना उपाध्यायास मिळतांच तो सर्व तयारीसह यात्रस्थास तीर्थावर घेऊन जातो व तेथें सर्व विधि यथाशास्त्र करवितो.

प्रथमतः तीर्थराजावर गेल्यावर स्नानाच्या तयारीनें ह्मणजे शुद्ध वस्त्र नेसून व उपवस्त्र जवळ घेऊन तीर्थोदका-पावेतों जावयाचें व त्या ठिकाणीं उभें राहून पद्मपुरा-णांत सांगितल्याप्रमाणें गोदावरीची प्रार्थना करावयाची ती येणेंप्रमाणें:--

मातर्नमामि सुकृतं मम पूर्वजानां ॥
किं वा ममैव भवकोटिषु संचितं स्यात् ॥
येन त्वदीयसलिलं भवबंधहारि ॥
पश्यामि चर्मनयनेन विधेरपीड्यं ॥ १ ॥
संसारघोरगहने पतितोऽस्मि नित्यं॥
कामादितस्करशतैः परिवेष्टितोऽहम् ॥
त्वं रक्ष मामिति सदा प्रलपन् प्रधावन् ॥
त्वामत्र शंभुदयिते शरणागतोऽस्मि ॥ २ ॥
नमामि गंगे तव पादपद्मं ॥
सुरासुरैर्वंदितदिव्यरूपं ॥
भुक्तिं च मुक्तिं च ददासि नित्यं ॥
भावानुसारेण सदा नराणाम् ॥ ३ ॥

या श्लोकत्रयीनें प्रार्थना करून गौतमीस साष्टांग प्रणिपात करावा. तदनंतर अर्घ्यदान द्यावें. अर्घ्यांत श्रीफल, पंचरत्नें अगर तद्भावीं कांहीं निष्क, सुपारी, दक्षणा, पुष्पें इत्यादि पदार्थ असावेत. धर्मप्रदीपकारांनीं अर्घ्यदानाविषयीं महत्पुण्य सांगितलें असून निदान चार अर्घ्य तरी पद्मपुराणांतर्गत पुढील मंत्र ह्मणून द्यावेत. ते चार मंत्र खालीलप्रमाणें:—

ब्रह्माद्रि शिखरोत्पन्ने त्रिकंटकविराजिते ॥
गौतमप्रार्थिते गंगे गृहाणार्घ्यं नमोस्तु ते ॥ १ ॥
नमो गंगे महागंगे महादेवस्य वल्लभे ॥
वहते त्वां महादेवो गोदावरि नमोस्तु ते ॥ २ ॥

**औदुंबरतरोर्मूलाज्जान्हव्यां निसृतं पयः ॥**
**गौतमप्रार्थिते गंगे गृहाणार्घ्यं नमोस्तु ते ॥ ३ ॥**
**त्र्यंबकस्य जटोद्भूते गौतमस्याघनाशिनि ॥**
**सप्तधा सागरं यांति गोदावरि नमोस्तु ते ॥ ४ ॥**

ा रीतीनें अर्घ्यदान झाल्यानंतर " गुरात्वं शिवरूपो सिमा-स्य भवार्णवात् " असें ह्मणून गुरुजींची आज्ञा घेऊन ीर्थोदकांत प्रवेश करावा व स्नान करावें. ज्या वस्त्रासह ान केलें असेल तें वस्त्र सामर्थ्य असल्यास उपाध्यायास ावें. यापुढचा विधि ह्मटला ह्मणजे मुंडनाचा आहे. जे ाविक आहेत ते क्षौरविधि करतात, परंतु ज्यांस क्षौर रणें ह्मणजे आपल्या सौंदर्याची हानि करून घेणें आहे सें वाटतें, व ज्यांचा उद्देश क्षेत्रीं येण्यांत केवळ देश ाहण्याचाच असतो, असे लोक या कृत्यास फांटा देतात. ास्त्रतः असें करणें दोषावह आहे. चेहऱ्यावर येणारी आगंतुक सौंदर्यहानि महिन्या दोन महिन्यांत अंशतः भरून येऊन वर्षसहा महिन्यांत पुरी पुरी भरून येतेच; मग थोडक्यासाठीं महत्तर फललाभास कां अंतरावें समजत नाहीं. कालमाहिमाच असा आहे. अदृष्ट लाभाकडे दृष्टी पोहोंचत नाहीं व पुराणादि प्राचीन आप्तवाक्यें प्रमाण वाटत नाहींत. त्रिस्थली सेतु नांवाच्या धर्मशास्त्रीय ग्रंथांत यासंबंधानें विवरण करितांना अशी गोष्ट नमूद केलेली आढळते कीं, गंगादि नदीच्या तीरीं आलें असतां पूर्वींचे सर्व पापसंचय आतां आपणांस गच्ची बसणार असें वाटून भयभीत होत्साते केसांचा आश्रय करून राहतात. याकरितां

त्यांचा त्याग केल्यानें तदाश्रयानें राहणारीं पापेंही निघून जातात. तें वचन असें आहे:—

**गंगां प्राप्यसरित्श्रेष्ठां कंपते पापसंचयः ॥**
**केशानाश्रित्य तिष्ठंति तस्मात्तान्परिवापयेत् ॥१॥**

याप्रमाणें इतर ग्रंथांतरींही तीर्थावर गेलें असतां मुंडन अवश्य केलें पाहिजे असा अर्थ दाखविणारीं वचनें आढळ-तात. त्यावरून पाहतां श्रेष्ठजनाचरित जो पूर्वीपासून चालत आलेला मार्ग त्याचेंच अवलंबन करणें इष्ट आहे. ह्मणून मुंडनविधि अवश्य करावा व त्याचप्रमाणें पापें नाहींशीं व्हावीत ह्मणून प्रायश्चित्तें करावीत. याप्रकारें हा विधि झाल्यावर शरीरशुद्धयर्थ भस्म, गोमय, मृत्तिकादि स्नानें व पंचगव्यप्राशनपूर्वक मंत्रस्नानें करावीत व वित्त-शाठ्य न करितां दानें द्यावींत. शुद्ध स्नान करून मोकळें व्हावें. तदनंतर कुशावर्ततीर्थाच्या आसमन्तात्भागीं अस-णाऱ्या ज्या देवता त्यांचें पूजन करावें. देवता व त्यांचीं ठिकाणें पद्मपुराणांत जीं दिलेलीं आहेत तीं येणेंप्रमाणें:—

**जलशायी जगन्नाथः पूजनीयः प्रयत्नतः ।**
**ततः कुशेश्वरं शंभुं गौतमींच सुभक्तितः ॥**
**वायव्यां चाग्निदिग्ख्यातो नृसिंहः स्वयमास्थितः ।**
**नैऋत्यां रामचंद्रश्च लक्ष्मणेन समन्वितः ॥**
**ईशान्यामश्विनौ देवौ पूर्वस्यां पावकः स्वयं ।**
**दक्षिणस्यांतु केदारः पश्चिमस्यां कुशेश्वरः ॥**
**उत्तरे केशवो ज्ञेयो जलशायी तु मध्यमः ।**
**एतेषां तर्पणं कार्यं पूजनं च पृथक् पृथक् ॥**

यापुढें नित्य जीं संध्यादि कृत्यें असतील तीं उरकून

कुशावर्तास निदान तीन प्रदक्षिणा घालून प्रभू त्र्यंबकराज यांची पूजा करण्यासाठीं जावें. जाण्याचा क्रम, गंगेला सव्य घेऊन कनखलेश्वरापाशीं जावें व त्याचें पूजन करून नील-गंगासंगमेश्वरास पुजावें. त्यापुढें कपोतेश्वर, नंतर त्रिसंध्या, त्रिसंधेश्वर, सिद्धेश्वर, पुढें अश्वमेध तीर्थानजीक भुवनेश्वर व भुवनेश्वरी देवी, याप्रमाणें मार्गांतील देवतांचें पूजन-वंदनादि करीत करीत उत्तरद्वारानें त्र्यंबकराजाच्या देवा-लयांत प्रवेश करावा. नंतर नंदिकेश्वराचें दर्शन घेऊन देवळांत जावें. आंत जातांना उजवे बाजूस असणारे जे गणराज त्यांचें पूजन करावें. नंतर मुख्य देवता जी शंभूची त्र्यंबकेश्वर नामानें विख्यात असणारी तिचें यथा-सांग पूजन करावें. नंतर बाहेर येऊन आसमन्तात्भागीं असणाऱ्या ज्या देवता त्यांचें दर्शन करून देवास ११ प्रदक्षिणा घालाव्या; व पूर्वदरवाजानें बाहेर पडून हनुमान, शनैश्वरमहाराज वगैरे ज्या देवता आहेत त्यांचें दर्शन करावें. याप्रमाणें देवतादर्शनें व पूजनादि कृत्यें आटोपून बिऱ्हाडीं यावें. यात्राविधीचा हा प्रथम दिवस असल्यानें या दिवशीं उपोषण करावें.

दुसरे दिवशीं स्वपितरांच्या उद्धारार्थ तीर्थश्राद्ध करावें. हेंही कृत्य क्षौरविधीप्रमाणेंच अवश्य कर्तव्यांतील आहे. तें जें करावयाचें आहे तें ज्यानें त्यानें आपल्या ऐपती-प्रमाणें खर्च करून यथाविधि करावें. या श्राद्धांत व इतर श्राद्धांत जो एक विशेष भेद दिसून येतो तो नमूद करणें इष्ट वाटतें. तो हा कीं, सामान्य श्राद्धकाळीं करावे लागणारे कांहीं कांहीं विधि तीर्थश्राद्धांत वर्ज आहेत ते:-

अर्घ्यमावाहनं चैव द्विजांगुष्ठनिवेशनं ॥
तृप्तिप्रश्नं च विकिरं तीर्थश्राद्धे विवर्जयेत् ॥ १ ॥

याप्रमाणें तीर्थश्राद्ध झाल्यावर त्र्यंबकराजाचें यथाविधि पूजन करावें. यजमानास स्वतः रुद्र येत असल्यास स्वतः एकादशनीपूर्वक पूजन करावें; अशा प्रकारें स्वतः करणें जास्त श्रेयस्कर आहे. परंतु सांप्रतच्या कालांत भिक्षुकांतही सर्वांना यथायोग्य रुद्र येत असेल किंवा नाहीं याची वानवाच असल्यानें गृहस्थांस क्वचित् येत असावा असें अनुमान करण्यास अडचण वाटत नाहीं. द्रव्याची अनुकूलता असल्यास दानादिकांची मर्यादा सांगणारानें काय सांगावी ? ईश्वर जशी बुद्धि देईल त्याप्रमाणें वित्तशाठ्य न करितां आचरण करावें. सामर्थ्य नसतां भक्तिपुरःसर गंगेचा एक तांब्या भरून आणून देवावर अभिषेक केला असतां जें पुण्य लागणार तेंच यथाशक्ति सोपचारिक पूजन करणारें द्रव्य असणारास लाभणारें आहे. बहुधां अगदीं सामान्य यात्रस्थही एक एकादशनी करवितोच. त्यापेक्षां समर्थ असल्यास लघुरुद्र, महारुद्र, महापूजा वगैरे होतात. एकादशनी एक ब्राह्मण करूं शकतो. एकादशनी ह्मणजे रुद्राची अकरा आवर्तनें. अकरा एकादशन्या म्हणजे एक लघुरुद्र होतो, व अकरा लघुरुद्र ह्मणजे एक महारुद्र. लघुरुद्रास ११ ब्राह्मण, शिवाय ग्रामाधिकारी ह्मणजे उपाध्याय, जोशी, देशमुख, कुळकर्णी व महाजन ह्यांस गंगा, मारुती, गणपति व दोन देव्या यांजवर अभिषेक करण्यासाठीं बोलाविण्याची चाल आहे. अभिषेकसंबंधांत ब्राह्मणास प्रत्येकीं निकृष्ट पक्षानें चार

आणे द्यावे लागतात. शिवाय या मंडळीस भोजनास जर बोलावयाचें असेल तर त्याबद्दल चार चार आणे तरी निदान द्यावे लागतात. यात्रस्थ बहुधां देवब्राह्मण करितात; ह्मणजे देवास नैवेद्य व ब्राम्हणभोजन. त्याच वेळीं अभिषेकाचें ब्राह्मणभोजन घालतात. ज्यांस सामर्थ्य असेल तो शतब्राह्मणभोजन, सहस्रब्राह्मणभोजन, गांवभोजन वगैरे जशी अनुकूलता असेल त्याप्रमाणें करितोच. याप्रमाणें देवब्राह्मण झाला म्हणजे मुख्य यात्राविधि झाला. तदुत्तर इतर जीं तीर्थें व देवता आहेत त्यांचेसंबंधानें करण्याचीं तीं कृत्यें राहतात. इतर सामान्य यात्राक्रम येणेंप्रमाणें:—

१. पंचतीर्थी अगर अष्टतीर्थी.

२. ब्रह्मगिरीची अगर हरिहराची प्रदक्षिणा.

३. देवस्थानें व इतर तीर्थें व देवतादिकांचें दर्शन.

पंचतीर्थीमध्यें ज्या पांच तीर्थांचा समावेश होतो तीं:— गंगाद्वार, कुशावर्त, बिल्वतीर्थ, नीलांबिका देवीचें दर्शन व कनखल तीर्थ हीं होत. यद्यपि "गंगाद्वारें कुशावर्ते बिल्वके नीलपर्वते । स्नात्वा च कनखले तीर्थें पुनर्जन्म न विद्यते ॥" असा पाठक्रम आहे. तथापि साधारणतः कुशावर्तावर स्नान करून गंगाद्वारीं जाण्याचा क्रम आहे. तदुत्तर बिल्वतीर्थीं जाऊन नीलपर्वतीं येतात व अखेरीस कनखल तीर्थावर. यांतील जीं दर्शनीय स्थलें आहेत त्यांचें वर्णन दर्शनीय स्थलांचें वर्णन या भागांत देण्याचें योजिलें असल्यानें या ठिकाणीं केवळ यात्राक्रमच सांगितला आहे.

अष्टतीर्थांत येणारीं तीर्थें—बल्लाळतीर्थ, वाराणशी, मणिकर्णिकातीर्थ, गंगालयतीर्थ, रामलक्ष्मणतीर्थ, शालितीर्थ,

इन्द्रतीर्थ, कांचनतीर्थ व अहल्यासंगमतीर्थ हीं आहेत. या तीर्थांवर स्नानवंदनतर्पणादिक करावें.

ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा स्वतः करणें अगर ब्राम्हणद्वारां करविणें हा एक यात्राविधीमधीलच भाग आहे. ही प्रदक्षिणा अजमासें सात आठ कोसांची असावी, परंतु स्थूलमानानें ती दहा कोसांची आहे, असें ह्मणण्याचा प्रघात आहे. ज्या कोणास अनवाणी पादचारी चालण्याची संवय असते अशासही प्रदक्षिणा करवते, परंतु ज्यास संवय नसते त्यास ती करणें अंमळ जड जाते. तथापि जे भाविक यात्रेकरू असतात व ज्यास प्रदक्षिणेच्या मार्गावर असलेलीं पवित्र तीर्थें व स्थानें पाहण्याची उत्कंठा असते ते ती करितातच. ही प्रदक्षिणा करितांना वास्तविक रीतीनें सांगोपांग करावयाची, ह्मणजे पांच दिवसांत ती पुरी करायला येते. कारण मार्गांत येणारीं कांहीं कांहीं तीर्थें परम पवित्र असून त्या त्या ठिकाणीं श्राद्धें करावीं असा विधि आहे. ह्या प्रदक्षिणेचे ह्मणजे प्रदक्षणा करण्याचे मुख्य पक्ष तीन आहेत. एक, पांच दिवसांत आटोपायची; दुसरा, तीन दिवसांत; व तिसरा एकाहपक्ष ह्मणजे एक दिवसांत आटोपायची हा. अलीकडील काळांत यथासांग प्रदक्षिणाविधि श्रीमंत अण्णासाहेब विंचूरकर यांनीं केला होता असें सांगतात. प्रायः सामान्य लोक एकाहपक्षच स्वीकारितात. हरीहराचे प्रदक्षिणेस फारच थोडे लोक जातात. कारण, ती ह्या प्रदक्षिणेच्या दुप्पट लांब आहे.

ज्यास शक्ति असेल व ज्यास फुरसत असेल त्यानें

अवश्य प्रदक्षिणा करण्यास जावें. अनभ्यस्त, अशक्त जो कोणी असेल त्याच्यानें होणार नाहीं. यामुळें त्यानें या नादीं पडूं नये. परंतु जे कोणी तरुण सशक्त असतील व ज्यास सृष्टिसौंदर्य पाहण्याची हौस असेल त्यानें अवश्य एकवार जाऊन यावेंच. अरुणोदयापूर्वींच स्नानसंध्यादि कृत्यें श्रीकुशावर्तावर आटोपून निघाण्यास तयार व्हावें. सकाळच्या शांतवेळीं मार्गक्रमण सुखावह व आल्हाद-जनक होतें. प्रदक्षिणेला आरंभ कुशावर्तापासून असून परिसमाप्तिहि पुनरपि कुशावर्तावर येऊनच करायची असते. मार्गदर्शक चांगलासा कोणी बरोबर घेऊन प्रदक्षिणेस जाणें हितावह असतें. कारण प्रदक्षिणेचा जो मार्ग आहे तो सडके-प्रमाणें धोपट नाहीं. पायवाट दरडीमधून, खिंडींतून, माळां-तून व आवनाडींतून अशी आहे. डोंगरकांठीं जे राहणारे आहेत त्यांस विशेषता वाटणार नाहीं, परंतु जे सपाट देश-भागावर राहणारे असतील त्यांस पर्वतप्रांतभागाची निर-निराळी शोभा दिसून येणारी आहे. त्या शोभेचें साद्यंत वर्णन करणें हा ह्या विवरणाचा उद्देश नसल्यानें ती समक्ष पाहण्याबद्दलच यात्रास्थास शिफारस करून प्रदक्षिणेचा मार्ग कसा कसा जातो व मार्गामध्यें मुख्य मुख्य कोण-कोणतीं ठिकाणें लागतात याचें दिग्दर्शन करितों.

कुशावर्ततीर्थावर प्रदक्षिणेचा मनाचा संकल्प करून वंदन करून व सख्य घेऊन त्र्यंबकराजाचें देवालयांत जाऊन प्रभूचें दर्शन घेऊन व तदुत्तर प्रदक्षिणा घालून उत्तर दर-वाजानें बाहेर पडून शनी मारुतीच्या मार्गानें प्रयाग-तीर्थीं जावें. त्यापुढें ह्मणजे प्रयागतीर्थास सख्य घेतल्यानंतर

मार्ग बदलतो. प्रयागतीर्थापावेतों पूर्वदिशेस आपण जात असतों तें आतां दक्षिण दिशेकडे आपणास वळावें लागतें. नंतर कांहीं वेळानें पश्चिमेस जाण्याचा रोख लागतो. या क्रमांत मार्गानुरोधानें दिशाबदल होत असल्याकाणानें ब्रम्हगिरीस सव्य घेऊन अखेरीस त्र्यंबकेश्वराचे देवालयीं येऊन नंतर कुशावर्तावर येऊन प्रदक्षिणा संपूर्ण होतें. या मध्यवर्ती मार्गांत लागणारीं पवित्र स्थलें व तीर्थें ह्मटलीं ह्मणजे सरस्वतीवारी, रामतीर्थ, बाणगंगा, निर्मलतीर्थ, नागतीर्थ, वैतरणा, गौतमाश्रम, पश्चिम वाहिनी व धवलगंगा, शालीतीर्थ, पद्मतीर्थ, भुजंगतीर्थ, नृसिंहतीर्थ, गणेशतीर्थ, बिल्वतीर्थ, नीलांबिकादेवी व मुकुंदतीर्थ हीं होत. वाटेंत लागणाऱ्या तीर्थांचें निदान वंदन व देवांचें दर्शन घेऊन पुढें मार्ग चालायाचा हा क्रम ठेवणें प्राप्त आहे.

मोठी जी हरीहराची प्रदक्षिणा वीस कोसांची आहे ह्मणून ह्मणतात, तिचा क्रम वैतरणेपावेतों येईपर्यंत ब्रह्मगिरीच्या प्रदक्षिणेप्रमाणेंच आहे. तेथून मार्ग बदलतो, तो नृसिंहतीर्थाशीं पूर्व मार्गाशीं येऊन मिळतो. या मध्य-अवकाशांत ह्या मार्गामध्यें लागणारी स्थलें व तीर्थें ह्मटलीं ह्मणजे झारवाड, ब्रह्मकमंडलतीर्थ, सातमाळ, हरीहरतीर्थ, लेकुरवाळी देवी, किकवी ( पश्चिम वाहिनी ) हीं होत. भुजंगतीर्थापासून पूर्वोक्त क्रमानेंच कुशावर्ती यावयाचें व प्रदक्षिणा सपूर्ण करावयाची असा क्रम आहे.

पंचतीर्थी, अष्टतीर्थी व प्रदक्षिणेच्या मार्गावरील स्थलें व तीर्थें यांच्या संबंधांत पुराणोक्त प्रत्येक ठिकाणच्या महात्म्याबद्दलच्या सुरस कथा आहेत, त्या संपूर्ण दिल्या

असतां ग्रंथविस्तार फार होईल. ह्मणून तसें न करितां त्यासंबंधाचा हवाला त्र्यंबकमहात्म्यावर देणेंच इष्ट वाटतें. तथापि पुढील भागांत कांहीं विशेष स्थलांबद्दलची सामान्य माहिती देण्याचा विचार आहे.

या वर निर्दिष्ट केलेल्या देवता व तीर्थें यांशिवाय या क्षेत्रीं बरींच तीर्थें व देवता आहेत. त्यांतून मुख्य मुख्य दत्तमंदिर, सत्यनारायणमंदिर, गंगामंदिर, कृष्णमंदिर, राममंदिर, परशुराममंदिर, निवृत्तिनाथाचें देऊळ, गौतम-तीर्थ, अमृतकुंड, काशीविश्वेश्वर इत्यादि.

केवळ तीर्थयात्रोद्देशानें येणाऱ्या यात्रस्थाशिवाय या-क्षेत्रीं येणारांचे दोन वर्ग आहेत. एक नवसाच्या मौंजी करण्यासाठीं येणाऱ्यांचा व दुसरा नागबली नारायणबली करण्यासाठीं येणाऱ्यांचा. यांपैकीं पहिल्यांचे संबंधानें विशे-षतः नमूद करण्यासारखें कांहीं नाहीं. परमेश्वरास भक्तिभावानें शरणागत भाविक मंडळी होतात व नवस करितात. या शरणागतांत मोठासा भरणा स्त्रियांचा असतो. कारण, त्या जास्त भाविक असून पुत्रजन्माविषयीं जास्त उत्सुक अस-तात. पुरुषवर्ग जास्त विचारी असल्याकारणानें नवसा-सारख्या गोष्टींवर त्या । विश्वास नसतो; परंतु स्त्रियांनीं केलेले अशा प्रकारचे नवस फेडण्याचा त्यास कंटाळा वाटत नाहीं. कंटाळा न वाटण्यास स्थूलतः दोन दृश्य कारणें असावींत असें अनुमान करण्यास प्रत्यवाय वाटत नाहीं. एक तर, पुत्रजन्मोत्सव न व्हावा असें नसतें. तो पाहिजेच असतो; परंतु श्रद्धा नसल्यामुळें ईश्वरप्रसादानें तो प्राप्त झाला अशी त्याची भावना असत नाहीं; परंतु

बरेच दिवस वाट पाहून थकल्यावर नवस केल्यानंतर तो योग जुळून आला असल्यामुळें आपल्या अर्धांगीचा शब्द मोडवत नाहीं. व पुढेंमागें तुझ्यासंबंधांत अमुक अमुक गोष्टी केल्या अशी प्रौढी मारण्यास जागा होते. दुसरा फायदा व्यावहारिक आहे. तो हा कीं, अन्यस्थळीं कार्य उरकून घेण्यांत दोन पैसे कमी खर्च पडतात.

दुसरा वर्ग ह्मटला ह्मणजे नागबली नारायणबली करण्यासाठीं येणाऱ्यांचा. आपल्या वंशांत सद्गति न होतां मृत झालेले तसेच राहिले असल्यास ते पुढील पिढ्यांत संततीचा प्रतिबंध करितात. ती बाधा दूर होऊन संतति व्हावी ह्मणून अगर भूतबाधानिवारण करण्यासाठीं या क्षेत्रीं येणारी यात्रस्थमंडळी बरीच असते. त्याचप्रमाणें या जन्मीं अगर जन्मांतरीं नागहत्येचें पातक घडलें असल्यास त्या दोषामुळें होणारी जी नानाविध पीडा तीही याच्याप्रयोगानें दूर होते. नागबली नारायणबली असे दोन विधानोक्त विधि करावयाचे असतात. व्यवहारांत त्या संस्कृत शब्दांऐवजीं नागनारंबळ ह्मणण्याचा परिपाठ पडला आहे. हा भाग इतरत्र कोठें होत नाहीं. हें लोकविश्रुत असतां कोणी कोणी लोक निष्कारण अन्य ठिकाणीं हें कृत्य उरकून घेतात व पीडा नाहींशी न झाल्याकारणानें याच क्षेत्रीं येऊन तो भाग करितात. या कारणानें दुबार खर्च मात्र गरीब यात्रस्थांचा होतो. हा विधि या क्षेत्रींचा विशेष असल्यानें ग्रामाधिकाऱ्याच्या अनुमतिशिवाय उपाध्यायास या प्रकरणांत आरंभ करितां येत नाहीं. यावेळीं यजमानाची ऐपत लक्षांत घेऊन त्याजवळून अधिकाऱ्याची बात

मागून घेऊन परवानगी मिळते. प्रसंगविशेषीं आलेला यात्रस्थ अत्यंत गरिबबावे देण्यास नालायक आहे असें त्यांच्या निदर्शनास आल्यास त्यास तशीच परवानगी देतात. केव्हां केव्हां वित्तशाठ्य होत आहे अशी खात्री झाल्यास ऐपतीनुसार बाब मिळाल्याशिवाय अनुज्ञाच मिळत नाहीं. यासंबंधांत सामान्यतः आपलें खरें दरिद्र सांगून लीनतापूर्वक परवानगी मिळविणें फायद्याचें होतें. असा ज्या ठिकाणीं स्पष्ट व्यवहार चालतो त्या ठिकाणीं अडचण मुळींच येत नाहीं.

संक्षेपतः यासंबधाचा विधि ह्मणजे दिनशुद्धि पाहून या विधीस आरंभ करावयाचा. प्रथम दिवशीं नागाचा पुतळा करून त्याचे मनुष्याच्या प्रेताप्रमाणें दहनक्रियादि और्ध्वदेहिक संस्कार करावयाचे. यासंबंधानें अशौच एक दिवस धरावें लागत असून दुसरे दिवशीं शुद्धि होते; त्यानंतर नागबलीप्रमाणेंच नारायणबलीचा विधि. पुतळा करून त्याचे संस्कार करितात व अशौच धरितात. याप्रमाणें दोन दिवसांचें कृत्य करून तिसरे दिवशीं पुण्याहवाचन करून शुद्धता करून ब्राह्मणभोजन घालितात. या उत्तरक्रियेसंबंधीच्या भोजनास चांगले चांगले विद्वान् लोक जाण्यास अनमान करीत नाहींत. असा प्रघात या क्षेत्रीं दृष्टोत्पत्तीस येतो.

# भाग ४ था.

## " दर्शनीय स्थलें. "

प्रायो य स्किंचिदपि प्राप्नौत्योत्कर्षमाश्रयान्महतः ।

या भागांत या क्षेत्रीं असणाऱ्या परमपवित्र तीर्थांचें, देवालयांचें, मंदिरांचें व इतर स्थलांचें इतिवृत्त देण्याचा हेतु आहे. नुसती नामावळी देऊन वाचणाराचें व पाहणाराचें समाधान होणार नाहीं, जाणून या विषयाच्या प्रतिपादनाकरितां स्वतंत्र भागाची योजना केली आहे. या ठिकाणीं पुराण प्रसिद्ध अशीं तीर्थें व स्थळें फार आहेत. त्या सर्वांचें वर्णन करणें अशा प्रकारच्या परिमित भागांत अशक्य होणार आहे. करितां त्यांतून जीं महत्वाचीं वाटलीं व जीं पाहावयास जाण्याचा यात्रस्थांचा प्रघात आहे तींच निवडून घेतलीं आहेत. तीर्थांची माहिती देतांना त्या ठिकाणीं तदनुषंगानें असणाऱ्या देवालयाचा उल्लेख करण्याचा विचार आहे. असें न केल्यास एकीकडे तीर्थ येऊन एकीकडे तत्स्थापीय देवता सांगावी लागेल. प्रथमतः तीर्थांचें वर्णन देऊन नंतर देवालयांचें वगैरे देणार आहोंत.

### तीर्थें.

**कुशावर्तः**—हें परमपवित्र तीर्थ वस्तीच्या मध्यभागीं आहे. या तीर्थाची सांप्रतची बांधणी होण्यापूर्वीं या ठिकाणीं हेमाडपंती बांधणी होती व तत्पूर्वीं तें नुसतेंच असावें असें वाटतें. गौतमऋषींना कनखलानजीक गंगेचा ओघ आढळून त्यांनीं त्या ओघास कुशांनीं परिवेष्टित केलें. त्यावरून

त्यास कुशावर्त नांव मिळालें. हें तीर्थ या ठिकाणीं अति प्रख्यात आहे. या ठिकाणीं फलोद्देशानें करावा लागणारा यात्राविधि पूर्वभागांत वर्णिला आहेच. सांप्रतची याची बांधणी फारच सुरेख साधलेली आहे. आकार चौकोनी असून चोहोंबाजूनीं पायऱ्या आंत उतरत नेलेल्या आहेत. पायऱ्या सारख्याच उतरत नेलेल्या नसून शेवटच्या कुंडापर्यंत जातां मध्यंतरीं तीन पटांगणें आहेत. या तीन पटांगणांतहि एक तर पुष्कळच रुंद आहे. या चौकोनी कुंडाचा वरील थर पूर्वेकडील अंगास सुमारें ७ फुटानें कमी करून षटकोन साधलेला आहे. व ह्मणून यास तीर्थराज ही संज्ञा आहे. वरील सपाटीची पूर्वपश्चिम लांबी ८१ फुट असून दक्षिणोत्तर ७४ फुट आहे. सर्व बांधकाम पक्क्या दगडांनीं केलेलें आहे. ते चांगले गुळगुळीत घडींव असून उत्तम प्रकारें कमावले असल्यानें झिजत नाहींत. बांधणींत ही एक विशेष गोष्ट साधिली आहे कीं, पाण्याची समपातळी सर्वदा सारखी राहते. अशा प्रकारची बांधणी दुसरे ठिकाणीं फारशी अढळत नसल्याचें यात्रेकरू लोक सांगतात.

हें परमपवित्र तीर्थ बांधून काढण्याचें श्रेय श्रीमंत होळकरसरकारचे फडणवीस रावजी महादेव पारनेरकर यांनीं संपादिलें आहे. या कृत्यास आरंभ शके १६७२ त होऊन परिसमाप्ति १६९० त झाली. खर्च अजमासें ७ लक्ष रुपये लागला असें ह्मणतात. या तीर्थाचे बांधकामास आरंभ झाल्यावर थोड्याच वेळांत श्री. नानासाहेब पेशवे यांची स्वारी श्रीचे दर्शनास आल्यावेळीं त्यांचे मनांत

आपण हें तीर्थ- बांधून कीर्ति ठेवावी असा विचार येऊन त्यांनीं तशा प्रकारें पारनेरकराशीं रदबदली केली, परंतु आपण आरंभिलेलें कृत्य आपणच शेवटास न्यावें अशी पारनेरकरांची महत्वाकांक्षा असल्यामुळें ते ह्या गोष्टीस राजी झाले नाहींत. त्यामुळें नानासाहेबास राग येऊन त्यांनीं दुसरें कुशावर्त बांधण्याचा निश्चय केला, परंतु हें करणें वाजवी होणार नाहीं, अशानें स्थानमहात्म्यास धक्का बसेल वगैरे अडचणी क्षेत्रस्थ ब्रह्मवृंदांनीं निवेदन केल्यावरून तो बेत रहित केला व या आवेशांत जी जागा त्यासंबंधानें बांधून काढिली होती तेथें एका ओवरींत रामलक्ष्मणाच्या मूर्तींची स्थापना करण्यांत आली. याप्रमाणें पारनेरकरांनीं आरंभिलेल्या कामांत आलेलें विघ्न टळून त्यांच्या मनाप्रमाणें त्यांस बांधकाम करतां आलें.

कुशावर्तासभोंवतीं उत्तर, पश्चिम आणि दक्षिण अशा तीन बाजूंस सुमारें ४ फूट उंचीच्या दगडी घडीव जोत्यावर ओवऱ्या बांधलेल्या आहेत. या ओवऱ्यांचें कामही चांगलें मजबूत असून नक्षीदार आहे. पश्चिम बाजूस १३ व दक्षिणोत्तर बाजूस ११।११ खण आहेत. पूर्वबाजू सर्व खुली आहे. दक्षिणेस एक व पश्चिमेस दोन द्वारें असून उत्तरेसही एक लहानसें द्वार असून बराच भाग खुला आहे. या ओवऱ्या आंतून बहुतेक मोकळ्या असून बाहेरच्या बाजूनें मजबूत कोटानें परिवेष्टित आहेत. ह्या बाह्य भागावरही पुतळे, चित्रें वगैरे बरेंच नक्षीकाम आहे. ह्या ओवऱ्याच्या चारी कोंपऱ्यावर ह्मणजे कुशावर्ताच्या आग्नेय, नैऋत्य, वायव्य आणि ईशान्य अशा कोनांवर

नं.

चार देवालयें बांधलीं आहेत. ह्या चारींही देवालयांचें बांधकाम एकसारखें आहे. देवालयांच्या शिखरावर सुवर्ण-कळस आहेत. हें कळसाचें काम श्री. अण्णासाहेब विंचूरकर यांचें आहे. नैऋत्य कोनांत गजाननाची मूर्ति असून वायव्येस महादेव आहे व ईशान्येस गौतमाची मूर्ति आहे. यांशिवाय इतर देवतांच्या सुंदर मूर्ति पुष्कळ आहेत.

नैऋत्य कोंपऱ्यावर शेषशायी भगवान् असून त्या दिशे-नेंच गंगेचा ओघ असल्याचें ज्या वेळीं तीर्थ स्वच्छ करि-तात तेव्हां दिसून येतें. ओघ बराच मोठा आहे. तीर्थ स्वच्छ केल्यावर अलीकडे बराच पाऊस पडून गंगेस पाणी बरेच वरपावेतों येईपर्यंत आंत स्नानें करण्याची मनाई असते. या काळांत पाणी फारच स्वच्छ असतें व सर्व लोक आनंदानें तेंच प्राशन करितात. म्युनिसिपल कमेटी व संस्थानचा शिपाई हजर राहून वरील नियमाचें कोणास उल्लंघन करूं देत नाहींत.

प्रभातकालापासून अगदीं मध्यरात्रपावेतों या ठिकाणीं मनुष्यांची पैखी असतेंच; त्यांतही पहाटेच्या प्रहरीं या ठिकाणीं फारच बहारीचा देखावा असतो. गांवकऱ्यांपैकीं बहुतेक व परस्थमंडळीही स्नानार्थ कुशावर्तावर जाणारीच असते. घरीं स्नानें करणारे फारच थोडे सांपडतील. कांहीं नैष्ठिक ब्राह्मण सूर्योदयाचें प्राक्स्नान आटोपून व भस्माचा त्रिपुंड्र धारण करून गायत्रीजप करीत बसलेले आढळतात, तों कोणी स्नानार्थ कांखेंत गवाळें घेऊन लगबगीनें येत असतात; कोणी संकल्पपूर्वक स्नानविधि

करीत असतां ' गंगे, गोदे ' असे शब्दोच्चार उच्चस्वरानें काढीत असतात; कोणी गोमुखींत हात घालून नासाग्र-दृष्टि ठेऊन जपकर्म करीत असतात; कोणी प्राणायाम करीत आहेत असे दृष्टीस पडतात. याप्रमाणें जो तो आपापल्या अधिकाराप्रमाणें व फुरसतीप्रमाणें स्नानसंध्यादि कृत्यें करण्यांत तत्पर असणारा जनसमूह तेथील कृत्यें संपवून देवदर्शनार्थ जातो त्यावेळीं कोणी शाल, कोणी बनात, कोणी घाबळ तर कोणी नुसताच असा आढळून येतो. याप्रमाणें पुरुषवर्गांत या प्रकारची चळवळ सुरू असतां स्त्रीवर्गहि आपापल्यापरीं व्यापृतच असतो. सौभाग्यवती स्त्रिया केशकलापांत गंगोदकाचा प्रवेश होऊं न देतां जपून गळ्याखालूनच स्नानें करीत असतात. व ज्यांचीं स्नानें झालीं आहेत अशा स्त्रिया हरिद्राकुंकुमादि द्रव्यांनीं गौतमीचें पूजन करीत असतात, तों कोणी लगबगीनें येथील कृत्यें आटोपून आपलीं लुगडीं व श्रेष्ठजनांचीं धोतरें घेऊन गंगालयावर धुण्यासाठीं जाण्याच्या लगबगींत असतात. व कोणी देवदर्शनार्थ देवालयांत जाण्याच्या विचारांत आहेतशा आढळतात. या प्रकारचा हा देखावा बराच काळपावेतों चालू असतो. जसजसा दिवस वर येत जातो तसतसा लोकसमूह कमी कमी होत जातो. अशा समयास कोणी कितीहि प्रकारचा नास्तिक जर घटकाभर हा देखावा पाहत राहील तर त्यासहि आपण स्नान करून पुनित व्हावें असें खात्रीनें वाटेल व त्याचा नास्तिकभाव अंशतः कमी होईलच होईल. अशी स्थिति असतां जो खरोखरच भाविक असेल त्यास किती

समाधान वाटत असेल याची कल्पना करण्याचें वाचकांवरच सोंपवितों.

दर सोमवारीं तिसरे प्रहरानंतर श्रीत्र्यंबकराजाची स्वारी मोठ्या थाटानें कोठींतून निघून कुशावर्ततीर्थावर स्नानार्थ येत असते; त्यावेळचा थाट मोठा वर्णनीय असतो. गांवकरी व परस्थ मंडळी जमून कुशावर्ततीर्थ अगदीं भरून जातें. पश्चिमघांटाला देव उतरतात त्या ठिकाणीं कारभारीआदिकरून संस्थानची मंडळी व परस्थांपैकीं जे कोणी प्रतिष्ठित असतात त्यांची बसायची सोय असते. शिवाय स्त्रिया वगैरे बाजूच्या ओवऱ्यांतून वसतात.

संस्थानचा सर्व लवाजमा या ठिकाणीं हजर असतो. वारंवार शंखाचा शब्द होत असून छडीदारांचें ललकारणें चालू असतें. शिवाय वाजंत्री, कर्णेकरी, डमरुवादक यांचेंहि मधूनमधून वादन चालतेंच. अवांतर पूजा ज्याकडे असते त्या ब्राम्हणाकडेसच या ठिकाणची पूजा करण्याची वहिवाट आहे. या ठिकाणीं षोडशोपचारें पूजन सकृत रुद्रावर्तनासहित होतें. आरतीच्या वेळीं व मंत्रपुष्पांजलीच्या समयास सर्व लोक अगदीं हात जोडून उभे राहतात व अनन्यभावानें ईश्वराची प्रार्थना करितात. या वेळचा देखावा फारच बहारीचा असतो. सर्व समुदायाचें प्रतिबिंब तीर्थांत पडून तर एक अप्रतिमच शोभा दृग्गोचर होतें.

**कनखलतीर्थः**—हें तीर्थ कुशावर्ततीर्थानजीकच पूर्वबाजूला आहे. कुशावर्ततीर्थांतूनच या तीर्थास पाण्याचा पुरवठा होतो. पंचतीर्थांपैकीं हें एक तीर्थ आहे. पुराण

काळीं म्हणजे गौतमऋषींच्या वेळीं त्यांच्या धान्य कुट-ण्याच्या खळग्याचें हें स्थान असावें असा अर्थबोध नांवावरून होत असून पुराणांतही असाच दाखला निघतो. गंगाद्वारीं गुप्त झालेली गौतमी गौतमऋषीस याच ठिकाणा-पासून दिसली असें ह्मणतात. हें मोठें पवित्र स्थल असून या ठिकाणच्या वासानें अत्यंत पापी अशा जनांचा उद्धार झाल्याच्या कथा असून त्यावर या ठिकाणीं तीर्थ बांधण्यांत आलें. यांत स्नान करण्याचें बहुत पुण्य आहे. या तीर्थाचें बांधकाम रा. रा. विष्णु महादेव गद्रे यांनीं सुमारें ९ हजार रुपये खर्च करून अजमासें शके १७०७ च्या सुमारास केलें असावें असा दाखला सांपडतो. या बरोबरच कंचनतीर्थ नांवाचें जें बावडीच्या आकाराचें याच्या दक्षिणेस तीर्थ आहे तें बांधण्यांत आलेलें आहे. कनखलतीर्थांत ब्राह्मणांचे व कंचनांत शूद्रांचे पिंड टाक-ण्याची वहिवाट आहे. पाणी थोडें असून वरील प्रकारचा उपसर्ग असल्यानें उष्णकाळांत या तीर्थाचें पाणी फार खराब होतें; परंतु जे भाविक यात्रेकरू या ठिकाणीं येतात ते मनांत बिलकूलही किंतू न बाळगितां गतपाप होण्या-साठीं त्यांत स्नानें करितात व पूनित होऊन जातात. प्रति-वर्षी म्युनिसिपालिटी कुशावर्ततीर्थासमवेतच या उभय तीर्थांस उपसून साफ करीत असते. पर्जन्यकालांत या तीर्थांतून पाणी विपूल व चांगलें असतें.

**गंगाद्वार**:—हें ठिकाण ब्रह्मगिरी डोंगराच्यावरील पायथ्याशीं बराच चढाव चढून गेल्यावर लागते. पर्वत-शिखरावर जटाजूटींतून प्रथमतः मूळ गंगोत्पत्ति असल्यानें द-

लचा उल्लेख पूर्वभागांत आलेला आहे. त्यापुढें या ठिकाणीं निम्नभागीं गोदा दृष्टोत्पत्तीस आल्यामुळें या ठिकाणास 'गंगाद्वार' ही संज्ञा मिळाली. गौतमऋषीच्या स्नानानें दूषित झालेल्या गंगेंत कोणीही स्नान करीना. असा कांहीं काळ लोटल्यावर प्रत्यक्ष श्रीविष्णूनीं या गंगाद्वारीं आपल्या आगमनानें व स्नानादिकानें हा गंगेवरील दोष निवारण केल्याची कथा क्षेत्रमहात्म्यांत आहे. तेव्हांपासून हें स्थान परमपवित्र मानिलें आहे. पूर्वीं ह्या ठिकाणीं गंगौघ असावा, परंतु हल्लीं त्या स्थळीं गोमुख असून श्रीगंगेची घडीव मूर्ति आहे. मूळ गंगेला अवघड रस्ता असल्यानें सर्वच यात्रेकरू जातात असें नाहीं; परंतु गंगाद्वारीं मात्र सर्वजण जातात. कारण या ठिकाणीं जाण्याची चांगली सोय झालेली आहे. आरंभीं नुसता चढावच पायवाटेनें चढून जावा लागत होता, परंतु बऱ्याच वर्षांमागें मुंबईचे लोहाणा जातीचे शेट हंसराज करमशी यांनीं सुमारें ४० हजार रुपये खर्च करून चांगल्या सोयीच्या पायऱ्या बांधल्यामुळें मार्ग फारच सुगम झालेला आहे. पायऱ्या अजमासें ७५० असून प्रशस्त व फार उंच नाहींत अशा आहेत, व मधूनमधून पटांगणेंही ठेविलीं असल्यानें चढणारास कष्टप्रद होत नाहींत. चढण्याची ज्यांस शक्ति नसतें व स्थल पाहिल्यावांचून ज्यांस आवडत नाहीं व साधारण अनुकूलता आहे अशांस डोलीवाले डोलींत घेऊन जातात. इतका तो मार्ग सांप्रत सुलभ झालेला आहे.

गंगाद्वारीं स्नान करण्याची सोय नाहीं. कारण तें जें स्थल आहे तें तशा योजनेनें हल्लीं बांधून काढलेलें दिसत

नाहीं. तेथील कुंड फारच लहान आहे. फक्त वंदन करण्याची मात्र सोय आहे. या तीर्थाचे अधिकारी उपाध्ये महाजन उपनांवाचे देशस्थ ब्राह्मण आहेत. ते० या ठिकाणीं यात्रस्थाकडून संकल्पादि यात्रा करवितात. जवळच गुहेच्या आकाराचें वराहतीर्थ आहे. ह्या ठिकाणीं ज्या कोणास स्नानें करावयाचीं असतील ते करितात. या वराह-तीर्थाचें पाणी उष्णकाळांत खराब झालेलें असतें. तें उपसविण्याची योजना त्या ठिकाणीं पैसे मिळविणाऱ्यांनीं केल्यास होण्यासारखें आहे; परंतु इकडे ते लक्ष देतील तो सुदीन. या तीर्थाच्या उत्तरबाजूस जवळच कोल्हा-सुराचा वध केल्यावर कोलांबिका नांवानें प्रख्यात असलेल्या देवीची मूर्ति आहे. ज्या नवदुर्गा आहेत त्यांत इचा समावेश असून संस्थानांतून प्रतिवर्षीं नवरात्रांत या देवीस वस्त्रादिकांनीं पूजितात. या गंगाद्वारीं माकडाची बरीच वस्ती असून त्यांच्याकरितां यात्रेकरू लोक फुटाणे, डाळ वगैरे घेऊन जातात. गाफील मनुष्य असल्यास तीं माकडें सहवासानें इतकीं धीट झालेलीं असतात कीं, जवळ अस-लेली गांठोडीं तीं अचानक उडवितात व वस्त्रांच्या अगदीं चिंधाड्या करून आंतील पदार्थांवर हात मारितात. या-साठीं कांहीं नेल्यास जपून घेऊन जाऊन तें तेथें त्यांच्या-पुढें ओतून देऊन मोकळें होणें सोइस्कर पडतें. याच डोंगराच्या पठारास उत्तरभागीं अष्टोत्तरशत लिंगें व गोरख गुहा अशीं स्थानें आहेत. हीं दोन्हींही ठिकाणें खडकांत कोरून केलेलीं आहेत. अष्टोत्तरलिंगस्थानाजवळ एक गोसावी बसलेला असतो व गुहेंत एक कानफाटा असतो.

४०८

ते उभयतां त्या ठिकाणीं जें कांहीं यात्रस्थ ठेवितात तें घेतात.

'गंगाद्वाराच्या अर्ध्या पायऱ्या चढून आल्यावर उजवे बाजूस रामलक्ष्मणतीर्थ व रामाचें देऊळ आहे. रामतीर्था-नजीक औदुंबर वृक्षाखालून गंगेचा ओघ येऊन तो राम-तीर्थांत जातो. हें तीर्थ व देऊळ रा. रा. गोपाळपंत घाणेकर या इसमानें सुमारें २,५०० रुपये खर्च करून शके १७२२ सालीं बांधिलें असें ह्मणतात. पंचवटींत वस्तीस असतां श्रीरामचंद्र गोदास्नानाकरितां आले असतां या ठिकाणीं त्यांनीं वस्ती केली होती असें पुराणावरून समजतें. या ठिकाणचें तीर्थोपाध्येपण अग्निहोत्रीउपनामक एका देशस्थ ऋग्वेदी घराण्याकडे आहे. चढाव चढतांना हें चांगलें विसाव्याचें स्थल आहे.

**बिल्वतीर्थः**—हें तीर्थ त्र्यंबकगांवापासून एक मैला-वर नीलगिरीच्या पायथ्याशीं उत्तरदिशेस आहे. हें तीर्थ बरेंच मोठें वर्तुलाकार बांधिलेलें आहे. बांधणी साधारण-प्रतीची आहे. श्रीभवानीच्या घर्मबिंदूपासून त्याची उत्पत्ति असल्याचें वर्णन क्षेत्रमहात्म्यांत वर्णित आहे. या तळ्याचें पाणी सुंदर असतें. हें गांवापासून बऱ्याच अंतरावर असल्या-कारणानें याला गांवकरी मंडळीकडून उपसर्ग पोहोंचत नाहीं. आरंभीं हें बांधलेलें नव्हतें, परंतु शके १७६६ च्या सुमारास नारायण विनायक गोगटे या उपनांवाच्या एका उदार गृहस्थानें आपल्या हातून कांहीं लोकोपयोगी कृत्य घडावें या उद्देशानें सुमारें ५ हजार रुपये खर्च करून साधारण बांधून काढिलें आहे. ह्या बांधणीच्या योगानें

तें फारसें रेवून नादुरुस्त झालें नाहीं. उष्णकालांत त्याचें पाणी बरेंच आटून जातें. याच्या कांठीं श्रीत्र्यंबकेश्वराचा बाग आहे. त्या बागेतील झाडांस पाण्याचा पुरवठा याच तीर्थाच्या पाण्यापासून होतो. त्र्यंबकेश्वराच्या त्रिकाल पूजेसाठीं लागणारीं फुलें अंशतः या बागेंतूनच पुरविलीं जातात. अंशतः म्हणण्याचें कारण कीं, दुसरीही एक बाग गौतम तळ्यास लागून आहे. जे लोक पंचतीर्थी यात्रा करितात ते या ठिकाणीं येतातच. कारण, याचा समावेश त्यांत आहे. या तीर्थानजीकच बिल्वकेश्वर नांवाचा महादेव आहे. या तीर्थीं स्नानविधि उरकून बिल्वकेश्वराचें दर्शन घेणें हा येथील यात्राविधि असतो.

पंचतीर्थीपैकीं चोहोंचा वर निर्देश केलेला आहे. राहिलेलें परंतु पांचवें तीर्थ नसून दर्शनार्ह स्थल आहे, तें नीलपर्वत होय. त्याचा समावेश पंचतीर्थांत केलेला आहे. याबद्दलच जास्त वर्णन इतरत्र आहे. पंचतीर्थांत याचा समावेश केला असल्यानें याचा उल्लेख या ठिकाणीं करणें प्राप्त म्हणून केला आहे. वामांक पार्वतीचें हें स्थान आहे.

**गंगासागर अथवा गंगालयः**—ह्या तीर्थाची गणना ह्या गांवाला पाण्याचा पुरवठा करणारीं व उपयुक्त जीं तळीं आहेत त्यांत होते. ह्यापेक्षां किंचित सरस असें गौतमालय नांवाचें तीर्थ आहे. गंगासागर गांवाच्या पश्चिमभागीं असून त्याच्या पलीकडे वस्ती नाहीं. गंगौघ गंगाद्वारापासून निघून रामलक्ष्मणतीर्थाचे मार्गानें आलेला या ठिकाणास येऊन नंतर मग कुशावर्ताकडे वळलेला आहे असें दिसतें. हा तलाव बराच मोठा आहे. याचा

आकार पूर्ण वर्तुलाकार नाहीं. याची पूर्वपश्चिम लांबी अजमासें ५७५ फूट असून रुंदी दक्षिणोत्तर ४२५ फुटांची आहे. जलसंचय या ठिकाणीं बराच असल्यामुळें आसपासचे आड वगैरेस पाण्याचा पुरवठा याच ठिकाणाहून होत असावा असें अनुमान करितां येतें. बरसातींत हा तलाव भरून वाहूं लागतो. अलीकडे कांहीं ठिकाणचा चुना नाहींसा होऊन दगड विस्कळीत झाले असल्यानें त्या ठिकाणाहून पाझर चालतात. म्युनिसिपल कमिटीनें हा दोष नाहींसा करण्यासाठीं धक्का वगैरे घालून बरीच खटपट केलेली आहे; परंतु उपयोग झालेला दिसत नाहीं. याचें कारण चुन्याची चांगली कमाई न झाल्यामुळें कीं काय याचा उमज होत नाहीं. फार प्राचीनकालीं एकवार हा तलाव उष्णकाळांत बराच आटलेला होता असें वृद्ध लोक सांगतात. त्यावेळीं या तलावांत एक झाडपंती लहानसा तलाव असल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें होतें. या तळावाचें बांधकाम नारो शंकर राजेबहादूर यांनीं शके १५९९ च्या सुमारास केल्याचा दाखला मिळतो. बांधकामाकडे अजमासें पाऊण लाख रुपये खर्च पडले आहेत असें सांगतात. हें मान्य तीर्थ असून या ठिकाणीं पिंडदानादि केलें असतां पुण्यप्रद आहे असें वर्णन आहे, व जे कोणी भाविकपणें संपूर्ण तीर्थयात्रा सावकाशपणें कारितात त्यांस या ठिकाणींहि तर्पणादिविधि पितराकारणें करावे लागतात. हलींच्या काळीं इतक्या सावकाशीची व यथासांग यात्राविधि करणारे दुर्मिळ आहेत. सांप्रत ह्या तळ्याचा उपयोग गांवकऱ्यांस व यात्रस्थांस

वस्त्रें धुण्यास चांगला होतो. या तीर्थाचें पाणी पिण्यास लायक नसतें. गोंडाळ व नीळ यांनीं तें व्याप्त असतें. नीळ कमी करण्यासंबंधांत बरेच यत्न झालेले आहेत, परंतु उपयोग निरंतरचा टिकणारा असा एकापासूनही झालेला दिसत नाहीं. गाळ वगैरे काढून जर ह्याची व्यवस्था राखली तर पाणी चांगलें राहील. धुणें, गुरांस पाणी पाजणें व जवळपासच्या घरीं आड नाहींत तेथील लोकांस सामान्य खर्चास पाण्याचा पुरवठा ह्या तळ्यापासून होतो.

**गौतमालय**:—हें एक मोठें विस्तीर्ण तळें असून त्याच्या जवळपास राहण्यास धुण्यापाण्यासाठीं याचा चांगला उपयोग होतो. याच्या कांठीं गौतमेश्वराचें देवालय आहे. पाण्यांत नीळ फार असल्याकारणानें पाहणाराचें चित्त हा मोठा जलसंचय पाहूनही संतोषित होत नाहीं. शिवाय याचे कांठीं असणारी परिस्थितीही चांगली नसल्याकारणानें गदळपणा जास्तच आढळून येतो. याची बांधणी चांगली मजबूत व टिकाऊ अशी आहे. पर्जन्यकाळीं तलाव तुडुंब भरून वाहूं लागतो. याप्रमाणें ह्या उफाळ्याचें पाणी वहात जाऊन वाहते गंगेस मिळतें. ह्याचें बांधकाम झांशीवाले नारो दामोदर पंडित यांनीं केल्याचें समजतें; परंतु कोणत्या सालीं बांधिलें व खर्च अजमासें किती लागला याच्याबद्दल दाखला कोठेंच उपलब्ध नाहीं. याची लांबी पूर्वपश्चिम ६१९ फूट असून रुंदी दक्षिणोत्तर ३५० फूट आहे. ह्या तळ्याचें पाणी सुधारावें यासाठीं हल्लीं म्युनिसिपालिटींतील सभासदांनीं मनावर घेऊन अहिल्या नदीचा ओघ अंशतः यांत नळावाटें आणून सोडण्याची

तजवीज केलेली आहे. आलेल्या थोडक्या वर्षांचा अनुभव असा कीं, पहिली जी अतिशय नीळ असे ती पाण्याचे लोटाबरोबर वरचेवर बरीच वाहून जाऊन पाणी ऊष्ण-काळांतही पहिल्यापेक्षां जास्त चांगलें राहतें. ही युक्ति अशीच किती दिवस टिकेल याबद्दल संशय असल्याचेंही कांहींजण सांगतात. लौकिकी व्यवहारांत या तीर्थास गोतमाळें हें नांव मिळालें आहे. यांतील पाण्याचा उपयोग पिण्याकडे केला जात नाहीं. याच्या कांठीं साधारण उदीम चालतो व देवाचे पूजेकरितां पुष्पें ज्यांतून नित्यशः मिळतात असा संस्थानचा बाग आहे. बागेंतील झाडांवर वाघळांचा फार सुळसुळाट असतो, तो कमी झाला असतां बागेस हितावह होईल.

**विसोबाचें तळें**:—हें तळें मूळचें तीर्थ नसून केवळ पिण्याच्या पाण्याच्या सोयीकरितांच बांधिलेलें आहे. हें गांवाच्या दक्षिणभागीं अहिल्या नदीच्या कांठीं बांधिलेलें आहे. हें बांधण्याचें काम जुन्नरकर नारोपंत आमडेकर यांचे कारकून विसाजीपंत केळकर यांचे देखरेखीखालीं झाल्यावरून ह्यास विसोबाचें तळें असें नांव मिळालें आहे. ह्यांचे बांधकामास सुमारें २५ हजार रुपये खर्च होऊन तें बांधण्याचें काम अजमासें शके १७०० च्या सुमारास झालेलें आहे. हल्लीं ह्या त्र्यक्ष क्षेत्रांत पाणी पिण्याचे जे जलसंचय आहेत त्यांत त्याचा पहिला नंबर आहे. यांत पाणी विपूल असून चांगलें स्वच्छ असतें व राखिलेंही जातें. या तळ्यांत स्नान, धुणें वगैरे अगदीं बंद राखिलेलें आहे. उष्णकाळांत इतरत्र असणारे पिण्याचे पाण्याचे संचय जेव्हां

आटतात, तेव्हां येईल त्यास मनसोक्त पुरवठा या पाण्याच्या संचयांतूनच होतो. याचे बांधणींत असा एक गुण साधला आहे कीं, घुमटाप्रमाणें एका कांठीं बोललें असतां त्याचा प्रतिध्वनि उमटतो. याशिवाय ज्यांतील पाणी पिण्यालायक आहे तीं ठिकाणें:--केतकी विहीर, कुशावर्तानजीक; ठाकूर विहीर, गंगालयानजीक; व उष्णकाळांत उपसल्यानंतर कुशावर्ततीर्थ. श्रीपरशुरामोपासक कोकणस्थ मंडळी यांच्या नजीक हें तीर्थ असून प्रतिवर्षीं श्रीपरशुरामोत्सव, सांप्रतची मूर्ति स्थापन होण्यापूर्वीं मृण्मय मूर्ति स्थापून त्या मूर्तीचें विसर्जन ह्या तळ्यांत होत असल्यानें कोणी कोणी ह्यास परशुरामतीर्थ ह्मणतात.

**इंद्रतीर्थ**:-हें तीर्थ गांवाच्या मध्यभागीं कुशावर्ताच्या पूर्वेस नजीकच आहे. याची बांधणी उत्तम आहे; परंतु यांतील पाणी गोंडाळानें अतिशय खराब झालें असल्यानें याचा चांगला उपयोग होत नाहीं. हें विष्णु महादेव गद्रे यांनीं सुमारें शके १७१० च्या सुमारास इंद्रेश्वराच्या देवळाच्या खर्चांत बांधिलें असें ह्मणतात. या ठिकाणची सर्वतीर्थी यात्रा करणारास ह्याही तीर्थीं तर्पणादि प्रकार करावे लागतात. नजीकच इंद्रेश्वराचें देवालय आहे.

**प्रयागतीर्थ**:--हें तीर्थ क्षेत्रापासून सुमारें एक कोसावर असून अगदीं मार्गावर आहे. बाहेरून येणारे यात्रेस्थास प्रथमारंभीं दृष्टोत्पत्तीस येणारें हेंच तीर्थ आहे. हें तीर्थ प्रसिद्ध दानशूर अहिल्याबाई होळकरीण इनें सुमारें शके १७०२ च्या सुमारास जवळजवळ ९० हजार रुपये खर्च करून बांधिलें आहे. जवळच गोसाव्यास राहण्या-

करितां इमारत बांधून देऊन त्यांच्या चरितार्थाचें कांहीं स्वास्थ्यही केलें आहे. ह्या मठास आखाडा असें ह्मणतात. या ठिकाणीं सिंहस्थ पर्वणीस गोसाव्यांचा मोठा मेळा गंगास्नानार्थ जमतो. ह्या तीर्थाचें बांधकाम सुबक असून मजबूत आहे. पाणी साधारण बरें आहे. आसमंतात्भागीं आम्रवृक्ष लागलेले असल्यानें शोभा फार मनोहर दिसते. ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा करितांना मार्गांत हें तीर्थ येतें.

ह्याशिवाय या क्षेत्रीं इतर पुष्कळ तीर्थें आहेत. त्यांतील प्रत्येकाचें वर्णन विशेष महत्वाचें सांप्रतकालीं दिसणारें नसल्यानें त्यांतील कित्येकांचा केवळ नामनिर्देश करूनच भागविणें सोयस्कर आहे.

| नांव. | ठिकाण. | बांधणारा. | रक्कम. | कधीं. |
| --- | --- | --- | --- | --- |
| बल्लाळतीर्थ. | बल्लाळेश्वरानजीक. | रघुनाथराव पेशवे. | ३०००० | १७०४ |
| अमृतकुंड. | त्र्यंबकराजाचे देवळांत. | नानासाहेब पेशवे. | देवालयाचे कामांत. | |
| मनकर्णिकातीर्थ. | दीक्षितांचे घरानजीक. | ० | ० | ० |
| निवृत्तीजवळील विहीर. | निवृत्तिमंदिरानजीक. | अंबाताई लंगोटी. | ५०० | १७६४ |
| मोतितलाव. | नीलगंगेपलीकडे. | मोतीभाई चौधरी. | १७००० | १७१२ |
| मुकुंदतीर्थ. | महामारीनजीक. | धनशेट शिंपी मुंबईकर | ० | १७१४ |

---

# भाग ५ वा.

## दर्शनीय देवालयें व समारंभ.

१ श्रीत्र्यंबकेश्वराचें देवालय:—ह्या क्षेत्रीं जीं दर्शनीय स्थलें आहेत त्यांत याची गणना अग्रस्थानीं आहे.

देवालय काळ्या पक्क्या दगडाचें बांधलें असून नक्षीकाम फारच अप्रतिम तऱ्हेचें केलेलें आहे. हें नाशकाहून येणारास बऱ्याच अंतरावरून दृष्टोत्पत्तीस येतें, इतकें तें निम्न भागीं असतांही उंच आहे याचें दर्शक आहे. सभोंवार पटांगण फरशीचें विस्तृत असून सर्व बाजूंनीं मजबूत कोटानें परिवेष्टित आहे. कोटास दरवाजे चार दिशेस चार असे असून उत्तरेकडील दरवाजा सर्वांत मोठा आहे. दरवाजावर नगारखान्याची जागा चांगली प्रशस्त अशी आहे. त्या ठिकाणीं प्रत्यहीं वाजंत्री लोक नियत वेळेस आपलें काम करीत असतात. क्षेत्रींचे लोक बहुतकरून या ठिकाणीं होणाऱ्या वादनावरूनच कालगणना करितात. सुरु, मोठा नगारा, दूघडी, सहा घटकेचा नगारा, दोनप्रहरचा नगारा, डंका हे दिवसाचे होतात. सुरु, दूघडी, मध्यान्हीचा डंका हे रात्रौ असतात. परस्थांस हें ठिकाण पाहून परम समाधान वाटतें.

कोटाची भिंत ४। फूट रुंदीची असून दक्षिणोत्तर ती २१८ फूट व पूर्वपश्चिम २६९ फूट आहे. देवालय पूर्णपणें मध्यावर्ती नाहीं. पूर्वेकडील दरवाजावर वड्याळखाना २४×१५ फुटाचा आहे व उत्तरेकडील महादरवाजावर नगारखाना ३८॥×१५ फुटाचा आहे. वड्याळखाना सांप्रत तेथें नसून तो कोठींतच सोईसाठीं ठेविलेला आहे. नगारखाना मात्र सुरू असून चौघडा तेथेंच झडत असतो. नगारखान्यांतून निघणारे वाद्यांचे सुस्वरध्वनि यथाशास्त्र रागदारींत नियत असल्याकारणानें अंतरावरून कर्णमधुर सूर ऐकून ऐकणाराचें चित्त प्रमुदित होतें. व

किंचित् कालपावेतों प्रापंचिक कामें मागें सारून कर्णतृप्ती-स्तव अल्पावधि तरी उभें रहावें असें त्यांस साहजिक वाटतें. विस्तृत पटांगणाचे मध्यभागीं मेरुप्रासादाकार पूर्वाभिमुख असें भव्य देवालय आहे. देवालयाचें काम नक्षीदार आहे. व ह्या प्रांतांत तर तें देवालय जुन्या कारागिरीचें द्योतकच होऊन राहिलें आहे. यात्रेकरी लोक हें पाहून फार समाधान पावतात व पुष्कळांचे तोंडून असे उद्गार ऐकूं येतात कीं, अशा प्रकारचें सुबक देवालय आमचें पाहण्यांत नाहीं. देवालयास दरवाजे आंत जाण्याचे तीन आहेत. मुख्य पूर्वाभिमुख व दुसरे दोन दक्षिणोत्तरमुख असे. ह्या प्रत्येक दरवाजाबाहेर मोकळी जागा सात पायऱ्या चढून गेल्यावर लागते. दरवाज्यांतून आंत गेल्यावर मोठा विस्तृत सभामंडप, ज्यावर उंच मेघडंबरी आकाराचें वितान आहे, असा लागतो. त्याचे मध्यभागीं घोटीव व गुळगुळीत दगडी फरसबंदीवर १२॥ फुटांच्या संगमरवरी चौरस चबुतऱ्यावर त्याच दगडाचें सुबक कांसव आहे. ह्या कांसवाला प्रत्येक सोमवारीं स्वारीच्या दिवशीं स्वारीत मिरवतात. तेव्हां सोन्याचा पंचमुखी मुखवटा क्षणमात्र बसवितात. ह्या सभामंडपाचें क्षेत्र ४०×४० फूट असें आहे. ह्या सभामंडपाच्या पश्चिमभागास पुढें मुख्य देवळाचा गाभारा आहे. व त्या भागाच्या दरवाजानें आंत तीन पायऱ्या उतरून गेल्यावर पुढें मुख्य देवतापीठ लागतें. मुख्य पीठापर्यंत सर्वांसच सर्वकाळ जाण्याची मुभा नाहीं. स्त्री मात्र स्पर्श करूं शकत नाहीं. पुरुषवर्गांतही सर्व वर्गास

अधिकार नाहीं. सोवळें वस्त्रपरिधान केलेले ब्राह्मण, स्नान करून शुद्ध झालेले गोसावी व जंगमस्वामी व तुंगार एवढेच जवळ जाऊन श्रींचें पूजन करितात. इतर लोक गाभाऱ्याच्या दारापासूनच प्रभूचें दर्शन घेतात. असा येथील परिपाठ आहे. ज्याप्रमाणें देवालयाचें बाहेरील काम सुबक व नक्षीदार आहे, त्याचप्रमाणें आंतही नक्षी असून कोनाड्यांतून सुंदर अष्टभैरवादिकांच्या मूर्ति सभामंडपांत बसविलेल्या आहेत. द्वारशोभाहि कांहीं अप्रतिम उठविलेली आहे. तेथील सुबकतेचें कितीही वर्णन केलें तरी प्रत्यक्ष पाहिल्याविना यथार्थ ज्ञान होणें नाहीं. मुख्य गाभाऱ्यांत मध्यभागीं संगमरवरी दगडाच्या वरवंडीनें व फरसबंदीनें परिवेष्टित अशी वालुकामय दगडाची स्वयंभू शाळुंका आहे. शाळुंकेंत इतरत्र ज्याप्रमाणें तिच्या आकारानुरूप लिंग बसविलेलें असतें, तसा प्रकार येथें नाहीं. शिवलिंगाच्या स्थानीं आजमासें कळशीभर पाणी मावेल असा खळगा असून त्यांत तळाशीं तीन दिशेस तीन मोठ्या सुपारीएवढ्या आकाराचीं ब्रह्मा, विष्णू महेश या अभिधानाचीं लिंगें आहेत, असें सांगण्यांत येतें. या लिंगाच्या वरील बाजूस गंगोदकाचा अल्प प्रमाणानें सतत वाहणारा प्रवाह असल्यानें खळगा केव्हांही कोरडा ठणठणीत असत नाहीं. केव्हां केव्हां ज्या फटींतून गंगोदक येतें तेथून मेघनाद उत्पन्न होतो. शिवलिंगावर घातलेलें पाणी आंत जातें. अशा समयास भाविकलोक दहीं, दूध गंगोदकाच्या कावडीच्या कावडी व शिवप्रिय विजया हीहि घालतात.

व त्या सर्वांचा कांहीं काळपावेतों स्वाहाकार होत असतो. अशावेळेस देवास शोष पडला असें लोक ह्मणतात. व ही गोष्ट भावी अनर्थसूचक समजली जाते. असा प्रकार केव्हां होणार याची निश्चितता नाहीं. मुख्य पीठासभोंवार जागा लहान आहे. सात आठ असामीस फार झालें तर एक समयावच्छेदेंकरून पूजन करितां येतें. ह्या ठिकाणीं सकाळपासून दोन प्रहरपावेतों सारखी गर्दी असते. रुद्रावर्तनें, व महिम्नादि स्तोत्रादिकांनीं अभिषेक व पूजनादि प्रकार सारखे चालू असतात. पेशवे सरकारांनीं चालू केलेली व हल्लींच्या सरकारांनीं चालू ठेवलेली त्रिकाळ शिवपूजा नित्य होत असून त्यासंबंधानें स्वतंत्र संस्थान चालू आहे. देवालयाचा सर्वांत उंच जो प्राकार तो अजमासें १०० फूट उंचीचा उतरंडीच्या आकाराचा बांधीत नेलेला आहे. तो ह्याच मुख्य गाभाऱ्यावर असून त्यावर सुवर्णकळस व त्रिशूलासह वृषभध्वज आहे. श्रीचे देवालयावरील व क्षेत्रीं इतरत्र असणारे सुवर्णकळस व वृषभध्वज श्री० अण्णासाहेब विंचूरकर यांनीं करून दिलेले आहेत. पूर्वी ते सर्व नुसते संगमरवरी असत. देवालयाचें नक्षीकाम फारच मनोहर आहे, तथापि त्याचेवर डांगी हवेचा परिणाम पक्के दगड असतांही झालेला आहे. सभोंवारच्या पानांचे कांहीं कांहीं दगड पिचून जाऊन पडले आहेत. जुन्या इमारतींचें संरक्षण या सदरांत जर ह्या देवालयाची दुरुस्ती होईल तर उपयोगाचें होईल.

ह्या सांप्रतच्या देवालयाचें काम केल्याचें श्रेय श्रीमंत पेशवे ह्यांस आहे. शके १६७७ त श्रीत्र्यंबकेश्वराचें देवा-

लय बांधण्यास सुरुवात भाग्यशाली बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्या कारकीर्दींत होऊन परिसमाप्ति शके १७०८ त झाली. आरंभकाच्या हयातींत काम पुरें झालें नव्हतें. ह्याप्रमाणें एकंदर बांधणीस अवधी ३१ वर्षांचा लागून खर्च अजमासें नऊ दहा लक्ष रुपये लागला असें ह्मणतात. यद्यपि बांधकाम होऊन गेलें होतें, तथापि अर्चा होऊन निवृत्ति होण्यास पुढें २० वर्षें लागलीं होतीं. अर्चेचा विधि शके १७२८ मध्यें रावबाजींच्या कारकीर्दींत उरकला गेला. हा कालावधि होण्याचें कारण यज्ञप्रसंगांतील आपस्तंभ व यजुर्वेदी ब्राम्हणांतील दक्षिणद्वारसंबंधाचा तंटा होय. अखेरच्या वेळेसही आग्रही ब्राह्मणांस नरगुंद, नवलगुंद येथील अनुष्ठानांत गुंतवून अर्चेचें काम पुरें करण्यांत आलें, अशी बोलवा आहे. देवालयाच्या मुख्य दरवाजावर जो त्या वेळचा एक शिलालेख घातलेला आहे तो असा आहेः—

शके १६७७ युवनामसंवत्सरे मार्गशीर्षे कृष्णाष्टम्यामारंभः ॥ श्रीमत् त्रिलोचनशिवालयमश्वशैलैर्भूर्वैर्मितेऽथ सुशके च यवाकमार्गे ॥ कृष्णाष्टमी भृगुदिने नृपतिप्रधानः । श्रीबाजिराय तनयो रचने प्रवृत्तः ॥ नानाभिदस्तदनु तत्सुततोषित्रृत पौत्रः प्रपूरयादिदं खलु माधवाख्यः ॥ शाकेष्टखाश्ववसुधाविमितं नु वृत्तं मात्रासितेश्वरतिथौ तु पराभवाब्दे ॥ भगवत्तनयं नाना प्रभु रत्नेऽनियोजयेत् । नारायणाख्यं तत्पुत्रो नागेशः पूर्णमातनोत् ॥ शके १७०८ पराभवनामसंवत्सरे महाशिवराव्यां संपूर्णः ॥

पेशवाईतील धर्मादाय देणग्यांपैकीं हल्लीं ज्या अव्याहत चालू असतील, त्यांपैकीं या क्षेत्राची देणगी ही एक आहे. देवोपचार संबंधांतील नित्यनैमित्तिक कामाच्या सोयीही फार चांगल्या प्रकारें लावून दिल्या असून जें व्यवस्थापत्र अगर अंदाजपत्र केलें जातें, त्यास बेहेडा अशी संज्ञा आहे. प्रथमारंभीं व्यवस्थेसाठीं लागणारा कच्चा खर्च होईल तो करून झालेला मिळावा अशी योजना होती. पुढें नक्त नेमणूक चांदवडी एक हजार रुपये दरमहाप्रमाणें मिळत असे व पेशवाईचा अखेर होईतोंपावेतों तशीच नेमणूक मिळत असल्यानें सांप्रतच्या सरकाराकडून चांदवडी रुपया-ऐवजीं कलदार बादशाही शिक्याचे रुपये शेंकडा बट्टा ४॥ रुपयेप्रमाणें कापून घेऊन ऐन ९९५ दरमहाप्रमाणें मिळत असतात. रावबाजींनीं राज्याचें उदक मालकम-साहेबांचे हातावर घालतांना हें संस्थान यथापूर्वक चालवावें अशी विशेष इच्छा दर्शविल्याकारणानें त्यांच्या विनंतीस मान देऊन आजतागायत तें निर्वेधपणें चालू आहे.

देवाचा जो लवाजमा आहे तो पूर्वकालीन पद्धतीचा असून पाहण्यासारखा आहे. त्यांतील कांहीं भाग दर सोमवारीं जी स्वारी निघते त्यावेळीं बाहेर निघतो. बहुमोल दागिने, उत्तम प्रकारचीं छत्रचामरादि चिन्हें तर आहेतच, तथापि त्यांतल्यात्यांत दर्शनीय पदार्थ ह्मटले ह्मणजे रत्न-जडित मुकूट व रथ हे आहेत. पैकीं मुकुटाबद्दल असा बोलावा आहे कीं, पूर्वकाळीं तो ह्मैसूरकर राजापाशीं होता. त्याचेजवळून मोंगल बादशाही अंमलांत तो दिल्लीस गेला व तेथून तो भाऊसाहेब पेशवे यांनीं पुण्यास

आणिला व योग्य प्रसंगीं तो त्र्यंबकराजास अर्पण केला. या मुकुटाचें जडावकाम इतकें अप्रतिम आहे कीं, त्यावरील दोन रत्नें जीं निसटून पडलीं आहेत तीं यथापूर्वक बसविण्याचें श्रेय कोणीही कारागीर घेण्यास धजत नाहीं. मुकुटास रत्नें सर्व प्रकारचीं आहेत. त्यांत हिरे आहेत, लाल आहेत, इंद्रनील आहेत, पाच आहेत व गोमेदादि इतरहि त्यांत आहेत. मुकुटाचा तुरा मोत्यांचा आहे व हीं मोत्यें चांगलीं पाणीदार अशीं आहेत. यात्रस्थ बहुधा हा पाहिल्याविना जात नाहीं. तो दर सोमवारीं बहुधा लोकांचे दृष्टीस पडावा यासाठीं संस्थानचे कारभारी बाहेर काढून मांडितात.. दुसरा पाहण्याजोगा जिन्नस ह्मटला ह्मणजे रथ होय. देवास ही देणगी श्री० रघुनाथराव विठ्ठल ऊर्फ अण्णासाहेब विंचूरकर यांनीं सुमारें १२ हजार रुपये खर्च करून नवीन कारागिरीनें मंडित करून दिली आहे. हा रथ शके १७८७ च्या कार्तिक महिन्यांत पौर्णिमेस मिळाला आहे व त्या सालापासून रथोत्सव श्री० विंचूरकर हे दरसाल आपले पदरखर्चानें करीत असतात. हा समारंभ कार्तिक महिन्यांत पौर्णिमेस होत असतो. हा उत्सव सुरू झाल्यापासून कार्तिकीपौर्णिमेची यात्रा क्षेत्रीं भरूं लागली आहे. त्या दिवशीं सुवर्णकृत पंचमुखी त्र्यंबकराजाची स्वारी रत्नजडित मुकुट धारण करून ब्रह्मदेव सारथ्यास आहे व इतर लवाजमा बरोबर आहे, अशा थाटानें कुशावर्ततीर्थावर स्नानास जात असते. हा देखावा फारच मनोहर दिसतो. रथ राहण्यासाठीं कोटास लागूनच एक निवाऱ्याची जागा केलेली आहे, परंतु

शंखवादक. ३ घड्याळजी. १ गोलंदाज. १३ नगारखान्याकडील असामी ( ४ सनईवाले, २ सूरकरी, २ कर्णेकरी, २ नगारजी, १ दमामी ह्मणजे मोठा नगारा-वाजविणारा, १ झांजी, १ बारदार ह्मणजे हरकामी. ) १ रस्ते झाडणारा त्र्यंबकेश्वराचे देवालयापासून कुशावर्तीपर्यंतचा.

येणेंप्रमाणें असामींची व्यवस्था संस्थानीं आहे, तथापि कालमानाप्रमाणें यांतील कांहींजणांस फांटा मिळालेला

आणिला व योग्य प्रसंगीं तो त्र्यंबकराजास अर्पण केला. या मुकुटाचें जडावकाम इतकें अप्रतिम आहे कीं, त्यावरील दोन रत्नें जीं निसटून पडलीं आहेत तीं यथापूर्वक बसविण्याचें श्रेय कोणीहि कारागीर घेण्यास धजत नाहीं. मुकुटास रत्नें सर्व प्रकारचीं आहेत. त्यांत हिरे आहेत, लाल आहेत, इंद्रनील आहेत, पाच आहेत व गोमेदादि इतरहि त्यांत आहेत. मुकुटाचा तुरा मोत्यांचा आहे व हीं मोत्यें चांगलीं पाणीदार अशीं आहेत. यात्रस्थ बहुधा हा पाहिल्याविना जात नाहीं. तो दर सोमवारीं बहुधा लोकांचे दृष्टीस पडावा यासाठीं संस्थानचे कारभारी बाहेर काढून मांडितात. दुसरा पाहण्याजोगा जिन्नस ह्मटला ह्मणजे रथ होय. देवास ही देणगी श्री० रघुनाथराव विठ्ठल ऊर्फ अण्णासाहेब विंचूरकर यांनीं सुमारें १२ हजार रुपये खर्च करून नवीन कारागिरीनें मंडित करून दिली आहे. हा रथ शके १७८७ च्या कार्तिक महिन्यांत पौर्णिमेस मिळाला आहे व त्या सालापासून रथोत्सव श्री० विंचूरकर हे दरसाल आपले पदरखर्चानें करीत असतात. हा समारंभ कार्तिक महिन्यांत पौर्णिमेस होत असतो. हा उत्सव सुरू झाल्यापासून कार्तिकीपौर्णिमेची यात्रा क्षेत्रीं भरूं लागली आहे. त्या दिवशीं सुवर्णकृत पंचमुखी त्र्यंबकराजाची स्वारी रत्नजडित मुकुट धारण करून ब्रह्मदेव सारथ्यास आहे व इतर लवाजमा बरोबर आहे, अशा थाटानें कुशावर्ततीर्थावर स्नानास जात असते. हा देखावा फारच मनोहर दिसतो. रथ राहण्यासाठीं कोटास लागूनच एक निवाऱ्याची जागा केलेली आहे, परंतु

सांप्रत ती फारच शोचनीय स्थितींत आहे. इकडे विंचूरकरांचे वंशज लक्ष देतील व असलेली उणीव दूर करतील अशी उमेद आहे.

श्रीच्या व्यवस्थेकरितां संस्थान ठेविलें असून त्यांत जे नोकरपेशाचे लोक आहेत, त्यांचा तपशील सामन्यतः खालीलप्रमाणें आहे:—

१ कारभारी. २ कारकून. १ कोठवळा. १६ शिबंदीकडील लोक ( १ सरदार, १ पोरगा, १ सबनीस, १३ शिपाई. ) ३ त्रिकाळचे पुजारी. २ नित्य प्रदक्षिणा करणारे ब्रह्मगिरीची ( १ नित्यचा, १ फिरता. ) १ दर सोमवारीं अभिषेक करणारा. १ देवापुढें पुराण सांगणारा पुराणीक. १ हरिदास ( कीर्तन करणारा व रोजची आरती करणारा. ) १ अवांतर सर्व देवतांचें पूजन करणारा फिरता ब्राह्मण. १ गंगाबाईची नित्यची एकादशनी करणारा. १ गवई. ६ शिष्य ( शागीर्द पेशापैकीं. ) २ आचारी ४ भोई पालखीकडे. १ अबदागीरवाला. १ मशालजी. १ बेल आणणारा बेलकरी. १ चोपदार. १ जंगम शंखवादक. ३ घड्याळजी. १ गोलंदाज. १३ नगारखान्याकडील असामी ( ४ सनईवाले, २ सूरकरी, २ कर्णेकरी, २ नगारजी, १ दमामी ह्मणजे मोठा नगारा-वाजविणारा, १ झांजी, १ बारदार ह्मणजे हरकामी. ) १ रस्ते झाडणारा त्र्यंबकेश्वराचे देवालयापासून कुशावर्तीपर्यंतचा.

येणेंप्रमाणें असामींची व्यवस्था संस्थानीं आहे, तथापि कालमानाप्रमाणें यांतील कांहींजणांस फांटा मिळालेला

आहे. ह्या एकंदर सर्व लोकांवर देखरेख कारभारी यांची असून संस्थानचा कारभार तेच आपल्या अधिकारानें चालवितात. हा कारभारीपणाचा मान जोगळेकर उपनांवाच्या एका संपन्न घराण्याकडे असून ज्या पुरुषानें त्र्यंबकचा किल्ला पेशव्यास मिळवून देऊन तळेगांवची जहागीर संपादन केली, त्यापैकींच एका शाखेंतील पुरुषाकडे तो आहे. सांप्रतचे कारभारी श्री. रा. रा. माधवराव नारायण जोगळेकर हे आहेत. ते अल्पवयी असतांहि कारभार दक्षतनें चालवीत आहेत, ही गोष्ट त्यास भूषणावह आहे.

देवाचे संबंधानें नित्यनैमित्तिक उपचार व व्यवस्था ही फार चोख रीतीनें बांधिली असून तजवीजही त्याप्रमाणेंच चालू आहे. ह्या व्यवस्थेंत एक मोठें व्यंग राहिलेलें आढळून येतें, तें हें कीं, इमारतींच्या दुरस्तींसंबंधांत खर्च करणें तो कोणीकडून ' व्हावयाचा, याचा कोठेंच उल्लेख नाहीं. ही उणीव आज आहे, परंतु परमेश्वरसत्तेनें स्वराज्यच चालू असते, तर ही अडचण वाटण्याचा संभव नव्हता. सांप्रतच्या स्थितींत उदारधी पुरुषांनीं द्रव्यद्वारां मदत केल्याशिवाय इमारतींचीं कामें जशींच्या तशींच राखणें दुर्घट आहे, इकडे लक्ष देऊन अशांकडून योग्य ती मदत मिळेल अशी आशा आहे.

उपचारासाठीं देवाचे मुखवटे दोन आहेत, त्यांत एक रुप्याचा एकमुखी असून दुसरा सोन्याचा पांचमुखी. एकमुखी मुखवटा नित्यशः होणाऱ्या त्रिकाल पुजासमयीं उपयोगांत आणिला जातो. सोन्याचा मुखवटा प्रतिसोमवारीं स्वारीचे वेळीं व विशेष उत्सवप्रसंगीं निघतो. प्रदोष

पूजनानंतर शेजारती करून सभामंडपांत वायव्य कोनांत असणाऱ्या अरसेमहालांत देवास निजवितात. दर शनिवारीं चार घटका रात्रौ देवास मंगलस्नान नानाप्रकारच्या सौगंधिक द्रव्यांनीं घालितात. त्यास शनिवारचें न्हाणें असें ह्मणतात. तें व स्वारी यात्रस्थ पाहण्याचा योग बहुधा साधितात. शिवाय महापूजा ह्मणून एक विशिष्ट प्रकारचा पूजनविधि महाशिवरात्र, वैकुंठचतुर्दशी व ग्रहणकाल ह्या समयास होत असतो.

हल्लीं उपयोगांत असलेला रुप्याचा मुखवटा पाऱ्हाळे येथील गुर्जर जातीचे धनिक वाणी गुलाबदास यांनीं करून दिलेला आहे. त्याचप्रमाणें सोन्याचा जो पंचमुखी आहे, तो मुळारंभीचा नसून मागाहूनपैकीं आहे. पहिला मुखवटा यशवंतराव होळकर यांनीं इकडील पेशव्यांचे मुलखांत लुटालूट करीत असतां क्षेत्रींच्या खंडणीऐवजी नेला म्हणतात. देवाचा मुखवटा हिंदुधर्मीय होळकरासारखा लुटारू काय ह्मणून नेईल अशा समजुतीनें तो तुंगाऱ्यानें पुढें केला होता. परंतु यशवंतराव यानें त्यावरच संतोषित होऊन आलेली वस्तु फामटून चालता झाला. पुढें रावबाजींनीं हा नवीन मुखवटा शक १७३८ सालीं तुंगारांचें उत्पन्न जप्त करून त्यांतून खर्च करून घडवून दिल्याची जनवार्ता आहे. त्याहि मुखवट्यास पोचे—यात्रेंत लोक देवावर जे पदार्थ उधळितात त्यायोगें—पडलेले नुकतेच नाशिककर चांदीचा माल तयार करून विकणारे व्यापारी रा. रा. गोविंदराव पळानिटकर यांनीं काढून पूर्ववत् करून दिलेला आहे. ह्या मुखवट्याचें वजन अजमासे ५०० भार आहे.

देवालयास लागूनच पश्चिम दिशेस कोटाचे बाहेर संस्थानची कोठी आहे व ह्याच ठिकाणीं देवाचे उपचारादि तर्तूद व आश्रितवर्गांचा भोजनविधि होतो. देवाची चीजवस्तही येथेंच असते. कारभारी यांची कचेरी ह्याच ठिकाणीं असून संस्थानसंबंधींचे लिहिण्याचें कामहि या ठिकाणांतील एका भागांत चालते. पूजादि देवाचे उपचार योग्य प्रकारें व यथाकालीं होतात किंवा नाहीं ह्यावर कारभारी यांची देखरेख नेहमीं असते. पुजारी लोक बरोबर पूजा वेळवर करितात न करितात, देवाचा नैवेद्य योग्य प्रकारचा असतो नसतो, ह्याबद्दल तपास समक्ष राहून कारभारी करितात व ज्याची कसूर आढळेल त्यास त्याबद्दल शासन करितात. मुख्य देवतापीठ खोल जागेंत असल्यानें बाहेरील उजेडाचा फारसा उपयोग आंतील देवतादर्शनास होत नाहीं. त्या ठिकाणीं संस्थानांतून जे नंदादीप असतात व इतर भाग्यवान भावीक लोकांनीं जे नंदादीप सुरू ठेविले आहेत त्यांच्या उजेडानें आंतील भाग प्रकाशित असतो. संस्थानच्या नित्यपूजेशिवाय आराधी ह्मणून एक यजुःशाखीय घराण्यांतील पुरुषांनीं प्रदोषकाळीं देवाची पूजा बांधण्याची वहिवाट पिढीजाद ठेविली आहे. ह्या आराध्यास संस्थानांतून कांहीं नेमणूक नाहीं. राजेरजवाड्यांतून कांहीं उत्पन्नें त्यांनीं आपल्या कर्तबगारीनें संपादन केलेलीं आहेत. ही आराध्यांची पुष्पपूजा चांगली पाहण्यासारखी असते. ह्या पूजनसमयीं रौप्यमय मुखवटा उपयोगांत आणितात. संस्थानची सरकारी पूजा होत असतां देव कोरडे झाल्यावर पूजा-संपपर्यंत कोणीहि देवावर पाणी

वगैरे घालूं नये अशी बंदी असते. इतर वेळीं कोणासही मनसोक्त प्रभूचें पूजन करण्याची मोकळीक आहे. दक्षिणेंतील कांहीं कांहीं देवांचे पूजनावर ज्याप्रमाणें कर बसलेला ऐकूं येतो, त्याप्रमाणें या क्षेत्रीं कांहींच प्रतिबंधी नाहीं.

२ **श्रीगंगामंदीर**:—हें मंदीर फार पुरातनपैकीं नाहीं. श्रीकुशावर्ततीर्थावर ओवरीमध्यें एका कोनाड्यांत एक पाषाणमय गंगेची मूर्ति आहे. व सालोसाल हें नवीन गंगामंदीर होण्यापूर्वीं गंगावतारासंबंधीचा जो दशहार त्यांत उत्सवापुरती व्यवस्था करून समारंभ पार पाडण्यांत येत असे. येथील लोकवस्ती बहुशः भिक्षुकवर्गीयांचीच आहे व त्यांत मुख्य तीन प्रबल पक्ष आहेत. एक, कोंकणस्थांचा; एक, ऋग्वेदी देशस्थांचा व एक, यजुःशाखीयांचा. या प्रत्येक पक्षाचें एकेक विशिष्ट मंदीर आहे. तें परशुराम, राम व कृष्ण या अनुक्रमानें. याबद्दलची माहिती यथानुक्रम येणार आहे. कांहीं यजुःशाखीय मंडळींनीं नासिक वगैरे क्षेत्रीं गंगादि देवतांच्या मूर्तींची स्थापना मंदीर बांधून झालेली पाहून मूळ क्षेत्रींच गंगाबाईचें विशिष्ट मंदीर असावें अशी इच्छा धरून कुशावर्ततीर्थाचे उत्तरबाजूकडील ओवरीच्या पलीकडील भागांत एक पऱ्याचें लहानसें टुमदार मंदीर बांधून त्यांत सुंदर शुभ्रवर्ण संगमरवरी पाषाणाची मूर्ति स्थापन केली आहे. या मंडळीच्या पुढारीपणाचा मान ह. प. रा. रावो गणेश तानपाठक यांनीं मिळविलेला आहे. मंदिराची भरभराट होत आहे. मुंबईकडील कांहीं उदार पुरुषांनीं कोणी हंड्या, कोणी तसबिरा, कोणी फरसबंदी, कोणी कांहीं, कोणी

कांहीं अशा देणग्या देऊन या सत्कृत्यास हातभार लाविला आहे. हल्लीं या मंदिराची व्यवस्था उत्पादकांपैकींच कांहीं मंडळींच्या कमेटीकडे असून देवीपुढें येणारी मिळकत उत्सवादि समारंभांत खर्चिली जाते. कुशावर्तावर स्नान करून गंगाबाईचें दर्शन घेतल्याविना सहसा यात्रस्थ अगर ग्रामस्थ पुढें जात नाहीं. मूर्ति मूळची सुंदर असून पूजक तिला वस्त्रालंकारांनीं जास्त शोभा आणितात. केव्हां बाल्यावस्था, केव्हां यौवन, केव्हां प्रौढावस्था अशी छबी दाखविली जाते. त्यांतल्यात्यांत मंदिराची सोय केली असल्यानें मंदिराची जागा अंमळ संकुचित झालेली आहे. व्यवस्था साधारण बरी आहे. ही गोष्ट व्यवस्थापक मंडळीस भूषणावह आहे. दरसाल माघमासीं गंगावतारा दिवशीं गंगेचा जन्मोत्सव ह्या मंदिरीं केला जातो. ह्या उत्सवास दशहार म्हणतात. दहा दिवस कीर्तन, मंत्रपुष्पांजली, विशेष पोषाख चढविणें इत्यादि प्रकार चालतात. अखेरच्या दिवशीं ब्राह्मणभोजन व रात्रौ चिराकदान करितात. पूर्वीपासून वर निर्दिष्ट केलेल्या तीनहि ज्ञाति आपापल्या पूर्वापार चालत आलेल्या घांटावर गंगापूजनादि विधि करितात व जी ती ज्ञात आपापल्या भागांत दीपोत्सव अखेरच्या दिवशीं करिते. मुख्यतः दक्षिण घांटावर कोंकणस्थ, पूर्वेकडील घांटावर देशस्थ व राहिलेल्या दोन घांटावर यजुःशाखीय पूजनादि प्रकार करितात. वास्तविकपणें सर्व शाखीयांचें हें एक सामान्य मंदीर असावयाला पाहिजे होतें. परंतु तशा प्रकारची व्यवस्था कां घडून आली नाहीं समजत नाहीं. मंदिराचे कामास आरंभ

शके १८०२ मध्यें होऊन मंदीर पूर्ण झालें. मूर्तीची स्थापना शके १८०३ त झाली. मंदीर बांधण्याकडे आजतागायत अजमासें खर्च ४००० रुपये झाला आहे.

३ **श्रीपरशुराम मंदीरः**––या क्षेत्रीं त्र्यंबक येथील कोंकणस्थज्ञातीय मंडळींनीं आपसांत वर्गणी करून व इतर ठिकाणीं मुद्दाम फिरून वर्गणी जमवून हें मंदीर बांधिलें आहे. जुन्या घर्तीच्या सोइस्कर मंदिराच्या घांटाचा तो एक नमुना आहे. यद्यपि दशावतारांतील रामावतारापूर्वीचा श्रीपरशुरामावतार आहे. तथापि पृथ्वीदान करून समुद्रापासून नवीन भूमीची पट्टी घेऊन या ठिकाणीं कांहीं काळ पावेतों त्यांची वस्ति झाल्यामुळें व तें ठिकाण सामान्यतः कोंकणपट्टीचें असल्यानें ही देवता कोंकणपट्टींत असून तत्रस्थांनीं तिला विशेष पूज्य गणिली आहे. कोंकणांत श्रीपरशुराम ह्या देवतेस परमपवित्र मानिलें जात आहे. देशावर कोंकणची मंडळी येऊन कायमची वसाहत घांटावर करून राहूं लागल्यास यद्यपि बराच काळ लोटला आहे, तथापि आपल्या मूळस्थानीय देवता व कुलधर्मादि धर्मसंस्कार त्यांनीं कांहीं कांहीं कायम राखिले आहेत. देशधर्मानुसार देशवळघाटही कांहीं बाबतींत नवीन शिरले आहेत. श्रीक्षेत्र त्र्यंबक येथें नीलपर्वतावर मुख्य तत्स्थानापन्न देवता जी नीलांबिका देवी, तिच्या मागील बाजूस नीलकंठेश्वराचे देवालयांत एक पुरातन श्रीपरशुरामाची मूर्ति आहे.

कायमचें मंदिर बांधलें जाऊन त्यांत मूर्तीची स्थापना होण्यापूर्वीं बरींच वर्षें नुसता वार्षिक उत्सव अक्षय्यतृतियेचे

वेळेस तात्पुरती मूर्ति बसवून केला जात होता. आरंभास कोणी कृष्णंभट फडके उपनांवाचा एक विरक्त साधुपुरुष जो क्षेत्रवासासाठीं श्रीक्षेत्रीं येऊन राहिला होता, त्याच्या जवळील धातुमय मूर्तींत एक परशुरामाची मूर्ति असून वर्षास तो यथाशक्ति जयंतीच्या वेळीं उत्सव करित असे. कृष्णंभट मरण पावल्यानंतर कोंकणस्थांचें उपास्यदैवत या दृष्टीनें परशुरामजयंतीचा उत्सव करण्याचे त्या काळीं ऐन तारुण्यांत व उमेदींत असणारी जी तरुण मंडळी होती, त्यांनीं अंगिकारिलें व सालोसाल हळूं हळूं जास्त जास्त प्रमाणावर तो होत चालला. पुराण, कीर्तन, ललितें इत्यादि थाट होऊं लागले. अशा प्रसंगास तात्पुरती घेत लेली जागा अपुरी व गैरसोईची वाटूं लागली व तसें वाटणें, जेव्हां गोष्ट जोरावर असते तेव्हां साहजिकच असतें. अखेरीस कायमचें मंदीर कां नसावें असा खल होतां होतां या सत्कृत्यांत आपआपसांत यथाशक्ति व शक्त्यनुसार हातभार प्रत्येकानें दिला आहे. ही जी आरंभक मंडळी यांत वे. शा. हरीशास्त्री फडके, भास्करराव बाबासाहेब जोगळेकर, अंताजीपंत मराठे, केसुअप्पा फडके, भाऊराव ओक इत्यादि मंडळी होती; शिवाय यांना अनुकूल असे यांच्यापेक्षां वयानें वडील व धाकटे हेहि नसत. बाहेरून द्रव्य संपादन करून आणण्यांत वे. शा. रावजीशास्त्री पाटणकर वगैरे सर्वमान्य विद्वानांनीं पुढाकार घेतला होता. ठिकठिकाणीं हिंडून निरपेक्षबुद्धीनें द्रव्यसहाय्य मंडळीनें संपादन केलें. मंदीर बांधण्याच्या कामांत विशेषशी मदत रा. रा. वामनराव भाऊ वाड नासिककर, तात्यासाहेब

जोगळेकर, मोरोपंत तात्या काळे वगैरेंची झालेली असून त्याबद्दलचे कागदपत्र मंदिरांत ठेविलेले आहेत. लिंबक येथील राहणारे वे. रा. गोविंदभट फडके ज्यांस सामान्यतः गोविंदबाबा असे ह्मणत असत त्यांचे ठिकाणीं सोपचार देवपूजा करण्याचा साहजिकपणें अंकूर असल्यानें उत्सवारंभापासून निष्ठापूर्वक देवार्चनादि विधि स्वकष्टानें संतोषपूर्वक ते करीत असत. पुढें मंदिराचें काम पुरें झाल्यावर सांप्रतची मूर्ति घडून तयार नसल्यानें शून्य मंदीर ठेवणें चांगलें नाहीं असें जाणून श्री. अण्णासाहेब विंचूरकर यांचे संग्रहीं जुनी नारायणाची मूर्ति असलेली त्यांनीं रा. रा. तात्यासाहेब जोगळेकर यांचे मध्यस्तीनें दिली व ती अद्याप मंदिरांत ठेवण्यांत आली आहे. मूर्ति काळ्या पाषाणाची असून फार चांगली आहे. सांप्रतची मूर्ति येण्यापूर्वीं उत्सवासाठीं मृण्मयमूर्ति वे. रा. गोविंद दाजी आपटे करीत असत व हल्लींच्या मूर्तीचा नमुनाही त्यांनींच करून देऊन त्यांनीं स्वतः मुंबईस जाऊन आपल्या देखरेखेखालीं ती करवून आणिली आहे. मूर्तीचें काम फारच गोड आहे. सर्व अवयव अगदीं रेखाटल्यासारखे आहेत. अर्चेचा समारंभ व विधि फारच प्रेक्षणीय झाला व यथाशास्त्र झाला असें ह्मणतात. मंदीर तयार होऊन मूर्तीची स्थापना होतांना पूजा, नैवेद्य, नंदादीप यांबद्दल कायमची स्वस्थता असावी असें मंडळीस साहजिकच वाटूं लागलें व ही व्यवस्था एकाद्या संस्थानिकानें मनावर घेतल्याशिवाय व्हावयाची नाहीं असें ठरलें. संस्थानिक स्वतः उदारधी व निष्ठावंत असून राजकारणी पुरुषवर्गांतला व

उपकारक असा असल्याविना देवस्थाननेमणूक होऊं शकत नाहीं. संस्थान जव्हार हें क्षेत्राच्या नजीकचें असून तेथें क्षेत्रस्थांचें दळणवळण पूर्वापार चालत आलें असून अनुकूल परिस्थितीही असल्याचें मंडळीस दिसून आलें. त्या वेळचे संस्थानाधिपति कै. श्री. पतंगशहा फार उदार, धर्मकृत्यांकडे त्यांचा कल असून, कै. रा. रा. त्र्यंबकराव दादा चिपळूणकर क्षेत्राभिमानी व अनुकूल असल्यानें मंडळीच्या मनोदयानुरूप लवकरच घडून आलें. ही देणगी शके १८०१ सालांत मंदिरास मिळाली. नेमणूक कोणाचे नांवाची करावी असा प्रश्न निघाला असतां सर्वतोमुखीं एकनिष्ठ देवसेवा करणारी व्यक्ति जी गोविंदबाबा त्यांचें नांव पुढें करण्यांत येऊन दरसाल १०० रुपयांची नेमणूक मरहुम बाबा यांचे नांवें करण्यांत आली. हल्लीं बाबांचे पुतणे काम चालवीत आहेत. ज्याप्रमाणें देवसेवेच्या संबंधांत गोविंदबाबांचें नांव चिरस्मरणीय झालेलें आहे, त्याचप्रमाणें मंदिराची इतर व्यवस्था राखण्यांत वे. रा. बाळंभटजी अभ्यंकर उर्फ बाळंभटमामा यांनीं लौकिक मिळविला असून सांप्रतही तेच यथापूर्वक व्यवस्था चालवीत आहेत.

परशुरामजयंतीचा उत्सव वैशाखमासीं अक्षय्यतृतियेस होतो. उत्सवास आरंभ प्रतिपदेस होत असतो. दररोज कीर्तन, पुराण, मंत्रजागरादि उत्सवांत होत असतात शिवाय ललिताच्या पुढची पायरी जो नाट्यप्रयोग तोही केव्हां केव्हां उत्सवांग म्हणून करण्यांत येत असतो. अखेरीस पारणें होऊन स्वारी देवाजीची निघते व उत्सव पूर्ण

होतो, असा पाठ आहे. पारणें व स्वारी निश्चयानें अमकेच दिवशीं निघते याचा नेम नसतो.

सार्वजनिक उपयोगाकरितां ह्मणून ब्रह्मानंदस्वामींच्या नांवानें भांडीं केलेलीं हल्लीं मंदिरांतच असून मंदिराच्या व्यवस्थापकाकडून तीं वेळोवेळीं जरूर तेव्हां उपयोगाकरितां नोंद ठेवून दिलीं जातात. मंदिराची जागा चव्हाट्यावर असून मध्यवर्ती असल्यानें रिकामपणचें तें आराम स्थानच झालेलें आहे. हिरण्यकेशीयांची वेदशाळा सांप्रत मंदिरांत चालूं आहे. ज्याप्रमाणें पूजानैवेद्याची सोय झालेली आहे, त्याचप्रमाणें सालाबाद उत्सवाची सोय झाल्यास मंदिराच्या व्यवस्थेंत व्यंग राहणार नाहीं. इकडे धनिक उदारधी लक्ष देतील अशी आशा आहे. हल्लीं उत्सव वर्गणीनें करण्यांत येत असतो. मंदीर शके १७९८ त पूर्ण होऊन शके १८०१ मध्यें अर्चा झाली. सनदही त्याच दिवशीं मिळाली. खर्च सुमारें १५,००० रुपये आला.

**४ राममंदीर**:—श्रीपरशुराम मंदिराच्या उत्तरेस थोड्या अंतरावर राममंदीर आहे. हें अलीकडील असून देशस्थ ऋग्वेदी मंडळीनें आपसांत वर्गणी करून व इतरत्र ठिकाणीं फिरून मदत मिळवून बांधिलें आहे. या कामास खर्च अजमासें २३०० रुपये झाला आहे. मंदिराचें काम लहान असून टुमदार आहे. पूजादि व्यवस्था कोणाकडे असावी अशाबद्दल कांहीं नियम नाहीं. रामलक्ष्मण व सीताबाई अशा तीन मूर्ति असून चांगल्या सुरेख आहेत. ज्याप्रमाणें कोकणस्थ मंडळींचें आरामस्थान परशुराममंदीर आहे,

त्याचप्रमाणें देशस्थ मंडळीचें हें मंदीर आहे. व्यवस्था आपसांत ठरवून ठेविली जाते. श्रीचा उत्सव रामनवमीचा दर चैत्रमासीं होतो, तेव्हां इतर ठिकाणाप्रमाणें कथापुराणादि होत असतात. मिरवणूक अखेरीस निघते ती तात्पुरता रथ करून त्यांत मूर्ति बसवीत असत. ही उणीव लक्षांत आणून संस्थानचे माजी कारभारी कै. रा. रा. नारायणराव तात्यासाहेब ओगलेकर यांनीं साधाच परंतु मजबूत असा एक रथ करून व तो श्रीस समर्पण करून ती दूर केली आहे. मंदीराची व्यवस्था एकंदरींत बरी आहे.

**५ कृष्णमंदीरः**—हें मंदीर कुशावर्ततीर्थाचें मागील बाजूस आहे. हल्लींची इमारत पूर्वींच्या ठिकाणींच मुंबईचे व्यापारी कंत्राक्टर यांनीं बांधून दिलेली आहे. बांधकाम परशुराममंदिराचे नमुन्यावर असून लांकडाचे ठिकाणीं शक्य तेवढे जागीं लोखंडाचा उपयोग केलेला आहे. पाटणकाम फळ्यांचें नसून चुन्याचें आहे. कंत्राटदाराचा विचार वर गच्चीही चुन्याचीच करून देण्याचा होता, परंतु एकसाल क्षेत्रींच्या पावसाचा अनुभव घेऊन त्यांना तो बेत बदलावा लागला. खपरेल पत्र्याचें करून दिलें आहे. मूर्तिहि नवीन भव्य घाटाच्या स्थापन केल्या आहेत. हें मंदीर यजुःशाखीय मंडळींचें ह्मणून समजण्यांत येतें. गंगामंदीर होण्यापूर्वीं तीन शाखेंचीं तीन निरनिराळीं मंदिरें असत. हल्लीं यजुःशाखीयांचीं अशी दोन मंदिरें झालीं आहेत. सालाबाद जन्माष्टमीचा उत्सव करण्यांत येतो. मंदिरास खर्च अजमासें ८,००० रुपये झाला असून काम संपूर्ण शके १८२४ या वर्षीं झालें. मंडळींनीं आपसांत

व्यवस्थापक नेमून व्यवस्था करून ठेविली आहे. व्यवस्था बरी आहे.

६ **लक्ष्मीनारायण मंदीरः**—हें मंदीर वाहत्या गंगेच्या काठीं लांकडी पुलानजीक आहे. हल्लींची इमारत पूर्वींची जुनी इमारत पाडून त्या ठिकाणीं झालेली आहे. मुंबईच्या भाटे जातीच्या एका बाईनें अदमासें ७०० रुपये खर्चून ही इमारत बांधिली आहे. या मंदिरची व्यवस्था बांधणाऱ्या बाईचे उपाध्याय देवकुटे उपनामक यजुःशाखीय ब्राह्मणाकडे आहे. मंदीर अगदीं नाक्यावर असून व्यवस्था बरी आहे.

७ **नीलपर्वतः**—ही नीलपर्वत नांवाची टेंकडी गांवाच्या साधारणतः उत्तरेस आहे. टेंकडीची उंची फार नाहीं. वर अहःबाणी गोसाव्यांचा आखाडा आहे. नीलांबिका नांवानें प्रसिद्ध असलेली भवानीची प्रतिमा या ठिकाणीं आहे. हें स्थान फार पवित्र आहे. मनोभावें करून देवीची आराधना करणाराच्या कामना पूर्ण होतात असें सांगतात. नित्य दर्शनानें कुष्टादि व्याधी दूर झाल्याचे दाखले आहेत. नीलपर्वतावर चढून जाण्यास पूर्वीं पायऱ्या नव्हत्या. ती अडचण संवत ११३४ मध्यें मुंबईचे एक प्रसिद्ध कपोल गुर्जर यांनीं सुमारें १६००० रुपये खर्च करून ३५० पायऱ्या बांधून मार्ग सुगम केला आहे. नवरात्रांत संस्थानांतून दरसाल या देवीस साडीचोळी अर्पण करण्यांत येते. नीलांबिका देवीचें देवालय दगडी मजबूत असें आहे. मंदिराच्या पश्चिम भागीं थोडा चढाव चढून गेल्यावर गोसाव्यांचें दत्तमंदीर आहे. त्यापलीकडे नीलकंठेश्वराचें

देवालय आहे. या ठिकाणावरून प्रांतभागांची शोभा चांगली दिसते, व हें ठिकाण हवाशीर आहे. या उष्णकाळांत या स्थळीं पुष्कळ लोक व्यायामचा व्यायाम करून हवा खाण्याकरितां येतात. खालीं उत्तर दिशेस बिल्वतीर्थाची शोभा दिसते, तों दक्षिणेस क्षेत्रींचीं घरें, देवालयें वगैरे देखावा दृष्टीस पडतो. इतर दिशेस नजर दिली असतां भाताची आवणाड सारखी नजरेस येते व मधून नासिक त्र्यंबक सडक सर्पाकार पसरलेली दिसते. याप्रमाणें या ठिकाणाहून सृष्टिदेवीचीं निरनिराळीं स्वरूपें नजरेस येतात. देवीचा तांदळा असून चेहरा भव्य व मोठा आहे. सबंध मूर्ति नाहीं. नवरात्रांत झुंडीच्याझुंडी देवीदर्शनार्थ जातांना दिसतात. कोणी सकाळीं, कोणी सायंकाळीं, कोणी फावेल त्या वेळेसः लहान मुलेंहि हा चढाव सहज चढून जातात, इतका सुलभ आहे. मूळगांव डोंगरपठारीच्या आडोशास असल्यानें पश्चिमेकडील वारा लागत नाहीं, परंतु या पर्वतावर एक समोरच खिंड आली असल्यानें त्यास प्रतिबंध नसतो. धार्मिक दृष्टीनें व सामान्य दृष्टीनेंहि हें ठिकाण एकवार तरी यात्रस्थानें पाहण्यालायक आहे.

८ **निवृत्तिनाथाचें मंदीरः**—निवृत्तिनाथ हे प्रसिद्ध ज्ञानेश्वरमहाराजांचे ज्येष्ठ बंधु व उपदेशक आहेत. यांच्याच सांगीवरून ज्ञानेश्वरांनीं अमृतानुभव नांवाचा एक अत्युत्तम वेदांताचा ग्रंथ मराठीभाषेंत लिहिला आहे. निवृत्तिनाथ महान् साधु असून ब्रह्मनिष्ठ असत. त्यांचें देहावसान ह्या क्षेत्रीं होऊन त्यांची समाधि गंगासागराच्या प्रांतभागावर आहे. आरंभीं त्या ठिकाणीं सामान्य झोंपडें होतें. त्याचें

एक सामान्य देवालय लक्ष्मणलाल नांवाच्या जांगळे-करांच्या शिपायानें पंचवीसशें रुपये खर्चून बांधिलें होतें. धर्मशाळा व मंडप वारकरी मंडळींनीं वर्गणीनें बांधिले होते. परंतु त्यांची आहुति अग्निमुखीं कांहीं वर्षांपूर्वी पडल्यामुळें पुनः सर्व दुरुस्तीचें काम सुंदराबाई नांवाच्या कोणा एका संतिणीनें लोकाश्रयानें केलें आहे. हल्लींचें काम पहिलें कामापेक्षां चांगलें मजबूत व प्रेक्षणीय झालेलें आहे. बाजूला विस्तीर्ण धर्मशाळा असून मंदीर मध्यवर्ती आहे. समाधि-नजीक ब्रह्मानंद ह्मणून एक चांगले स्वामी होऊन गेले, त्यांची समाध आहे. या स्वामींची पुण्यतिथि कठोरे वगैरे येथें व येथील कोंकणस्थ जातीकडून दरसाल वर्गणीनें केली जाते. निवृत्तिनाथांच्या पुण्यतीथीचा दिवस पौष वद्य ११ चा असून त्या वेळीं ठिकठिकाणची संत मंडळी येथें जमते. पूर्वीं ही यात्रा मोठी होत नव्हती; अलीकडे बरेच संत जमूं लागल्यानें यात्राहि वाढत्या प्रमाणावर आहे. बेलापूरकर, अंमळनेरकर, चोपडेकर, वगैरे वारकरीपंथाचे बोवा येथें यात्रेला येतात. त्यावेळीं यात्रेचा बाजार भरतो व वारकऱ्यांचे तुक्के निरनिराळे भागांत पताकांसह उतार-तात व दिंड्या धरून भजनाचा कडाका चालवितात. ते वेळीं या क्षेत्रास पंढरीचा थाट येतो. द्वादशीस दिंडी निघते, ती मिरवत मिरवत श्रीत्र्यंबकेश्वराचे देवालयांत येऊन तेथें कांहीं वेळ भजनाचा थाट उडतो. झांजाचे तालावर प्रेमभरांत कोणी नाचतात, कोणी डुलतात तर कोणी आलाफदारींत अभंग गातात. अशा वेळीं प्रेक्षकज-नांच्या वृत्तीहि भक्तिप्रेमानें उचंबळूं लागतात. व कोणी

सहृदय असला तर तो भक्तिभरांत गुंग होऊन जातो. यद्यपि वैष्णवपंथीय ही मंडळी असते, तरी त्र्यंबकराज त्रिगुणात्मक असल्यानें तद्दर्शनार्थ व गंगास्नानास संतमंडळी जाण्यास चुकत नाहीं.

९ किल्ला ( मूळगंगा ):—हा किल्ला भुईकोट नाहीं. डोंगरी किल्ला आहे. व याची उंची समुद्रसपाटीपासून ४८२८ फूट असून गांवचे सपाटीपेक्षां १,८०० फूट उंच आहे. हल्लीं तो अगदीं नादुरुस्त स्थितींत आहे. तटबंद्या, कोटी-गृह वैगेरे सर्व भाग पडून मोडून गेले आहेत. मात्र अवशेष भाग अद्याप त्याच्या पूर्वस्वरूपाची साक्ष पट-विण्याइतके इतस्ततः अव्यवस्थितपणें दिसण्यांत येतात. किल्ला ह्या दृष्टीनें पाहिल्यास मोठ्या सैन्यासही बळजोरीनें सर करून घेण्यास फार दुर्घट आहे, असें तज्ज्ञांचें मत आहे. किल्ल्यावर जाण्यास वाटा दोन आहेत. एके वाटेस महादरवाजा ह्मणतात. व एक अगदीं पायवाट आहे. मुख्य वाट सुगम असून पूर्वीं किल्यावर रसद वैगेरेहि त्याच वाटेनें जात असली पाहिजे असें वाटतें. हा मार्ग अम्मळ फेऱ्याचा आहे. जवळच्या अवघड वाटेनें ज्यांस जाणें अशक्य वाटतें ते ह्या वाटेचा उपयोग करि-तात. हल्लीं हा मार्ग बराच नादुरुस्त झाला आहे. पाय-वाटेनें गेल्यास कांहीं भाग म्हणजे किल्ल्याचा ऐनभाग अगदीं नीट जिने चढून चढावा लागतो. अनभ्यस्तास तोल संभाळून वरील पायरीच्या खोबळ्यांस धरून नजर फिरूं नये ह्मणून इकडे तिकडे न पाहतां जपून चढावें लागतें. सर्व जिने चढून गेल्यावर किल्ल्यावरील सपाटी

लागते. कोटीतीर्थ ह्मणून एक तीर्थ लागतें. यांतून पावसाळ्यांत मोठाल्या गिरिनळ्या वाहतांना दिसतात. रेवून गेल्यानें उष्णकाळांत यांत पाणी राहत नाही. वरील सपाटी अगदीं मैदान अशी नाहीं, उंचसखल प्रदेश आहे. मागील बाजूस त्र्यंबकेश्वराचें ह्मणून देवालय असून एक कुंड देवालयासमीप आहे, त्यास किल्ल्यावरील कुशावर्त ह्मणतात. बाजूस ओवऱ्या आहेत. या ठिकाणाहून खालील भूपृष्ठाचा देखावा चांगला मनोहर दिसतो. देवालयास प्रदक्षिणा घालण्याची वाट एके बाजूस फार अवघड आहे. देवालय अगदीं कडयाच्या कांठावर असल्यानें फारच तोल संभाळून चालावें लागतें. एका बाजूस देवळाची भिंत व एका बाजूस नीट खोल कडा अशा जागेंत सुमारें मुंडा हात रुंदीच्या मार्गावर चालावें लागतें. ह्यावरील कुशावर्ताचें पाणी फारच थंड व मधुर असतें. संस्थानांतून नित्यशः तुंगाराचे हस्तें पूजानैवेद्य देवास जात असतो व त्याबद्दल त्यास कांहीं नेमणूक मिळते. त्याच्याच वरचे अंगास अंमळ दूर गेलें ह्मणजे गंगेचें मूळस्थान लागतें. बावडीच्या आकाराचें तें एक तीर्थ आहे. श्रीशंकरांनीं जटा आपटल्याचें ठिकाणही पलीकडे जवळच असून तो एक खडकाचा भाग आहे, व त्यास दोन खळगे बऱ्याच अंतरावर असून त्या गुडघ्यांच्या खुणा व खडकास कांहीं रेषाकार भाग दिसतात, त्या जटा असें सांगण्यांत येतें. वरचेवरूनच एका टोंकापासून दुसरे टोंकापर्यंत जातां येतें. गंगाद्वारावर येऊन पुढें गेलें ह्मणजे भंडारदुर्ग ह्मणून ठिकाण लागतें व त्यापुढें गेल्यावर उत्तरेकडील

किल्ल्याचा शेवट लागतो. त्या ठिकाणीं खडक कोरून एक मोठें गच्चीसारखें ठिकाण केलेलें आहे. ठिकठिकाणीं माऱ्याच्या जागा केलेल्या आहेत. किल्ल्यावर एक मोठी वृक्षराजी आहे, त्यांत रगतरोडा ह्मणून एक औषधीय वनस्पति आहे. तिचीं झाडें ह्या प्रदेशांत इतरत्र फारशीं आढळण्यांत येत नाहींत. येथील डोंगरी लोक इतके सराईत झाले आहेत कीं, लांकडाचें पेंडकें घेऊन ते अवघड ह्मणून सांगितलेल्या वाटेनें झराझर उतरून येतात. पर्जन्यकाल संपल्यावर किल्ल्यावरून फारच बहारीचा देखावा दिसतो. ज्यास संवय असून सवड असेल त्यानें क्षेत्रीं आल्यावर किल्ला पाहून जाणें चांगलें.

या वर वर्णिलेल्या ठिकाणाशिवाय पुष्कळ देवालयें इतस्ततः बांधलेलीं आहेत. त्यांत तीर्थातीर्थावर त्या त्या तीर्थाच्या देवतेचें देवालय आहेच. ह्यांतील कांहींचा निर्देश खालील कोष्टकांत दिलेला आहेः—

| देवतेचें नांव. | ठिकाण. | बांधणारा. | रक्कम. | शक. |
|---|---|---|---|---|
| विष्णुमंदीर. | त्र्यंबकेश्वराचे कोटाजवळ. | हेमाडपंती. | ० | ० |
| त्रिसंधेश्वर. क्षेत्राधिपति. | त्र्यंबकेश्वराचे कोटाबाहेर दक्षिणेस. | बापूभट्ट कालेकर. | ० | ० |
| गायत्री. टपकाई. | ,, | हेमाडपंती. | ० | ० |
| त्रिभुवनेश्वर. | कोठीजवळ. | अहिल्याबाई होळकर. | २२०० | १७०१ |
| ज्वरेश्वर. | कनखलाजवळ. | सखारामबापू बोकील. | ७०० | १७२० |
| कंचनेश्वर. | कंचनाजवळ. | शिवभट्ट खेर. | ३००० | १६९५ |
| केदारेश्वर. | कुशावर्ताजवळ | पारनेरकर. | ० | १६७२ |
| इंद्रेश्वर. | इंद्रतीर्थाजवळ. | विष्णु महादेव गद्रे | ५०००० | १७१० |

| देवतेचें नांव. | ठिकाण. | बांधणारा. | रक्कम. | शक. |
|---|---|---|---|---|
| बल्लाळ विनायक. | कृष्णमंदिरा-नजीक. | रघुनाथराव पेशवे. | ३०००० | १७०४ |
| भुवनेश्वरी. | गंगालयाचे वरीलबाजूस. | ० | ० | ० |
| काशीविश्वेश्वर. | जोगळेकराचे घरानजीक. | जोगळेकर. | १००० | ० |
| रामेश्वर. | गौतमालया-जवळ. | वामनशास्त्री खाडीलकर. | २५० | १७१४ |
| गौतमेश्वर. | ,, | नारो दामोदर पंडित | ६०००० | ० |
| मुकुंदेश्वर. | महामारीनजीक. | धनशेट शिंपी. | १५००० | १७१४ |

शिवाय मारुती, शनी, महामारी वगैरे देवालयें आहेत.

---

# भाग ६ वा.

## ग्रामवर्णन.

गांवची वस्ती डोंगराच्या पायथ्याशीं आहे. आजुबाजूस मोठीशीं गांवें नाहींत, खेडींच आहेत. लोकवस्तींत मोठासा भरणा ब्राह्मणांचा आहे. बहुतेक ब्राह्मण वृत्तिवंत भिक्षूक आहेत; थोडे मोजके लोक सुखवस्तु आहेत. वस्तीचा घांट साधारण लांबीरुंदीनें जवळजवळ सारखाच आहे. अजमासें १,२०० हात प्रमाण येईल. नवीन गणनेप्रमाणें लोकसंख्या ३,३२० इतकी आहे. घरें अदमासें ७०० इतकीं आहेत. सरकारी कायद्याप्रमाणें यद्यपि वस्ती म्युनिसिपालटीच्या स्थापनेस पुरेशी नाहीं. यात्रस्थांचा येवा बराच असल्यानें एकंदरांच्या सोयीसाठीं

तिची स्थापना इ. स. १८६६ मध्यें झालेली आहे. म्युनिसिपालिटीनें घरपट्टी, भंगीपट्टी, दस्तुरी वगैरे कर ठेवले असून गेल्या सिंहस्थापासून चालू केलेला यात्रेकरूंचा कर चालूंच ठेविला आहे. म्युनिसिपालटीचें उत्पन्न अजमासें ९,००० रुपये असून खर्चाचें मान जवळजवळ सफाईखर्चासुद्धां तितकेंच असल्यानें इतर अवश्य उपयोगाचीं कामें होत नाहींत. पर्जन्यकाळीं वर्षाव फार होत असल्यानें बहुतेक रस्ते फरसबंदीचे केलेले आहेत. पूर्वीं ह्या गांवीं सरकारी महालकचेरी असे; हल्लीं ती बंद आहे. वास्तविकपणें अशा ठिकाणीं तिची अवश्यकता आहे. पोलिसगेट, पोष्ट, दवाखाना, मुलांमुलींच्या शाळा, संस्कृत पाठशाळा, वेदशाळा, पुस्तकालय वगैरे सार्वजनिक उपयोगाच्या संस्था येथें आहेत. व त्यांचा उपयोग शक्य तेवढा क्षेत्रवासी जनांस होत आहे.

जमीन महसुलाचें दृष्टीनें त्र्यंबक गांव अगदीं भिकार आहे. वसूल अजमासें एक सहस्र रुपये आहे. शिवाय या ठिकाणीं व्यापारोपयोगी धंदाही कोणताच नाहीं. कांहीं वर्षांपूर्वीं चातुर्मासांत नित्योपयोगी लागणारे जिन्नस मिळत नसत. यामुळें बेगमी करून ठेवावी लागत असे. परंतु दळणवळणाचे मार्ग सुगम झाल्यानें दुकानदारी वाढली असून पहिल्यासारखी अडचण राहिली नाहीं; तथापि लोकांची जी प्रवृत्ति पडून गेलेली आहे ती आद्याप कायम दिसते. बहुतेक माल नासिकाहून येथें येतो. भात, तुरी, भगर, नागली, हिरडे इत्यादि माल बाहेर जातो, परंतु हाहि मोठ्या प्रमाणांत जातो असें नाहीं. गांवांतील बहुतेक घरें

कौलारू असून चांगलीं मजबूत आहेत, व यात्रस्थांस उतरण्यास बरींच प्रशस्थ अशीं बांधलेलीं आहेत. पूर्वींच्या काळीं ह्मणजे किल्लेदार असतांना गांवाच्या भागास 'पुरा' अशी संज्ञा असे. उदाहरणार्थ, अब्बादपुरा, निजामपुरा इत्यादि. हल्लीं कोंकणस्थ आळी, देशस्थ आळी, यजुर्वेदी आळी, बाजारपट्टी, तेलआळी असे भाग आहेत. ब्राह्मणमंडळींत यजुर्वेदीय ब्राह्मणांचा मोठा भरणा आहे. इतर दोन्ही ज्ञाति साधारण सारख्याच प्रमाणाच्या आहेत. आरंभीचें या क्षेत्रीचें उपाध्येपण करणारे यजुर्वेदी ब्राह्मण आहेत. कारण त्यांच्याजवळचे यात्रस्थांचे लेख सर्वांत जुने आहेत. साधारणतः शके १४०० पासूनचे लेख या क्षेत्रीं मिळतात. प्रसंगविशेषीं येथील भिक्षुक मंडळींच्या नामावळी हक्क ठरविण्यास वगैरे कोर्टांत उपयोगी पडतात. वंशावळी करून घेण्यासही त्यांचा चांगला उपयोग होतो.

पूर्वीं प्रत्येक ज्ञातींत ग्राम असत व ते आपसांतील तंटे व गांवकीचे लढे दोन्ही पक्षाकडील वांके ऐकून घेऊन उलगडीत असत. हल्लीं त्या प्रकारची व्यवस्था चालण्यासारखा काल नाहीं. यामुळें गांवास एकप्रकारचा प्राचीनकाळीं आळा होता तो नाहींसा झालेला आहे. ही एक मोठी शोचनीय गोष्ट झाली आहे, त्यास उपाय नाहीं. शिवाय या ठिकाणीं इतरत्र आढळून न येणारा प्रकार आढळण्यांत येतो. तो हा कीं, ज्ञातीज्ञातींत दोन चार वर्षांच्या फरकानें असणारे, ते एका मंडळीचे गणले जाऊन त्यांचा एक संघ बनतो व ते एकमेकांचे सहज स्नेही बनतात. एकमेकांस प्रसंगविशेषीं उपयोगी पडणें, कार्य-

प्रयोजनांत एकमेकांस मदत करणें व प्रसंगविशेषीं ख्यालीखुशाली करणें ह्या गोष्टी सर्व मिळून करितात. कांहीं कालापूर्वीं अशा संस्थांची फार अवश्यकता होती, परंतु हल्लीं सोयी वाढल्याकारणानें हीं बंधनें शिथिल झालेलीं आहेत. तथापि अद्याप ह्या संस्था अस्तित्वांत आहेत.

गांवांतून श्रीकुशावर्तापासून बऱ्याच अंतरावर गौतमालयापावेतों वाहती गंगा दुतर्फा घांट बांधून काढिली आहे. हें हेमाडपंती कृत्य आहे असें ह्मणतात. गंगेचा दृष्टांत न बांधावें असा झाला असतांही बांधणीचें काम सुरू झाल्यामुळें गंगेच अदृश्य होऊन चक्रतीर्थाशीं प्रगट झाल्याचा इतिहास आहे. सांप्रत एका बाजूचा घांट लकडीपुलापावेतों बुजविलेला आहे. त्यापुढें दोन्ही बाजूंस घांट उघडे आहेत. ह्या ठिकाणांतून पावसाळ्यांत ओत्र वाहतो. हें गंगानदीचें पात्र असें ह्मटलें जात असून तीरावरील लोक नाल्याप्रमाणें ह्या पात्राचा उपयोग करितात. हें तत्तीरवासीयांस दूषणावह असून म्युनिसिपालिटीनेंदी हा भाग स्वच्छ राखिला जाईल अशाबद्दल तजवीज केली पाहिजे.

गांवांतील बहुतेक वस्ति भिक्षुकांची असून ते वृत्तिवंत आहेत. त्यांतही यजुःशाखीयांचा भरणा मोठा आहे. ऋग्शाखीय देशस्थ व कोंकणस्थ कमी आहेत. आरंभक वृत्तिसंपादकही यजुर्वेदीच आहेत. शके १४०० पासूनचे लेख येथें सांपडतात. यजुःशाखीयांत दीक्षित, थेटे, वाडेकर, शुक्ल, देवकुटे, शिखरे, काण्णव वगैरे घराणीं प्रमुखांत आहेत. त्याप्रमाणेंच देशस्थांत कळमकर, पिंगळे, दशपुत्रे,

प्रदक्षिणे, अग्निहोत्री इत्यादि असून कोंकणस्थांत घैसास, फडके, पाटणकर मुख्य आहेत. पूर्वीच्या काळीं ज्या कोणाचा कांहीं वाद असेल, घरांतील आपसांतले तंटे असतील अगर वृत्तिसंबंधीं कांहीं तक्रार असेल तर फिर्यादीनें घोंगडी पसरून कुशावर्तावर बसावें, ह्मणजे त्याची कांहीं तक्रार आहे असें समजलें जाऊन ग्राम जे असत ते एकत्र जमून फिर्यादीचा वांका ऐकून घेत व शक्य असल्यास प्रतिपक्षास तेथल्यातेथें बोलावून आणून गोष्ट निकालास लावीत. भानगडीचा प्रश्न असल्यास दीनावधि लागे. असें क्वचितच होत असे. श्रीगंगाबाईसमोर खरा प्रकार सांगावा, अशी त्या काळीं बुद्धि असे व यथान्याय ग्राम निकाल देत असत व त्यांचा शब्द पाळला जाई. हल्लीं ती भावना नाहींशी झाली असून लोकही ग्रामास मोजिनासे झाले आहेत, व ग्रामही तितक्या योग्यतेचे नाहींत. एकंदरींत परिस्थिति फारच बदलली आहे. हल्लीं लवादाची स्थापना व्हावी असें समंजस लोकांस वाटूं लागलें आहे. जर कोणी ह्या जुन्या संस्थांचें पुनरुज्जीवन ह्या ठिकाणीं करील तर स्थानिक तंटे तरी कोर्टापर्यंत जाणार नाहींत व तितके अंशीं जनतेचेंही हित होईल असें वाटतें.

या ठिकाणीं असलेल्या ब्रह्मगिरी नांवाच्या डोंगरांतून गोदावरी, अहिल्या, वैतारणा आणि पश्चिमवाहिनी गंगा अशा चार नद्यांची उत्पत्ति आहे. गोदावरी पूर्ववाहिनी होऊन बंगालच्या उपसागरास मिळाली असून मध्यंतरीं तिला प्रवरा, मांजरा, गिरणा इत्यादि नद्या मिळाल्या आहेत. यामुळें उत्तरोत्तर तिचें पात्र बरेंच विस्तृत झालेलें

आहे. स्वाभाविक नियमानुसार उगमस्थानीं ती सूक्ष्म प्रमाणांत आहे. वैतारणा नदी दक्षिणेस वाहत जाऊन ठाणें जिल्ह्यांत पुढें ती समुद्रास मिळाली आहे. ह्या वैतारणासिंधुसंगमाचें महात्म्य मोठें असून त्या ठिकाणींच पुढें शककर्ता राजा उत्पन्न होणार आहे, अशीं पौराणिक वचनें आहेत. पश्चिमवाहिनी गंगा किकवी या नांवानें ह्या भागांत प्रसिद्ध असून ती गोदावरीस चक्रतीर्थानजीक मिळाली आहे. अहिल्या नदी ही गांवानजीकच गोदेस मिळते.

ब्रह्मगिरीखेरीज ह्या ठिकाणीं नीलपर्वत या नांवाची एक लहानशी टेंकडी आहे. या डोंगरावरील देखाव्याचें व स्थानाचें वर्णन मागेंच केलेलें आहे.

मूळची ह्या ठिकाणची यात्रा म्हटली म्हणजे महाशिवरात्रीची माघमासांत भरत असे व ती अद्याप चालूंही आहे. त्यावेळीं श्रीची स्वारी सर्व गांवांतून मिरवत जाते. या यात्रेच्या समयीं मोठा बाजारही भरत असतो. बाहेर ठिकाणचे व्यापारी लोक येऊन आपआपलीं दुकानें मांडून बसतात व मोठा व्यापार चालतो. कांहीं वर्षांमागें ज्या वेळीं पर्जन्यकाळीं रहदारी अगदीं जुजबी चालत असे, त्या काळांत गांवकरी लोकांस चार महिन्यांची किराणादि नित्योपयोगी जिनसांची बेगमी एकदम करून ठेवावी लागत असे व ती तरतूद ह्या बाजारच्या वेळींच करण्यांत येत असे. हल्लीं तो प्रघात अंशतः कमी झालेला आहे. कारण कायमचीं सर्व जिनसा मिळणारीं दुकानें गांवांतील बाजारपेठेंत वरींच झालेलीं आहेत. ही यात्रा फाल्गुन

शुद्ध १५ पावेतों राहते. ह्या पुरातन यात्रेखेरीज दोन अगदीं नवीन उपस्थित झालेल्या यात्रा या क्षेत्रीं भरतात. एक, कार्तिकी पौर्णिमेची व दुसरी निवृत्तीची. कार्तिकीची यात्रा श्रीमंत अण्णासाहेब विंचूरकर यांनीं श्रीस रथ समर्पण करून रथोत्सव सुरू केल्यापासून भरत असून निवृत्तीची यात्रा मोठ्या प्रमाणावर अशी गणनीयतेस अगदीं अलीकडे आलेली आहे. निवृत्तीची यात्रा पौष्यमासांतील वद्यपक्षीच्या एकादशीस भरते.

हें क्षेत्र आदि शिवक्षेत्र असल्यानें शिवभक्त गोसावी व बैरागी यांनीं आपल्या पंथाच्या लोकांस राहण्यासाठीं कायमच्या ज्या त्या पंथांनीं जागा केलेल्या आहेत, त्यास आखाडे असे ह्मणतात. अशा प्रकारच्या जागा तेथें सहा आहेत. ( अदब्बाणी, निर्वाणी, निरंजनी, कानफाटी, नवे उदासी व जुने उदासी. ) यांखेरीज बारा वर्षांनीं येणाऱ्या सिंहस्थ सालांत दुसरेहि कांहीं आखाडेवाले येतात. त्यांतील प्रमुखत्वानें समजून येणारे गोधड, लोधड, सुक्कड व निर्मळे हे आहेत.

क्षेत्राचें ठिकाण असल्यानें यात्रस्थांच्या सोईकरितां म्हणून कांहीं धनिक गृहस्थांनीं येथें धर्मशाळा बांधिल्या आहेत, परंतु अशा इमारतींची तऱ्हा धर्मशाळेच्या वास्तव अर्थानुरोधाची क्वचितच आहे. बांधणाराच्या जातवाल्यास येऊन उतरण्यासाठीं खाजगत मिळकतीच्या स्वरूपाच्या त्या सराया आहेत. अशांस धर्मशाळा कसें ह्मणावें समजत नाहीं. कोणाहि निराश्रितास आश्रय मिळणारीं अशीं हीं स्थानें असावयास पाहिजे होतीं, परंतु तसा प्रकार नाहीं.

इकडे त्या त्या उदारधीनें लक्ष देऊन तशी तजवीज अन्वर्थक करावी अशी सूचना केल्याविना राहवत नाहीं.

क्षेत्राची वृत्तिवंत भिक्षुकमंडळी यात्रस्थांची व्यवस्था बहुधा बऱ्या प्रकारें ठेवितात व आलेल्या परस्थांची तर्तूद त्यास त्रास न पडतां व्हावी याबद्दल खबरदारी शक्य तेवढी घेतात. यामुळें ते साधरणतः नाखुष होऊन जात नाहींत. परके ठिकाणीं येणारास गांवच्या सोई ठाऊक नसतात, व त्यास तर कांहीं दिवस राहून बऱ्याच गोष्टी करावयाच्या असल्यानें अशा स्थितींत उपाध्याय जर उदासीनवृत्तीचा अवलंब करते तर यात्रस्थास फारच गैरसोईचें झालें असतें; परंतु आलेला इसम एकवार अमक्याचा असा यजमान ठरला ह्मणजे त्याचा जो उपाध्याय ठरतो तो न सांगतां आपल्या यजमानाची तर्तूद ठेवण्याविषयीं मनापासून झटतो. ही गोष्ट येथील वृत्तिवंतांस भूषणावह असून येणाऱ्या यात्रस्थांस सुखावह आहे; ह्मणून तिचा निर्देश करणें अगत्याचें वाटतें.

या क्षेत्रीं गोदेचें उत्पत्तिस्थान असून गोदास्नानाचें मोठें पुण्य सिंहराशीस गुरु येतो तेंव्हां असते. ही पर्वणी बारा वर्षांनीं एक वर्षभर असते. ह्या वर्षांत यात्रा फार येते. श्रद्धावान् हिंदुधर्मीय मात्र होतां होईल तो सवडीनुसार वर्षांत केंव्हांतरी गोदास्नानास जातो. सर्वच लोक येथें येतात असें नाहीं, तथापि जे लोक या मार्गाकडे वळतात ते मूळ गंगेला आल्याविना राहत नाहीं. भिक्षुकमंडळीस व तदनुषंगानें इतरांस येथें मोठी प्राप्ति होते. ज्या वेळेस गुरुचा सिंहराशींत प्रवेश होतो त्या संधीस ध्वजापर्व

असें म्हणतात, व या समयास मोठी यात्रा जमते. हा समय बहुधा पर्जन्य काळीं येतो; तथापि भाविक लोक अडचणी सोसूनहि येतातच. गोसावी, बैरागी लोकांच्या झुंडींच्या-झुंडी या वेळेस अगोदरपासून येथें आलेल्या असतात, त्या ठरीव अनुक्रमानें मोठ्या समारंभानें वाजतगाजत गोदा-स्नानास कुशावर्ततीर्थावर जातात. प्रत्येक मेळ्याचें विशिष्ट चिन्हांकित निशाण अग्रभागीं फडकत चालतें, व मागून ही शिवभक्त मंडळी ज्याच्या त्याच्या दर्ज्याप्रमाणें कोणी चिमटे, कोणी शंख, कोणी त्रिशूल, कोणी शिंगें, कोणी कांहीं, कोणी कांहीं याप्रमाणें सायुध होऊन डुलत जाते. महंत बोवांची स्वारी मध्यवर्ती असून शिष्यगण भस्म-चर्चितदेही असा शिवनामगर्जना करित करित पुरोभागीं पार्श्वभागीं असा चालत असतो. हा मिरवणुकीचा देखावा फारच मजेदार असतो. कोणाचीं शरीरें तपश्चर्येनें तेजः-पुंज अशीं असतात, तर कोणीं गांजाच्या सेवनानें कृशांग असे झालेले दिसतात. हें मंडळ सर्व वयांच्या चेल्यांचें बनलेलें असतें, यामुळें जे वृद्ध असतात ते नाभिकमला-पर्यंत लंबायमान अशा शुभ्र दाढीनें विभूषित असतात, तर कोणी अगदीं प्रथम अवस्थेंत असल्यानें अनकुरित-कूर्चक असे असतात. कांहीं काळापूर्वी एक मेळा नग्न असा स्नानास जात असे, परंतु अलीकडे त्यांस तशा प्रकारें जाण्याची प्रतिबंधी झाली असल्यानें व अशा प्रकारें स्नान करणेंच हितावह आहे, अशी त्यांची समजूत असल्यानें ते येईनासे झाल्यानें गोदास्नानास बिचारे अंतरले आहेत. कांहीं सोईचा मार्ग निघून हा अडथळा दूर होणें श्रेय-स्कर दिसतें.

या ठिकाणीं जरी लोकवस्ति बहुतेक भिक्षुकवर्गीय आहे, तरी वेदविद्या पढणारे उत्तरोत्तर कमी कमी होत जाऊन क्षेत्रींचें त्या विद्येचें तेज कमी झालें आहे, असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. सुमारें पंचवीस वर्षांपूर्वीचें तेज आज नाहीं, व असाच क्रम उत्तरोत्तर चालल्यास क्षेत्रीं वेदविद्या असेल असा जो शहरवासीयांस भ्रम आहे तो नाहींसा होईल. अशी स्थिति येणें चांगलें नाहीं, यासाठीं इकडे लक्ष देऊन आपला व आपल्या क्षेत्राचा महिमा कायम राखण्याकडे व पूज्य जी वेदविद्या ती जागरूक ठेवण्याकडे क्षेत्रवासी लक्ष पोहोंचवितील अशी आशा आहे.

कांहीं वर्षांपूर्वीं शिंदे, होळकर, गायकवाड ह्या प्रमुख संस्थानिकांचीं या क्षेत्रीं अन्नसत्रें सुरू होतीं, परंतु अलीकडे तीं बंद आहेत. बंद होण्याचें कारण काय असावें कळत नाहीं. क्षेत्रासारख्या ठिकाणीं अशा संस्था असणें फार अवश्यक आहे.

यथाशास्त्र वर्तनाच्या संबंधांत क्षेत्रवासीयांचा कित्ता इतरत्रास असावा असें कोणासही सकृद्दर्शनीं वाटेल, व तें साहजीकहि आहे; परंतु कालमहिमाच असा कांहीं विपरीत आला आहे कीं, हें निसर्गप्राप्त अग्रस्थान कायम राहतें किंवा जातें असा संशय येऊं लागला आहे. ही फार शोचनीय स्थिती आहे. पुराणांतरीं तर असें प्रतिपादित आहे कीं, क्षेत्रीं जन्म येण्यास पुण्य लागतें, तेव्हां अशा पुण्यानें प्राप्त झालेल्या जन्माची देहसार्थकता पुण्यतर मार्गाचें आचरण करून उत्तरोत्तर मुक्तीची ठेव जवळ करण्यानें होणारी आहे; व ह्या साध्यास पुढें ठेऊन वागणें

हें प्रत्येक क्षेत्रवासीयानें आपलें कर्तव्य समजलें पाहिजे. दुर्वर्तनानें व अनुषंगत्वानें क्षेत्रासहि कमीपणा येतो. त्यावर तरी नजर देऊन सशास्त्र वागणें सुतराम् इष्ट आहे, व ह्या लेखकास अशी उमेद आहे कीं, ही स्थिति सुधारून प्रसंगोपात दुसरा एखादा लेख लिहिण्याची जर वेळ आली तर त्या वेळेस बदलून विधान करणें प्राप्त व्हावें. अनिंद्य वर्तन इहपरलोकीं सुखावह असतें.

सामाजिक बंधनें कोणतींना कोणतीं तरी असून संमेलनेंही होतातच; त्याप्रमाणें मागें दर्शविल्याप्रमाणें मंडळींची संस्था अस्तित्वांत असून संमेलनाचा एक विशिष्ट प्रसंग असतो, तो घोळाण्यासंबंधांत जमणें हा होय. मकर संक्रमणाच्या करीच्या दिवशीं मंडळी तुख्या तुख्यानें आपसांत वर्गणी करून डाळी, हिंग, जिरें, खोबरें, लिंबें इत्यादि मसाला घेऊन शेतावर जातात, व तेथें हरवऱ्याचे कोंवळे कोंवळे डिकसे तोडून ते चांगले चोळून त्यांची आंत्र काढून टाकतात, व बारीक केल्यानंतर समागमें आणिलेला मसाला त्यांत कुटून मिश्र करितात. नंतर त्यावर लिंबू पिळून त्याचा एक चटणीसारखा भगराळेवजा पदार्थ बनवितात. ह्यासच ' घोळाणा.' अशी संज्ञा आहे. तो यथाभाग भक्षण करून आतिष्टांसाठीं घरींहि थोडथोडा नेतात.

या ठिकाणचें हवामान पर्जन्यकाळखेरीजकरून इतर काळांत सुखावह असतें. शीतकाळांत थंडी फार नसते व उन्हाळ्यांत उष्माहि जबर असत नाहीं. पर्जन्याचें मान सरासरीनें शंभर इंचाचें असतें, व पर्जन्यकाळीं वारा फार असल्यानें देशावरल्याप्रमाणें केवळ छत्रीनें निर्वाह येथें

४७८



होत नाहीं; घोंगडी ही घ्यावीच लागते. पिण्याचें पाणी सांचिव असल्यानें नारूचा उपद्रव अल्पप्रमाणांत येथें असतो, परंतु उष्णकाळांत कुशावर्ततीर्थ उपसल्यानंतर जें गंगोदक येतें व जें निर्मळ राखिलें जातें तें फारच उत्तम असतें.

वाहनाची सोय या ठिकाणची नेहमींची बैलगाड्या व घोडीं ही असते. यापेक्षां जास्त दर्जाची सोय होणें सांप्रतच्या काळांत सडकेचा पक्का मार्ग चांगला झाला असल्यानें अगत्याचें झालें आहे. सडकेचा सुगम मार्ग नासिक शहरपावेतों उत्तम प्रकारचा असून ठाणें जिल्ह्यांतील मोखाडे नांवाच्या पेटचाच्या गांवापर्यंत एक सामान्य मार्ग झालेला आहे. आगगाडीच्या वेळेस धरून जाण्यायेण्याच्या वाहनांची सोयकर व्यवस्था लागेल तर यात्रस्थांस सुखावह होऊन थेट क्षेत्रीं येणाऱ्यांचा येवाही वाढेल असें वाटतें. हा धंदा करणारे कोणी इकडे लक्ष देऊन तजवीज करतील तर त्यांसही फायद्याचें होणार आहे.

याप्रमाणें या क्षेत्रासंबंधानें शक्य तेवढी माहिती संकलित करून नमूद केली आहे. त्यांतून उपयुक्त सारभूत भाग वाचकवर्गानें ग्रहण करावा, अशी नम्र विनंति करून हा अल्प लेख संपवितों.

REFBK 0000478

REFBK-0000478